म. ग्रं. सं. ठाणे
विषय बा. वाङ्मय
वा. नं. ६५४०



| प्रकरण | पृष्ठ |
|---|---|
| [illegible] पतीची भेट | ४९ |
| २६ अयोध्येंत पुनरागमन | ५१ |
| २७ रामराज्य | ५२ |
| २८ भवितव्यतेचा खेळ | ५४ |
| २९ पुत्रप्राप्ति | ५७ |
| ३० पितापुत्रांचें युद्ध | ५९ |
| ३१ पुनर्मीलन आणि शेवट | ६१ |
| उपसंहार | ६३ |
| अभ्यास व प्रश्न | ६५ |
| परिशिष्ट | |
| (१) सीतागीत | ७७ |
| (२) सीतास्वयंवर (१) | ८० |
| सीतास्वयंवर (२) | ८२ |

# श्रीसीतामाई

अनुक्रम
नों. दि.

## उपोद्धात

महासती श्रीसीतामाई ही 'रामायण' या महाकाव्यांतील नायिका आहे. पण ती नुसती एका 'काव्यां'तील नायिकाच नसून आर्यांच्या कुटुंबव्यवस्थेंत स्त्रियांच्या पातिव्रत्याला जें पहिलें स्थान देण्यांत आलें त्या स्थानीं शोभणारें तें एक दिव्य रत्न आहे. आणि हा आदर्श समोर असल्यामुळेंच भारताच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासांत अनेक स्त्रियांनीं पातिव्रत्यरक्षणासाठीं प्राणत्यागही केल्याचीं उदाहरणें दिसून येतात. किंबहुना आधुनिक शिक्षण मिळालेल्या आजच्या भारतीय स्त्रियांपुढूनही हा आदर्श ढळलेला नाहीं.

सीता ही रामाची बायको हें सर्वांना ठाऊक असतें आणि तिचें नांव प्रातः-स्मरणीय व्यक्तींत प्रामुख्यानें गोवलेलें आहे, हेंही पुष्कळांना निदान ऐकून तरी माहीत असतें. रामकथा सांगतांना किंवा श्रवण करतांना सीतेचें नांव वारंवार येतेंच. 'सीताराम', 'सीतापति', 'जानकीजीवन' इत्यादि नांवांत सीताच आद्यपदीं अधिष्ठित आहे; आणि 'सीते'मुळेंच 'रामायण' घडलें हें सर्वमान्य आहे.

सीतेविषयीं स्वामी विवेकानन्दांनींही म्हटलें आहे कीं, "सीता अद्वितीय आहे. ती एकदां झाली ती झाली. तशी पुनः व्हावयाची नाहीं. राम कदाचित् अनेक झाले असतील, पण सीता एकच होऊन गेली…आज हजारों वर्षें सर्व आर्या-वर्तांत ती लहानथोरांच्या पूजेला पात्र होऊन बसली आहे व तशी ती निरंतर राहणार आहे. ही आमची राष्ट्रीय देवता आहे. आपल्या राष्ट्राच्या रन्ध्रारन्ध्रांत सीतेनें ठाणें दिलें आहे. आपली उन्नति व्हावी, आपण मोठेपणास चढावें, असें जर भारतांतील स्त्रियांना वाटत असेल तर त्यांनीं सीतेच्या पावलावर पाऊल टाकूनच गेलें पाहिजे."

दुसऱ्या एका अशाच थोर पुरुषानें म्हटलें आहे कीं, "पातिव्रत्य, विनय, लज्जाशीलत्व, दया, उदारता, सहिष्णुता, इत्यादि अनेक कोमल गुणांचें सगुण रूप ज्याला पहावयाचें असेल त्यानें सीतेच्या चरित्राचा मनःपूर्वक अभ्यास करावा. सीतेची मनोमय मूर्ति अंतश्चक्षूंनें पहावी."

तेव्हां अशा या आपल्या राष्ट्रीय देवतेची मूर्ति सर्वांना सुलभपणें आपल्य मनश्चक्षूपुढें उभी करतां यावी म्हणून तिच्या जन्मापासून अखेरपर्यंतचें वृत्त इथें थोडक्यांत कथन करूं.

## १ पूर्वजन्माची कहाणी

पूर्वी पद्माक्ष नांवाचा एक राजा होता. त्याला लक्ष्मी म्हणजे संपत्तीची देवता ही आपली मुलगी व्हावी असें वाटलें. म्हणून त्यानें त्या देवतेची प्रार्थना करून तिच्याजवळ तसें मागणें मागितलें. लक्ष्मी म्हणाली:–"मी श्रीविष्णूची बायको; श्रीविष्णूच्या आज्ञेशिवाय तुझ्या घरीं कशी येऊं?"

तेव्हां पद्माक्षानें श्रीविष्णूची आराधना करून त्याला प्रसन्न करून घेतलें आणि त्याला आपला मनोदय कळविला. श्रीविष्णु म्हणाले, "तूं लक्ष्मीची आशा कशाला करतोस? लक्ष्मी म्हणजे केवळ दुःखाची खाण. ती जाईल तेथें दुःख उत्पन्न करणारी आहे."

पण पद्माक्ष ऐकेना. तो श्रीविष्णूकडे अगदीं धरणें धरूनच बसला. तेव्हां मग श्रीविष्णूनें पद्माक्षाला एक महाळुंगाचें फळ दिलें आणि सांगितलें कीं, 'या महाळुंगाचे दोन भाग कर म्हणजे त्यांतून तुला पाहिजे त्या प्रकारची कन्या बाहेर निघेल.'

पद्माक्ष तें महाळुंग घेऊन घरीं आला आणि त्यानें त्याचे दोन भाग करतांच त्यांतून एक अतिरूपवती कन्या बाहेर पडली. तिचें नांव 'पद्मावती' असें ठेविलें.

पुढें ती कन्या पद्माक्षाच्या घरीं लहानाची मोठी होतां होतां उपवर झाली असें पाहून बापानें तिच्या स्वयंवराची तयारी केली. मोठमोठे ऋषि, देव, दानव, मानव, नर, किन्नर, गंधर्व, दैत्य, राक्षस, सगळे या समारंभासाठीं पद्माक्षाच्या राजवाड्यांत जमा झाले.

या स्वयंवराच्या वेळीं पद्माक्षानें जाहीर केलें कीं, आकाशाच्या रंगासारखा रंग ज्याच्या अंगीं असेल त्याला ही नवरी माळ घालील. पण जमलेल्या नवर-देवांपैकीं कोणाच्याच अंगीं हा रंग दिसेना आणि मुलगी कोणालाच माळ घालीना. तेव्हां त्या वऱ्हाड्यांनीं पद्माक्षाबरोबर लढाई करून पद्मावतीचें बलात्कारानें हरण करण्याचें ठरविलें. मग पद्माक्ष व ते जमलेले सर्व वीर यांच्यामध्यें घनघोर युद्ध झालें. बहुतेक वऱ्हाड्यांचा मोड होऊन ते पळून गेले. पण त्या युद्धांत

पद्माक्षालाही जबर दुखापत होऊन तो मरण पावला. तेव्हां पद्मावतीनें आतां आपण या रणधुमाळींत राहणें बरें नव्हे असें ठरवून अग्नींत उडी टाकली.

नवरी हातची गेली असें पाहून उरलेल्या वीरांनीं रागानें सगळें नगर उध्वस्त करून टाकलें. श्रीएकनाथमहाराज या प्रसंगाचें वर्णन करतांना म्हणतातः—

"प्रतिपाळिते प्राणा मुकले । अभिलाषिते रणीं पडले । उरले ते रडत गेले । लक्ष्मीचें केलें हें असें ॥ १ ॥"

म्हणजे या लक्ष्मीची करणी अशी कीं ज्यांनीं तिचें पालनपोषण केलें ते प्राणाला मुकले, ज्यांनीं तिचा अभिलाष केला ते युद्धांत पडून मेले आणि जे त्यांतूनही उरले ते ती हातची गेली म्हणून रडत घरीं गेले! असो.

रणधुमाळी आटपून सगळीकडे स्थिरस्थावर झाल्यावर पद्मावती अग्निकुंडांतून बाहेर आली, आणि कुंडाशेजारीं एकटीच विचार करीत बसली. इतक्यांत लंकेचा राजा रावण आकाशमार्गानें विमानांतून चालला होता, त्यानें ही सुंदर कुमारी पाहिली आणि तो विमान खालीं उतरवून तिला धरण्यासाठीं पुढें झाला. रावणाला पाहून पद्मावतीनें पुनः अग्निप्रवेश केला. रावणानेंही प्रतिज्ञा केली कीं या लावण्य-खनीला मी शोधून काढीन तरच नांवाचा रावण! हिनें देवादिकांना फसविलें, पण मी हिला हातची जाऊं देणार नाहीं. असें म्हणून त्यानें तें अग्निकुंड विझवून टाकलें आणि तिचा शोध चालविला. तेव्हां त्या कुंडांत त्याला पांच तेजस्वी रत्नें सांपडलीं. रावणाला वाटलें कीं, ही कोणी चेटकीण असून तिनेंच आतां हें रत्नांचें रूप घेतलें आहे. तेव्हां तीं रत्नें एका मजबूत पेटींत घालून तो विमानांतून लंकेला गेला; आणि ती पेटी आपल्या देवघरांत ठेवून त्यानें आपली पत्नी मंदोदरी हिला आपण तुझ्यासाठीं दिव्य रत्नें आणलीं आहेत असें सांगितलें.

मंदोदरी ती पेटी उचलण्यासाठीं म्हणून देवघरांत आली, पण तिला ती उचलेना. नोकरचाकर आले, मंत्री आले, शेवटीं खुद्द रावण महाराज आले, पण कोणालाच ती पेटी उचलेना. रावण मनांत दचकला; पण तसें बाहेर न दाखवितां त्यानें त्या पेटीचें झांकण वर केलें तों आंत काय? सहा महिन्यांची सुकुमार पण अत्यंत तेजस्वी अशी एक मुलगी! नंतर रावणानें त्या कन्येची इत्थंभूत हकीगत सर्वांना सांगितली. मंदोदरी म्हणाली, "हें विष इथें नको. ही कन्या नव्हे, कृत्या आहे. बरें, हिचा आतांच घात कराल तर कोणीं सांगावें, आतांच काय अनर्थ घडून येईल तो! तेव्हां ही पेटी जशीच्या तशी बंद करून

आपल्या राष्ट्राच्या बाहेर नेऊन टाका ! आणि तीसुद्धां उघड्यावर न ठेवतां अगदीं गुप्तपणें पुरून टाका !"



त्याप्रमाणें रावणाच्या अनुचरांनीं ती पेटी नंतर उचलून एका विमानांत ठेवली आणि ते त्या विमानांत बसून लंकेच्या बाहेर पडले. विमानांतून फिरतां फिरतां जनकराजाच्या राज्यसीमेंत प्रवेश केल्यावर त्यांनीं ती गुप्तपणें एका ठिकाणीं जमिनींत पुरली आणि ते निघून गेले !

पुढें जनक राजानें ती जमीन एका ब्राह्मणाला दिली. तो ब्राह्मण ती जमीन नांगरूं लागला, तेव्हां पहिल्याच फाळाला ही पेटी नांगराला[१] अडकली. ब्राह्मणाच्या घरच्या नोकरचाकरांना आनंद झाला. ते म्हणाले, 'आज नांगरणीला मुहूर्त फारच छान लाभला होता. कारण पहिल्याच तासाला हें निधान हाताला लागलें !" पण ब्राह्मण म्हणाला, "मला राजानें जमीन दान दिली आहे; तींतील गुप्त ठेव असेल ती माझी नव्हे. ती राजाची राजाला परत दिली पाहिजे."

असें म्हणून ब्राह्मण ती पेटी घेऊन राजदरबारांत आला आणि त्यानें ती

---

१ दुसऱ्या एका ठिकाणीं जनक राजाच यज्ञासाठीं 'क्षेत्र' नांगरीत असतां त्याला ही पेटी सांपडली व ती उघडल्यावर तिच्यांतून हें दिव्य कन्यारत्न बाहेर पडलें असें सांगितलें आहे.

हकीगत राजाला सांगितली. राजा म्हणालाः-"मीं तुला ज्या वेळीं भूमिदान केलें त्या वेळींच त्या जमिनींतला सर्व निधिनिक्षेप तुझा झाला."

ब्राह्मण म्हणाला, "नाहीं. मीं फक्त भूमि म्हणजे जमीन दान घेतली आहे. तींत गुप्त धन असेल तर तें माझें नव्हे, तें तुझें तूं घे."

शेवटीं दाता आणि प्रतिगृहीता यांच्यामधलें हें अपूर्व भांडण राजसभेंतील सभासदांकडे गेलें. सभासद म्हणालेः-"आधीं पेटी उघडून आंत काय आहे तें पाहूंया, मग शास्त्रविचार करूं."

त्याप्रमाणें ती पेटी उघडण्यांत आली. तेव्हां आंत पहातात तों अपूर्व सौंदर्यसंपन्न असें कन्यारत्न! सर्वांना मोठा अचंबा वाटला. राजालाही हें कन्यारत्न पाहून परम आनंद झाला. त्यानें तिला आपल्या घरीं ठेवून घेतलें आणि तिला नाना प्रकारच्या विद्या व कला शिकविल्या. जनकाच्या घरीं वाढलेली म्हणून तिला लोक 'जानकी' म्हणूं लागले. 'सीता' हें नांव पडण्याचें कारण, ती शेत नांगरतांना नांगराच्या तासांत सांपडली होती आणि नांगराच्या तासाला किंवा नांगरानें जमिनींत पडलेल्या रेषेला सीता म्हणतात हें होय.

सीतेच्या पूर्वजन्माची ही कथा या ठिकाणीं विस्तृत देण्याचें कारण एवढेंच कीं, सीता ही जनकाची मुलगी एवढेंच पुष्कळांना माहीत असतें. ती 'अयोनिजा' म्हणजे स्त्रीपुरुषसंयोगापासून झालेली नसून 'भूगर्भसंभूता' म्हणजे पृथ्वीच्या पोटांत उत्पन्न झालेली होती असें हरिदास पुराणिक सांगतात; पण तिच्या बालपणाची ही अद्भुत कथा फारच थोड्यांना माहीत असते. असो.[१]

प्रस्तुत कथेंतील पौराणिक कल्पनांचें जाळें जरा बाजूला केलें तर ऐतिहासिक दृष्ट्या असें म्हणतां येईल कीं, सीता ही पद्माक्ष नांवाच्या एका क्षत्रियाची मुलगी असून तिचे आईबाप ती लहान असतांनाच कांहीं अज्ञात अशा कारणांनीं मृत्युमुखीं पडल्यामुळें तिचें पालनपोषण जनक राजानें तो त्या प्रदेशाचा अधिराज असल्यामुळें आपल्या घरीं आपल्या स्वतःच्या कन्येप्रमाणें केलें होतें.

---

१ मूळ कथा स्कंदपुराणांत असून एकनाथ महाराजांनीं ती आपल्या भावार्थरामायणांत घेतली आहे.

सीतेचें जन्मलक्षण । यासी मूळ स्कंदपुराण ।
कालिकाखंडीं हें निरूपण । समूळ संपूर्ण लिहिलेंसे ॥

( भा. रा. )

आणि ही मुलगी सुस्वरूप, हुषार आणि सर्वांचें मन आकर्षण करून घेणारी असल्यामुळें जनकाच्या घरीं व त्याच्या राज्यांत सर्वत्र तिची वाहवा होत होती.

श्रीरामचंद्राबरोबर तिचें लग्न कसें झालें आणि आपल्या पवित्र आचरणानें आणि अप्रतिम पातिव्रत्यानें तिनें आपलें नांव कसें अजरामर करून ठेवलें हें आतां क्रमाक्रमानें सांगूं.

## २ दाशरथी श्रीरामचंद्र

मागें सांगितलेल्या जनक राजाचें राज्य भरतखंडाच्या उत्तरभागीं—सध्यांच्या 'बिहार' देशच्या आसपास होतें. त्याच्या राजधानीचें नांव 'मिथिला' असें होतें.

याच वेळीं या राज्याच्या पश्चिमेकडे एक स्वतंत्र राज्य होतें, तेथें दशरथ नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याच्या राजधानीचें नांव 'अयोध्या' असें होतें.

या दशरथ राजाला कौसल्या, सुमित्रा आणि कैकेयी अशा तीन मुख्य राण्या



होता. तथापि त्याला बरींच वर्षे मूलबाळ झालें नव्हतें, म्हणून तो फार कष्टी असे. पुढें त्याचा कुलगुरु वसिष्ठ याच्या सांगण्यावरून त्यानें 'पुत्रकामेष्टि' या नांवाचा यज्ञ केला. त्यामुळें अग्निदेव प्रसन्न होऊन त्यानें दशरथाला प्रसाद म्हणून 'पायस' दिला आणि तो आपल्या राण्यांना वांटून देण्यास सांगितलें.

दशरथानें त्याप्रमाणें केल्यावर कांहीं दिवसांनीं त्या तीन्ही राण्या गरोदर होऊन त्यांना चार मुलगे झाले. पहिली ज्येष्ठ राणी कौसल्या हिला मुलगा झाला त्याचें नांव राम; दुसरी सुमित्रा, तिच्या मुलाचें नांव लक्ष्मण; आणि तिसरी कैकेयी, तिला एकदम दोन मुलगे झाले, त्यांचीं नांवें भरत व शत्रुघ्न अशीं ठेवण्यांत आलीं होतीं.

मागील प्रकरणांत सांगितलेली सीता ही प्रत्यक्ष लक्ष्मीचाच अवतार कशी होती हें तिथें सविस्तर सांगितलेंच आहे. दशरथाच्या पोटीं जन्माला आलेले हे चार मुलगेही लक्ष्मीपति श्रीविष्णु व त्याची प्रभावळ यांचेच अवतार होते. पैकीं श्रीराम हा प्रत्यक्ष श्रीविष्णूचाच अवतार असून लक्ष्मण हा श्रीविष्णु ज्या शेषावर शयन करतो त्या शेषाचा आणि भरत-शत्रुघ्न हे अनुक्रमें श्रीविष्णूच्या हातांतील चक्र व शंख या आयुधांचे अवतार होते.

सीतेच्या पूर्वजन्मांत म्हणजे पेटींतील रत्नांच्या स्वरूपांत ज्या रावणानें तिला लंकेंत नेलें होतें, तो रावण या वेळीं अत्यंत बलाढ्य असा लंकेचा राजा होता. त्यानें श्रीशंकराला प्रसन्न करून घेऊन सर्व विश्वांत आपला दरारा बसविला होता. आणि त्याच्या जुलमानें पृथ्वीवरचे सर्व लोकच नव्हत, तर स्वर्गातले देवसुद्धां संत्रस्त झाले होते.

चोहोंकडे जुलूम माजला म्हणजे पृथ्वी गाईचें रूप घेऊन ब्रह्मदेवाकडे जाते, ब्रह्मदेव श्रीविष्णूची प्रार्थना करून त्याला अवतार घ्यावयाला सांगतो आणि श्रीविष्णु मग त्या त्या काळाला योग्य नि आवश्यक अशा स्थळीं व स्वरूपांत अवतार घेऊन पृथ्वीवरचा भार हलका करतो, अशी अवतारांची पौराणिक मीमांसा आहे. त्याप्रमाणें या वेळीं श्रीविष्णूनें रावणवधासाठींच हा रामावतार घेतला होता आणि इतर देव त्याच्या साह्यासाठीं वेगवेगळे अवतार घेऊन आले होते, असें पुराणांतरीं सांगितलें आहे. असो.

दशरथाच्या घरीं राम-लक्ष्मण-भरत-शत्रुघ्न हे चारही मुलगे दिवसा-मासांनीं

वाढत चालले. वाढत्या वयावरोबर खेळणें, बागडणें, शिकार इत्यादि राजपुत्र-लीला अवलोकन करून दशरथाचा काल मोठ्या सुखांत जाऊं लागला.

हे मुलगे सावत्र होते तरी त्यांचें परस्परांवर अत्यंत प्रेम होतें. श्रीरामचंद्र हे सर्वांत वडील; तेव्हां सर्व जण त्यांच्या आज्ञेंत असत. त्यांतही श्रीराम व लक्ष्मण आणि भरत व शत्रुघ्न यांच्या जोड्या विशेषच शोभून दिसत.

वसिष्ठासारखे कुलगुरु या मुलांच्या शिक्षणाची काळजी घेण्याला घरीं होतेच; तेव्हां मौंजीबंधन झाल्यावर राजपुत्रांना अवश्य असलेलें सर्व प्रकारचें शिक्षण त्यांना घरच्या घरीं मिळण्याची सोय होती.

वसिष्ठासारखा गुरु आणि सर्व प्रकारच्या शिक्षणाची घरच्या घरीं सोय; मग काय विचारतां! दिवसेंदिवस हे राजपुत्र सर्व विद्यांत प्रवीण होत चालले. दशरथ राजा, त्याच्या पत्न्या, आणि राज्यांतील सर्व लोक या राजपुत्रांचें नेहमीं कौतुक करीत. दशरथ राजाला तर त्यांच्यावांचून क्षणभरही करमत नसे.

हळू हळू या राजपुत्रांच्या बुद्धिमत्तेची, शौर्यधैर्यादि गुणांची व शस्त्रास्त्रविद्येंतील नैपुण्याची बातमी शेजारच्या राज्यांतही पसरली आणि दशरथाचे सर्व स्नेही आणि मांडलिक त्याचें अभिनंदन करून त्याला धन्यवाद देऊं लागले.

## ३ 'जानकी'चें बालपण

जनक राजाच्या घरीं लडिवाळपणानें वाढलेली सीता जितकी स्वरूपानें सुंदर, तितकीच अंगयष्टीनेंही बळकट आणि चपळ होती. क्षत्रियांच्या मुलींना नेहमीं शिकविण्यांत येणारे घोड्यावर बसणें, धनुष्याचा नेम धरणें, भाला फेंकणें इत्यादि 'विषय' तिला शिकविण्यांत आले होते. जनकाच्या घरीं परशुरामानें ठेवलेलें श्रीशिवाचें एक जुनें धनुष्य होतें. हें धनुष्य फार जड असून सामान्य मनुष्याला सहज उचलण्यासारखें नव्हतें. शिवाय या धनुष्याला बाण जोडून तो सोडणें हें मोठ्या युक्तीचें काम होतें, तेंही सर्वांना साधत नसे. म्हणून हें धनुष्य नेहमींच्या उपयोगांतलें नसून जनकाच्या शस्त्रागारांत एकीकडे पडलेलें असे. तथापि सीतामाई लहानपणीं सरावानें तें सहज उचलून 'घोडा घोडा' खेळत असे!

रानावनांतून हिंडणें, सृष्टीचे सुंदर देखावे पाहणें, इत्यादि गोष्टींची तिला स्वाभाविक आवड होती म्हणून ती त्या वेळच्या ऋषींच्या आश्रमांत जाऊन तिथें तासचे तास घालवी.

'आदर्शरामायण'कर्त्यांनीं सीतेच्या शिक्षणाविषयीं म्हटलें आहे कीं, "संसारांतील संभवनीय अवस्थांचे स्वानुभव मातापित्यांकडून तिला सांगण्यांत आले होते. त्याचप्रमाणें शास्त्रज्ञ व बुद्धिमान ब्राह्मण, शमदमावलंबी भिक्षु, श्रोत्रिय, इतिहास-पुराणज्ञ यांच्याकडूनही भावी आयुष्यांत कोणकोणत्या गोष्टी घडून येण्याचा संभव आहे हेंही तिला पटवून देण्यांत आलें होतें.

शास्त्रीय ज्ञानाच्या जोडीस पवित्र व पूजनीय व्यक्तींचीं इतिहास-पुराणांतील चरित्रेंही तिला सरहस्य समजाविण्यांत आलीं होतीं. प्रौढपणीं एका प्रसंगीं सहज विषय निघाला असतां तिनेंच एकदां सांगितलें होतें कीं, "माझ्या मातापित्यांनीं संसारांत संभवणाऱ्या अनेक प्रकारच्या अवस्था लक्षांत आणून त्या मला पढविल्या." त्याकालचे सामुद्रिक, भविष्यवादी, वयोवृद्ध ज्योतिषी आणि सिद्धान्ती या सगळयांनीं ही पट्टाभिषिक्त राणी व पुत्रवती होणार असें भविष्य वर्तविलें होतें आणि तिच्या अंगीं खचित दैवी अंश आहे अशी जनकाचीही खात्री झाली होती."

## ४ श्रीरामाचें सिद्धाश्रमांत आगमन

इकडे अयोध्येंत दाशरथी श्रीरामचंद्र नि त्याचे तिघे भाऊ हे आतां बाळपण संपून कुमारावस्थेंत पदार्पण करीत होते. त्यांना वसिष्ठादि ऋषींकडून मिळणारें शिक्षण चालूच होतें.

याच सुमारास गंगानदीच्या पलीकडे विश्वामित्र या नांवाचा ऋषि वनांत तपाचरण करीत असे. अधूनमधून त्याचें यज्ञकर्मही चाले. या यज्ञकर्मांत त्या वनांतले 'राक्षस' त्याला नेहमीं उपद्रव देत. हा उपद्रव दूर करण्यासाठीं त्याला एकाद्या तरुण व शूर योद्ध्याची मदत घेणें आवश्यक वाटलें. दशरथाच्या मुलांचा लौकिकही त्याच्या कानीं गेला होता. तेव्हां त्यानें दशरथाच्या दरबारीं जाऊन याच मुलांना घेऊन येण्याचें ठरविलें आणि तो एक दिवस अचानक दशरथाच्या दरबारीं येऊन दाखल झाला.

दशरथानें रीतीप्रमाणें त्याचा यथाविधि आदरसत्कार केल्यावर विश्वामित्रानें आपल्या आगमनाचा हेतु कळविला; पण दशरथाला आपल्या प्रियपुत्रांना क्षणभरही दूर ठेवणें म्हणजे परम संकट वाटे; तेव्हां तो विश्वामित्राच्या या मागणीला होकार कसा देणार? उलट पक्षीं विश्वामित्र हा मोठा कोपिष्ट ऋषि असल्याची ख्याती होती. त्याच्या मनाविरुद्ध गोष्ट घडली किंवा त्याचा कोणीं अपमान केला तर तो कोण्यावेळीं काय करील याचा नेम नाहीं अशी स्थिति होती; तेव्हां

त्याला एकदम नकार द्यावा तर तिकडूनही पंचाईत; असा दशरथापुढें मोठा पेंच येऊन पडला.

पण पुढें वसिष्ठ ऋषींनीं दशरथाला सांगितलें कीं, रामचंद्रादि पुत्रांना माझ्याकडे होती तेवढी विद्या मीं शिकविलीच आहे. यानंतर त्यांना देशपर्यटन करविणें अवश्य आहे; आणि विश्वामित्रही कांहीं विशिष्ट शस्त्रास्त्रविद्येंत पारंगत आहे, तेव्हां मुलांना त्याच्याकडे पाठविण्याला कांहीं हरकत नाहीं. शिवाय तो आपण होऊन तुमच्याकडे आला आहे, तेव्हां त्याला नकार दिल्यास तो त्याचा अपमान होईल. शेवटीं उभयतांच्या संमतीनें रामलक्ष्मणांना विश्वामित्राबरोबर पाठविण्याचें ठरलें आणि विश्वामित्र या दोघां वीर कुमारांना घेऊन आपल्या आश्रमीं आला. वाटेंत येतांना त्राटिका नांवाची राक्षसी त्यांच्या अंगावर धांवून आली, तिला रामानें ठार मारलें, आणि तिच्यामागून मारीच या नांवाचा राक्षस धांवून आला त्यालाही राम-लक्ष्मणांनीं पळवून लाविलें. असो.

विश्वामित्राच्या आश्रमांत आल्यावर या दोघां बंधूंचें शस्त्रास्त्रविद्येचें आणखी शिक्षण सुरू झालें. विश्वामित्रानें त्यांना मोठ्या आपुलकीनें आपल्याला माहीत असलेल्या साऱ्या विद्या शिकविल्या[१]. त्यांनींही अनेक राक्षसांना मारून विश्वामित्राचें यज्ञकर्म निर्विघ्न केलें आणि विश्वामित्र नि ते उभयतां बंधू त्या आश्रमांत मोठ्या आनंदानें काल घालवूं लागले. विश्वामित्राच्या या आश्रमाचें नांव 'सिद्धाश्रम' असें असून कविवर्य मुक्तेश्वरांनीं एका ठिकाणीं त्याचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे:-

वनश्री वर्णावी कवणें । उपमे नंदनवन उणें ॥
नानावृक्षीं फळें सुमनें । रस-सुवासें दाटलीं ॥ १ ॥
येक सरळ शाखाविहीन । येक ते शाखामंडित पूर्ण ॥
तया ग्रीवा लतिका-वेष्टन । करूनि जाती सुरवाडें ॥ २ ॥
कर्पूरकर्दली नारीकेली । चूतवृक्ष लवले फळीं ॥
कंटकीफळांची नव्हाळी । लागली मुळीं असंख्य ॥ ३ ॥
द्राक्षीमंडपातळीं दाट । वाहती अमृतरसाचे पाट ॥
फणस-फळें त्यागुनी देंठ । दाविती वाट सिंधूची ॥ ४ ॥

---

१ या विद्यांत 'बला' व 'अतिबला' या विद्या विशेष प्रभावी होत्या.

जाई जुई चंपक मालती । बकुळ मोगरे कांचन शेवंती ॥
केतकी–वनें वनें घमघमिती । पराग क्षितीं सुगंध ॥ ५ ॥
अगरू चंदन देवदारू । न्यग्रोध पलाश पिंपळ तरू ॥
जे देवत्रयांचे अवतारू । बिल्व तुळसी हरिहरू ॥ ६ ॥
अनेक वृक्षांचिया जाती । माजी पशुपक्षी क्रीडती ॥
कनक कण्हेर शोभती । पूर्ण जीवनीं तडाग ॥ ७ ॥

ग्रंथ ... अनुक्रम ९ ... नं. दि. २४०७४

## ५ स्वयंवर

सीतेच्या बालपणची हकीकत तिसऱ्या प्रकरणांत दिलीच आहे. दिवसा-मासांनीं वाढतां वाढतां तीही पुढें 'उपवर' झाली आणि तिला अनुरूप वर शोधण्याचें काम सुरू झालें.

याच सुमारास विश्वामित्राच्या आश्रमांतील राम-लक्ष्मणांची कीर्ति जनकाच्याही दरबारांत येऊन पोंचली होती. पण त्यानें अजून या मुलांना प्रत्यक्ष पाहिलेलें नव्हतें.


नंतर कांहीं दिवसांनीं जनकानें एक मोठा यज्ञ करण्याचें ठरवून त्यांतच सीतेचें स्वयंवर करण्याची सिद्धता केली. जनकाच्या राजवाड्यांतील शस्त्रागारांत असलेलें सीतेचें तें आवडतें जुनें धनुष्य उचलून जो त्याला अचूक बाण जोडील त्याला सीतेनें माळ घालावी असा पण लावण्यांत आला. देशोदेशींच्या राजपुत्रांना आणि ऋषिमुनींना निमंत्रणें गेलीं आणि जिकडे तिकडे या स्वयंवराची जारीनें तयारी सुरू झाली.

ठरलेल्या दिवशीं जनकाच्या राजधानींत अनेक राजपुत्रांच्या व ऋषिमुनींच्या छावण्या पडल्या. विश्वामित्र ऋषीही राम-लक्ष्मणांना बरोबर घेऊन राजधानींत दाखल झाले.

लंकेचा राजा रावण यालाही या स्वयंवराची बातमी लागली होती. हा राजा मूळचा ब्राह्मणपुत्र असून गुणांनीं 'राक्षस' बनला होता. तो मोठा शूर, मानी, दृढनिश्चयी व महत्त्वाकांक्षी होता. जनकाची मुलगी अत्यंत लावण्यवती असून एक जुनें धनुष्य उचलून त्याची प्रत्यंचा चढविण्याचा पण पुरा होण्यावर तिची प्राप्ति व्हावयाची आहे, हें ऐकून त्याला हा पण आपण सहज जिंकूं असें वाटलें आणि तो आपण होऊनच या समारंभाला उपस्थित झाला.

स्वयंवराच्या वेळीं पणाचें शिवधनुष्य मध्यें ठेवून उपस्थित राजपुत्रांना सभोंवार ज्याच्या त्याच्या दर्जाप्रमाणें व योग्यतेप्रमाणें बसविण्यांत आलें. समोर राजवाड्याच्या गच्चीवर सीता माळ घेऊन उभी राहिली. राम-लक्ष्मण एका बाजूला ऋषिमंडळी बसली होती तिकडे विश्वामित्राच्या शेजारीं बसून गंमत पहात होते.

एकेक राजपुत्र पुढें येऊन धनुष्याला हात लावून पाही; पण तें उचलण्याची छाती एकालाही होईना. शेवटीं रावण पुढें होऊन त्यानें मोठ्या डौलानें होती नव्हती तेवढी शक्ति खर्च करून तें एकदांचें उचललें. पण तें उचलतांच त्याचा तोल जाऊन तो जमिनीवर उताणा पडला आणि धनुष्य त्याच्या पोटावर येऊन बसलें! सभोंवतालच्या राजपुत्रांनीं उपहासपूर्वक टाळ्या वाजविल्या! रावणाला या फजितीमुळें अत्यंत दुःख झालें; पण करतो काय?



---

१ कवि आनंदतनय यानें या वेळच्या रावणाच्या स्थितीचें वर्णन केलें आहे तें असें:—

ओकी रक्त भडाडुनी दडपतां वक्षःस्थळाची फळी ।
सर्वांगें ढकली न लेशहि ढळे भूमी भुजा आफळी ॥
शेखीं देखुनि अप्रयत्न जनकें दीर्घप्रयत्नें दया ।
केली ओढुनि काढितां शिवधनू देखे स्वभाग्योदया ॥ १ ॥

राम-लक्ष्मण विश्वामित्राच्या शेजारीं बसून ही गंमत पहात होते हें वर सांगितलेंच. त्यांनीं आपल्या गुरुजींच्या आज्ञेनें आतां रंगणांत पाऊल टाकलें. त्या राजपुत्रांकडे पाहून सर्व सभा स्तंभित झाली. श्रीरामचंद्र पुढें झाले आणि रावण पडला होता त्या ठिकाणीं येऊन त्यांनीं रावणाच्या पोटावरचें तें धनुष्य उचलून हातांत घेतलें आणि ते त्याला बाण जोडणार तोंच त्या धनुष्याचे मोडून दोन तुकडे झाले!

रामचंद्राच्या शक्तीपुढें पणाच्या धनुष्याची कांहींच मातब्बरी राहिली नाहीं हें पाहून सर्व सभेंत टाळ्यांचा गजर झाला आणि तो गजर चालू असतांच सीतेनें हळूच पुढें होऊन रामचंद्राच्या गळ्यांत माळ घातली.

या स्वयंवराचे वेळीं श्रीरामचंद्र रंगस्थित मंडळींना कसा दिसला त्याचें वर्णन कवि 'आनंदतनय' यांनीं केलें आहे तें असें:—

सीतेला स्मरसा, धनूसि हरसा, राजां दिसे वीरसा।
मूढांला नरसा, जनां नृवरसा, भक्तांस माहेरसा॥
देवां ईश्वरसा, रिपूंसि गरसा, ज्ञात्यांसि हृत्सारसा।
ऐसा सर्व रसांसि हेतु परिसा जो सूर्य हृत्सारसा॥ १॥

'मुक्तेश्वर' म्हणतात:—

त्वरें जानकी घालितां माळ कंठीं।
पडूं लागली अंतरीं पुष्पवृष्टी॥
जयो राघवा राजया भाज सीता।
नृपां लाज त्या वैरियां वाड चिंता॥ १॥
सहित विजयलक्ष्मी जानकी भाज रामा।
वरुनि प्रगट लज्जा लंघिती भूमिसीमा॥
तरुण प्रबळ चिंता रावणा माळ घाली।
उचित सम समस्तां भूतळीं कीर्ति झाली॥ २॥

'निरंजन माधव' म्हणतात:—

सीता श्रीरघुवीर धीर नयनीं देखोनि आनंदली।
हातीं घेउनि माळ बाळहरिणीनेत्रा पुढें पातली॥
देवर्षी नृप सूर्यसाक्ष धरणी लोकीं सभा दाटली।
हर्षे ते समयीं रघूत्तमगळां माळा निकी घातली॥ १॥

# ६ धन्यो गृहस्थाश्रमः !

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें सीतेच्या स्वयंवराचा तांत्रिक विधि झाल्यावर शास्त्रोक्त लग्नविधीसाठीं दशरथाला बोलावणें गेलें. आणि विश्वामित्राच्या सूचनेवरून जनकाची औरस मुलगी ऊर्मिला ही लक्ष्मणाला आणि त्याच्या भावाच्या मांडवी आणि श्रुतकीर्ति या दोन मुली अनुक्रमें भरत व शत्रुघ्न यांना देण्याचें ठरलें.

पुढें दशरथ राजा सर्व सरंजामानिशीं मिथिलेला आल्यावर हे चारही विवाह एकाच मंडपांत उभयपक्षीं मोठ्या थाटानें आणि समारंभानें विधिपूर्वक साजरे झाले आणि दशरथ राजा आपल्या चारही सुनांना बरोबर घेऊन अयोध्येला परत आला. सर्व अयोध्या नगरी या वेळीं आनंदानें फुलून गेली हें सांगणें नकोच. वऱ्हाडी मंडळी अयोध्येला परत येत असतां वाटेंत श्रीविष्णूचा सहावा अवतार जो परशुराम त्याची श्रीरामचंद्राशीं गांठ पडली, तेव्हां उभयतांची थोडा वेळ बोलाचाली होऊन श्रीरामांनीं परशुरामाचें क्षात्रतेज स्वतःमध्यें समाविष्ट करून घेतलें नि परशुराम तपश्चर्येसाठीं सह्याद्रीवर निघून गेले असें पुराणांतरीं वर्णन आहे. असो.

विवाहानंतरचा सीतारामांचा काल मोठ्या आनंदांत जाऊं लागला. या वेळच्या श्रीरामस्वरूपाचें वर्णन अनेक ठिकाणीं आलें आहे. त्याचा निष्कर्ष असा कीं, श्रीरामचंद्रांची मूर्ति नेहमीं सौम्य व प्रसन्न दिसे. त्यांचे डोळे मोहक नि बुद्धीच्या तेजानें झळकणारे होते. देहाचा प्रत्येक अवयव बळानें व तेजानें ओथंबलेला होता. आणि मुखाकडे पाहिलें कीं त्यांच्या अंतःकरणांतली दृढता सहज दृग्गोचर होई.

लग्न झाल्यावर सीतेच्या वृत्तींतही फरक पडला. तिच्या मुखावरील प्रफुल्लता व मनाचा उत्साह यांच्या द्वारें तिचा आनंद लोकांना सहज समजून येई. रामाचेंच निरंतर ध्यान करीत राहिल्यामुळें तिचें चित्त फारसें ठिकाणावर नसे, यामुळें तिच्या मनाची अवस्था कोणाच्याही सहज लक्षांत येई.

आपल्या सख्यांजवळ रामाच्या गोष्टी बोलतां बोलतां किंवा कोणीं केलेली रामाची स्तुति ऐकतां ऐकतां ती अगदीं देहभान विसरून जाई.

रामाशीं बोलतांना तर तिच्या डोळ्यांतील विलक्षण तेजानें तिचें सर्व मुखमंडळ इतकें तेजोमय होई कीं त्याचें वर्णनच करतां येत नाहीं.

उलट रामाचीही स्थिति तशीच झाली. तिच्या गुणांनीं व रूपानें तो अगदीं

वेडाच झाला. जसजसा तिचा सहवास त्याला घडूं लागला तसतसे तिचे गुण त्याला कळूं लागले व त्याचें तिच्यावरील प्रेम वाढूं लागलें.

सीता त्याची इष्टदेवताच बनली. सीतेच्या चिंतनानें त्याचें हृदय पवित्र विचारांनीं भरून जाई. आपल्या हृदयांत सीता बसली असल्यामुळें अपवित्र विचारांची नुसती सावलीही तेथें पडूं नये याबद्दल तो सदा दक्ष असे.

दशरथाची आनंदमय स्थिति तर कोणींही हेवा करण्यासारखीच होती. आदर्श गृहस्थाश्रमाचें वर्णन करतांना कवींनीं

"सानंदं सदनं सुताश्च सुधियः कान्ता न दुर्भाषिणी ।
सन्मित्रं सुधनं स्वयोषिति रतिश्चाज्ञापराः सेवकाः ॥
आतिथ्यं शिवपूजनं प्रतिदिनं मिष्टान्नपानं गृहे ।
साधोः सङ्गमुपासते हि सततं धन्यो गृहस्थाश्रमः ॥ १ ॥"

असें म्हटलें आहे. हें वर्णन दशरथाच्या गृहस्थाश्रमाला चांगलेंच लागू पडत होतें यांत संशय नाहीं.

## ७ अकल्पित आघात !

दशरथ राजाच्या वृद्धापकाळीं त्याचीं कित्येक वर्षें मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें मोठ्या आनंदांत गेलीं. पुढें त्यानें राज्यकारभार आपल्या मुलांवर सोंपवून स्वतः वानप्रस्थाश्रम स्वीकारण्याचा विचार केला.

श्रीरामचंद्र हा सर्वांत वडील मुलगा असल्यामुळें युवराजपद त्याला देण्याचें ठरलें आणि वसिष्ठादि गुरुजनांच्या विचारानें या समारंभाची सिद्धता करण्याचें काम चालू झालें. हळू हळू हा आनंदाचा दिवस नजीक येऊन ठेपला. उद्यां प्रत्यक्ष अभिषेक होणार तर आदल्या दिवसापासून अवश्य ते धार्मिक विधि सुरू झाले. वसिष्ठादि आचार्यांनीं श्रीरामाकडून देवतापूजनादि सर्व विधि यथाशास्त्र करविले आणि सर्व मंडळी उद्यांचा मंगल मुहूर्त केव्हां येतो आणि आपण श्रीरामचंद्राला अयोध्येच्या राजसिंहासनावर बसलेला केव्हां पाहतों म्हणून उत्सुकतेनें मार्गप्रतीक्षा करूं लागली.

पण आपण मनांत योजीत असतों एक आणि परमेश्वर घडवून आणतो भलतेंच, असा जो अनुभव सामान्य माणसांच्या व्यवहारांत अनेक वेळां येतो

तो श्रीरामचंद्रासारख्या अवतारी विभूतीच्या बाबतींतही दिसून यावा ही खरोखरच परमेश्वराची लीला म्हटली पाहिजे.

सगळी अयोध्या नगरी श्रीरामचंद्राच्या राज्याभिषेकाच्या सोहळ्यांत दंग झाली असतां त्या नगरींतल्या कैकेयीच्या वाड्याच्या महालांत निराळाच प्रकार चालला होता.

कैकेयी राणीची मंथरा या नांवाची एक दासी होती. तिनें कैकेयीच्या मनांत असें भरवून दिलें कीं, उद्यां रामाला राज्याभिषेक होऊन राम अयोध्या नगरीचा स्वामी झाला कीं तुझें आणि तुझ्या मुलांचें राज्यांतलें वजन नाहींसें झालें म्हणून समज. रामाची आई कौसल्या ही राजमाता म्हणून मिरवणार आणि तुला एकाद्या यःकश्चित् बटकीप्रमाणें राजवाड्याच्या एका कोंपऱ्यांत दिवस काढावे लागणार ! त्यापेक्षां दशरथ राजाचें तुझ्यावर जें प्रेम आहे आणि तो तुला जो आपली लाडकी राणी म्हणून संबोधतो, त्याचा फायदा घेऊन तूं आपल्या मुलांपैकीं भरतालाच कां राज्याभिषेक करून घेत नाहींस ?

कैकेयीला प्रथम हें म्हणणें बरें वाटेना. शिवाय राम हा सर्वांत वडील, राजाच्या वडील (पट्ट) राणीचा मुलगा, आपल्या मुलांसुद्धां सगळया भावांची त्याच्यावर अप्रतिम भक्ति आणि तोही सर्वगुणसंपन्न, पितृभक्त, एकवचनी, आपल्यावरसुद्धां कोणताही सापत्नभाव मनांत न आणतां आपल्या सख्ख्या आईपेक्षां ज्यास्त प्रेम करणारा, राज्यांतल्या सगळ्या लोकांचा आवडता आणि अयोध्येच्या गादीचा कायदेशीर वारस, असें असतां आपण या कामीं विघ्न कां करावें आणि करून तरी उपयोग काय होणार ? हे विचार एकामागून एक तिच्या मनांत आले आणि तिनें मंथरेचा धिक्कार करून असल्या गोष्टी मला सांगूं नकोस म्हणून तिला सांगितलें.

पण ज्यांना दुसऱ्याच्या मुखांत माती कालवून आपला स्वार्थ साधावयाचा असतो तीं माणसें असल्या धिक्काराला जुमानीत नाहींत. त्यांतून मंथरा ही कैकेयीची अगदीं जीवश्च कंठश्च मैत्रीण बनलेली होती. तिनें कैकेयीला महामूर्ख ठरवून नाना प्रकारें तिचे पुनःपुन्हां कान फुंकले आणि तिचा सवतीमत्सर पेटवून तिच्या अंतःकरणांत द्वेषाग्नीचें होमकुंड तयार केलें !

कैकेयीचे मुलगे भरत आणि शत्रुघ्न या वेळीं अयोध्येंत नव्हते. ते आपल्या मामाच्या घरीं गेले होते. मंथरेनें त्यांच्या या अनुपस्थितीचा असा अर्थ करून

सांगितला कीं, दशरथानें मुद्दामच त्यांना बाहेर पाठवून ते इकडे नसतांना कपटानें झटपट रामाला राज्याभिषेक करून टाकण्याचें ठरविलें आहे आणि एकदां रामाला राज्याभिषेक झाला म्हणजे तो सगळ्या राज्याचा स्वामी झाला; मग त्याला आपल्या सावत्र भावांचें बरेंवाईट करण्याला कितीसा वेळ लागणार? तेव्हां वेळींच तुझ्या स्वतःच्या नसली तरी तुझ्या मुलांच्या कल्याणाची काळजी घे; आणि रामाच्या ऐवजीं भरतालाच राज्याभिषेक करून घे.

झालें! स्त्रियांचें मन जात्याच हळुवार व भावनाप्रधान असतें. त्यांच्या अंतःकरणांत एकदां एकाद्या विचारानें ठाणें दिलें म्हणजे तो सहसा तिथून निघत नाहीं. कैकेयीला मंथरेचें म्हणणें पटलें आणि त्या दोघींनीं रामाला उद्यांच्या उद्यां हद्दपार करण्याचें कारस्थान रचण्याचें ठरविलें!

पूर्वी एकदां दशरथ राजा एका युद्धाला गेला असतां कैकेयी त्याच्याबरोबर होती. त्या वेळीं तो ज्या रथांत बसला होता त्या रथाच्या चाकाचा कणा एकाएकीं मोडला. त्यामुळें रथ पुढें जाण्याचें बंद होऊन दशरथ शत्रूच्या हातीं सांपडणार होता. पण कैकेयीनें मोठ्या शिताफीनें त्या कण्याच्या जागीं आपला हात ठेवून कण्याची जागा भरून काढली. हें तिचें प्रसंगावधान व धारिष्ट पाहून दशरथ फार खूष झाला व त्यानें तिला असें सांगितलें कीं, "तूं पाहिजे त्या वेळीं माझ्याकडे दोन वर माग; मी ते तुझे पूर्ण करीन."

पुढें ही गोष्ट तशीच राहून गेली होती. पण आतां दशरथाच्या त्या वेळच्या शब्दांची व त्यानें देऊं केलेल्या वरांची कैकेयीला आठवण झाली आणि आज रात्रौ दशरथ आपल्या महालांत आला असतां त्याच्याकडून अगोदर वचन घेऊन मग आपला बेत त्याला सांगावा असा त्या दोघींनीं विचार ठरविला.

दशरथ नित्याप्रमाणें रात्रौ तिच्या महालांत आला, तों कैकेयी केंस अस्ताव्यस्त पसरून भूमीवर पडलेली! दशरथाला या प्रकाराची कांहींच कल्पना नव्हती. उद्यां रामाला राज्याभिषेक करून आपण आपल्या राजकर्तव्यांतून मुक्त होणार आणि राज्यभार मुलांवर सोंपवून उर्वरित आयुष्य ईशचिंतनांत घालविण्याच्या मार्गाला लागणार, या आनंदांत तो गर्क होता; तों हा काय विपरीत प्रकार! त्यानें कैकेयीला हातानें धरून वर उठविलें, तों ती फणकाऱ्यानें दूर होऊन दशरथाशीं मुळींच बोलेना.

कैकेयी वयानें कनिष्ठ असली तरी–किंबहुना त्या कारणामुळेंच–दशरथाची फार लाडकी राणी होती, हें पूर्वी सांगितलेंच आहे. तिला दुःख होणें म्हणजे प्रत्यक्ष राजाच्या हृदयालाच वेदना होण्यासारखें होतें. त्यानें तिच्या या आजच्या स्थितीचें कारण विचारलें;* पण ती राजाकडून वचन घेतल्याशिवाय कांहींच सांगेना. शेवटीं राजानें वचन दिलें; तेव्हां तिनें पूर्वीच्या त्या दोन वरांची राजाला आठवण करून दिली आणि राजानें जेव्हां "माग काय ते दोन वर" म्हणून सांगितलें, तेव्हां ती कुत्या उद्गारली, "उद्यांच्या उद्यां रामाला हद्दपार करून माझ्या भरताला राज्याभिषेक करा!"

## ८ पतिव्रतेचा निर्धार

मागील प्रकरणाच्या शेवटीं दिलेले कैकेयीचे शब्द म्हणजे दशरथाच्या डोक्या-वर झालेला वज्राघातच होय. राजाला ते शब्द ऐकून खरोखरच मूर्च्छा आली.

दुसऱ्या दिवशीं ही बातमी हळू हळू सर्व राजवाड्यांत आणि सर्व नगरभर पसरली. पण त्या वेळचे राजे काय नि सामान्य लोक काय, वचनाला जागणारे होते.

श्रीरामचंद्राला ही बातमी समजतांच तो ताबडतोब तेथें आला आणि सर्वांचें सांत्वन करून म्हणाला, "मला पितृवचनापेक्षां राज्य प्रिय नाहीं. पित्याचें वचन पुरें करण्यासाठीं मी आनंदानें राज्यत्याग करून माझ्या मातुश्रीच्या इच्छेप्रमाणें वनवासाला जातों."

लक्ष्मण हा रामाचा एकनिष्ठ भक्त होता. तो म्हणाला, "जिकडे राम तिकडे मी. राम राज्यांत नसतांना मी इथें राहणार नाहीं."

सीतेला हें वर्तमान समजलें, तेव्हां तिला प्रथम अर्थातच दुःख झालें. पण ती खरीखुरी पतिव्रता होती. रामचंद्रांनीं तिला सारी हकीकत सांगून आपण वनांत जाणार असल्याचें सांगितलें, त्या वेळीं त्यांच्यामध्यें झालेला संवाद कोणत्याही काळीं पतिपत्नींचे संबंध कसे असावे–निदान पूर्वकाळीं कसे असत नि आर्य-स्त्रियांची संस्कृति कशा प्रकारची होती–यावर उत्कृष्ट प्रकाश टाकणारा असल्यामुळें पुढें दिला आहे–

**रामचंद्रः**–पित्याची प्रतिज्ञा खरी करण्याकरितां मी वनाला जात आहें. तूं कांहीं काळजी करूं नको. माझ्या पश्चात् तूं व्रतस्थ राहून जपून वाग. सकाळीं उठून देवांची पूजा कर. माझा प्रिय पिता दशरथ, त्याला वंदन करून माझ्या

दुःखित मातेचेंही सांत्वन करीत जा. भरत व शत्रुघ्न यांवरही भावासारखें प्रेम ठेव. भरत आतां आपल्या या देशाचा व कुलाचा मुख्य होणार आहे. त्याला अप्रिय असें कोणतेंही आचरण करूं नको.

**सीताः**–प्राणनाथ, आपलें हें भाषण ऐकून मला केवळ हंसूं येतें. आपण शूर आहांत; राजपुत्र आहांत; सर्व शास्त्रांत निपुण आहांत. आपल्याला असें बोलणें मुळींच शोभत नाहीं.

भार्या हीच काय ती पतीच्या भाग्याची वांटेकरीण आहे; तेव्हां आपल्या वनवासाची मी हक्कानें वांटेकरीण आहें.

आपण जर वनांत जात असाल तर आपल्यापुढें मी होणार; व वाटेंतील कांटे आपल्या पायांनीं तुडवून आपला मार्ग साफ करणार.

माझ्यावर विश्वास ठेवून मला बरोबर घेऊन चला. मी त्रैलोक्याच्या राज्याचीही भुकेली नाहीं. त्याची मला मुळींच इच्छा नाहीं. मी केवळ आपल्या सहवासाची भुकेली आहें.

**रामचंद्रः**–सीते, अरण्याचा तुला अनुभव नाहीं म्हणूनच तूं असें बोलतेस. पर्वताच्या गुहांतून राहणाऱ्या सिंहांच्या गर्जनांनीं अरण्यें नेहमीं दुमदुमलेलीं असतात. त्या गर्जना कानांनीं ऐकवतही नाहींत. नाना प्रकारचे क्रूर व उन्मत्त पशु जिकडे तिकडे संचार करीत असतात. त्या निर्जन अरण्यांत ते माणसांच्या अंगांवर तुटून पडून त्यांचा तेव्हांच नाश करतात. नद्यांतून मोठेमोठे नक्र असतात. त्यांच्या किनाऱ्यांवर ढोंपर ढोंपर चिखल असतो. मस्त हत्तींनाही त्या नद्या ओलांडणें जड जातें. मग माणसांचा पाड काय ?

सर्व वाटा कांट्यांनीं व वेलींच्या जाळ्यांनीं भरलेल्या असतात. पिण्याकरतां पाणीही मिळण्याची मुष्कील असते.

सर्व दिवसभर वनांत फिरल्यानंतर रात्रीं गळून पडलेल्या झाडांच्या पानांची शय्या करून तीवर थकलेला देह पसरावा लागतो. सीते ! अरण्यवास मोठा कठीण आहे; म्हणून तूं मजबरोबर येऊं नको.

नाना प्रकारचे भयंकर सर्प रस्त्यांतून निर्भयपणें तेथें फिरत असतात. सीते ! वनवासाचीं दुःखें मी तुला किती सांगूं? वारा, ऊन, पाऊस हीं सहन करावीं लागतात; भूक-तहान मारावी लागते; अनेक हाल काढावे लागतात. म्हणून सांगतों, तूं हा वेडा हट्ट सोड. वनवास तुला झेपणार नाहीं.

**सीता** ( डोळ्यांत पाणी आणून )–नाथ! अरण्यांतील कष्टांचा आपण जो पाढा वाचला तो अगदीं खरा आहे; पण मी जोंपर्यंत आपल्या सहवासांत आहें तोंपर्यंत प्रत्यक्ष काळही माझ्या वाटेस जाऊं शकणार नाहीं. केवळ आपल्यावरील प्रेमामुळें मी आपण होऊन वनांत येण्याची इच्छा करीत असल्यामुळें वनांतील कोणतेंही संकट मला दुःख देण्याला समर्थ होणार नाहीं.

आपल्यावांचून माझे प्राण क्षणभरही राहणार नाहींत. याकरितां आपल्याबरोबर वनांत मी येणारच. आपला सहवास हाच मला स्वर्ग; आपला वियोग हाच नरक. म्हणून माझा अव्हेर करूं नका. मला बरोबर न्याच.

वनांत गेल्यावर आईबापांची किंवा माहेरच्या माणसांची आठवण होऊन तुझं मन उदास होईल असेंही रामचंद्रानें तिला बोलून दाखविलें. पण तिचा निश्चय ढळेना आणि राम कांहीं ऐकेना. तेव्हां शेवटीं तिनें वायकांचें शेवटचें अस्त्र बाहेर काढलें आणि ती कंठ मोकळा करून रडूं लागली!

तिनें रामाच्या गळ्याला मिठी मारली आणि आपल्या अश्रूंनीं त्याचें वक्षःस्थळ भिजवून टाकलें.

तेव्हां रामाचाही नाइलाज झाला. त्यानें तिची समजूत करीत म्हटलें:–

"लाडके, तुझी इच्छाच असेल तर चल माझ्याबरोबर. तुझा निश्चय व धैर्य यांची मला परीक्षाच पहावयाची होती. याकरतांच मीं इतके आढेवेढे घेतले. तुला दुःख देऊन मी स्वर्गाचीही इच्छा करणार नाहीं. तुझा विचार दिसल्यावांचून तूं मजबरोबर अरण्यांत चल, असें मला म्हणतां येईना; म्हणून मी असा आडरानांत शिरलों. अरण्यांत तुझें रक्षण करण्याचें सामर्थ्य माझ्या अंगीं पूर्णपणें आहे. जानकी! तुझा निश्चय चांगला आहे; आमच्या कुळाला साजेसा आहे. ऊठ तर मग आतां. वनांत जाण्याची तयारी कर. आपलें धन–द्रव्य, वस्त्रें–भूषणें वगैरे जें कांहीं असेल तें आपल्या मैत्रिणींना, नोकरांना व ब्राह्मणांना देऊन टाक. आणि कर तयारी वल्कलें नेसण्याची!"

कौसल्यादि दशरथाच्या इतर भार्या याच सुमारास तिथें आल्या होत्या. आपल्या लाडक्या पुत्रावर राज्याभिषेकाच्या ऐनवेळीं वनवास पत्करण्याची पाळी आल्याचें पाहून कौसल्येचा ऊर भरून आला होता. तिच्या तोंडून शब्द निघत नव्हता, पण तितक्यांतल्या तितक्यांत ती सीतेला उद्देशून म्हणाली:–

"सीते! आज माझा राम जरी अरण्यवासी होत आहे, तरी तूं कधींही त्याचा अनादर करूं नको. पति दरिद्री असो कीं संपन्न असो, पतिसेवा हेंच खरें पुण्य, असें जी सती असते तिला वाटतें. तेव्हां तूं त्याला नेहमीं देवाप्रमाणें मान. तूं शहाणी आहेस, तुला सांगावें असें कांहीं नाहीं. पण माझा आपला वेडा जीव म्हणून सांगत्यें."

यावर सीता हात जोडून म्हणाली:-

"आपण मला जी आज्ञा केली तीप्रमाणें अगदीं न चुकतां मी वागेन. पतीशीं कशा प्रकारें वागावें हें मला चांगलें ठाऊक आहे. सतीला न शोभणारें वर्तन मजकडून कधींही व्हावयाचें नाहीं, एवढें आपण पक्कें समजावें.

सूर्याला प्रभा जशी कधींही सोडीत नाहीं, तसा मी धर्म कधींही सोडणार नाहीं. पतीचा अनादर माझ्या हातून कसा होईल? कां होईल? पति हाच माझा देव!"

## ९ वनांत प्रवेश

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें राम, लक्ष्मण आणि सीता यांनीं वनांत जाण्याची तयारी करून तीं अयोध्येच्या बाहेर पडलीं. हजारों नागरिक त्यांना निरोप देण्यासाठीं बरोबर गेले. नदीच्या तीरावर श्रीरामचंद्रांनीं त्यांचा निरोप घेऊन त्यांना पुढें न येण्याविषयीं सांगितलें आणि तीं तिघें नदीपार होऊन पुढें निघून गेलीं.

इकडे दशरथ राजा मूर्च्छा येऊन पडला होता, त्याचें थोड्या दिवसांनीं श्रीराम-विरहाच्या दुःखानें प्राणोत्क्रमण झालें. सर्व राजवाड्यांत हाहाःकार उडाला, आणि सारी अयोध्या नगरी दुःखसागरांत बुडून गेली.

अयोध्येला घडलेल्या या प्रकाराच्या वेळीं भरत-शत्रुघ्न हे कैकेयीचे मुलगे अयोध्येंत नव्हते. ते आजोळीं होते. त्यांना तिकडे ही बातमी कळतांच ते धांवून आले. लक्ष्मणाप्रमाणें भरतही रामाचा एकनिष्ठ भक्त होता. त्याला आपल्या आईचें हें कृत्य मुळींच आवडलें नाहीं. त्यानें तिची अगदीं कठोर शब्दांत निर्भर्त्सना केली. वामनपंडितांनीं या प्रसंगाचें वर्णन करतांना भरताच्या तोंडीं पुढील वाक्यें घातलीं आहेत:-

अवो कैकेयी! हें काय। केलें तुवां हाय हाय!।
न म्हणवे तूज माय। जन्मोजन्मीं वैरिणी ॥ १ ॥

न कळत पतितार्चे खादलें अन्न ओकी ।
तरि पतित नव्हे तो, पापरूपे! अहो कीं ॥
म्हणुनि उदरिं तूझ्या देह हा जन्मला गे ।
त्यजिन तरि मला हें पाप तूझें न लागे ॥ २ ॥
केला तुवां देखत भर्तृघात ।
क्षणें तिवाटा रचिल्या तिघांत ॥
शत्रुघ्न मी लक्ष्मण राम जोडे ।
राजा तिजा तींस अनर्थ जोडे ॥ ३ ॥

असो. कैकेयीची अशी निर्भत्सना करून भरत रामचंद्राला परत बोलावून आणण्यासाठीं अयोध्येच्या बाहेर राम-लक्ष्मण निघून गेले होते त्या दिशेनें स्वतः निघाला. उभयतां बंधूंची गांठ पडल्यावर भरतानें श्रीरामचंद्राला परत येण्याविषयीं नाना प्रकारांनीं सांगून पाहिलें; पण श्रीरामचंद्राचा निर्धार ढळण्यासारखा नव्हता; तेव्हां शेवटीं उभयपक्षीं तडजोड होऊन ठरलें कीं, भरतानें रामाच्या पादुका घेऊन चौदा वर्षेपर्यंत नंदिग्रामीं रहावें व श्रीरामचंद्राचा प्रतिनिधि म्हणून तिथून अयोध्येचा कारभार पहावा; आणि राम पितृवचन पुरें करून अयोध्येला परत आल्यावर त्यानें स्वतः राजपदाधिष्ठित व्हावें.

याप्रमाणें तडजोड ठरून भरत रामपादुका घेऊन माघारा फिरला नि रामचंद्र सीता–लक्ष्मणांसह पुढें निघून गेले. कांहीं अंतर चालून गेल्यावर तेथल्या घनदाट अरण्याला सुरुवात झाली. तेव्हां श्रीरामचंद्र लक्ष्मणाला म्हणाले:—

"लक्ष्मणा, तूं पुढें चाल; सीता मध्यें असूं दे आणि मी मागून चालतों म्हणजे तुमचें दोघांचेंही मला रक्षण करतां येईल. यापुढें आपल्याला कठीण प्रवास करावयाचा आहे. कोणत्या वेळीं काय प्रसंग येईल याचा नेम नाहीं. म्हणून आपल्याला नेहमीं सावध राहिलें पाहिजे. एकमेकांनीं एकमेकांना जपलें पाहिजे.

यापुढें मनुष्याचें फारसें दर्शन व्हावयाचें नाहीं; शेतें, वाड्या, बागा, यांपैकीं कांहीं दिसणार नाहीं. खांचखळग्यांतून जावें लागेल. सपाट जमीन पहावयाला

१ चौदा वर्षांनीं रावणवध होऊन सारी मंडळी अयोध्येला परत आल्यावर एकदां सीता सख्यांशीं बोलत बसली असतां मागच्या गोष्टी निघाल्या, तेव्हां सीता म्हणाली होती, "वनांत असतांनाची मजा काय सांगावी? 'लक्ष्मण भावोजी मागें पुढें स्वामी। मज आहें धामीं ऐसें वाटे ॥'-"

मिळणार नाहीं. जानकीला आतां वनाचें स्वरूप समजेल. वनवासाच्या दुःखाचा आतां तिला खरा अनुभव येईल."

रामाच्या या सावधपणाच्या व दक्षतेच्या बोलण्यावरून अरण्यवास हा किती भयंकर असावा याची थोडीशी कल्पना सीतेच्या मनांत उभी राहिली. परंतु रामावरील तिचें निर्मल प्रेम, त्याच्या बळावरील व पराक्रमावरील तिचा अढळ विश्वास व त्याबरोबरच सृष्टिसौंदर्यानें मोहित झालेलें तिचें मन यांनीं वनवासाची ती भीति कुठल्याकुठें नाहींशी केली आणि ती आनंदानें राम सांगेल त्याप्रमाणें चालूं लागली.

## १० अनसूयेचा उपदेश

श्रीरामचंद्रांनीं दक्षिणेंतील अरण्यांत प्रवेश केल्यावर त्यांना पहिला ऋष्याश्रम लागला तो अत्रिऋषींचा. या आश्रमांत अत्रीची बायको महासाध्वी अनसूया होती. हिनें सीतेचें अत्यंत प्रेमानें स्वागत करून तिला कळकळीचा उपदेश केला. सती अनसूया ही या वेळीं अत्यंत वृद्ध झालेली होती; तिच्या सर्वांगाला वळकट्या पडल्या होत्या; केंस पिकले होते; आणि वाऱ्यानें केळ हालते त्याप्रमाणें तिचें अंग कांपत होतें. ती सीतेला म्हणाली:–

"मुली, धर्माकडे तुझी खरी नजर आहे. आपला मोठेपणा व वैभव सोडून, आप्तजनांचा त्याग करून, आपल्या पतीबरोबर तूं वनांत आलीस. धन्य आहेस तूं! पति दुःशील असला, स्वेच्छाचारी असला, दरिद्री असला, तरी सच्छील स्त्रीचें तो दैवतच आहे. स्त्रीला पतीसारखा दुसरा सखा नाहीं–पतिसेवा हेंच खरें तप आहे. केवळ स्वार्थाकरितां, आपल्या सुखाकरतां जी पतीवर प्रेम करते ती खरी पतिव्रता नव्हे. पण तुझ्याप्रमाणें ज्या स्त्रियांना आपलें हिताहित समजतें त्या खऱ्या पुण्यवान व गुणवान. या लोकीं काय, पण स्वर्गलोकींही त्यांना मान मिळतो. तात्पर्य, पतीची पाठ तूं कोणत्याही प्रसंगीं सोडूं नको."

सीतेनेंही अनसूयेला आदरपूर्वक प्रणाम करून सांगितलें:–

"बाई! मी अरण्यांत येतांना कौसल्या मातेनें मला आपल्यासारखाच उपदेश केला. विवाहाच्या वेळीं माझ्या आईनें अग्नीला साक्ष ठेवून मला जो बहुमोल बोध केला, तोही मी विसरलेली नाहीं. पति हाच स्त्रियांचा गुरु आहे हें मी जाणत्यें. निरंतर पतीची सेवा करणें हेंच स्त्रियांचें तप आहे, असा उपदेश मला सगळ्या वडील जनांनीं केलेला आहे. याच तपाच्या बळावर सावित्री स्वर्गींही देवांना

पूज्य झाली. तिच्याप्रमाणें आपणही उत्तम लोक मिळविण्याची पूर्ण तयारी मीं केली आहे."

अनसूयेनें अरण्यांत सीतेला कांहीं कमी पडूं नये म्हणून तुला कांहीं वरदान पाहिजे काय म्हणून विचारलें, तेव्हां सीता म्हणाली:-

"आपल्या अनुग्रहानें सर्व कांहीं यथास्थित आहे. मला कांहीं कमी नाहीं."

सीतेचा हा संतोष पाहून अनसूया प्रसन्न झाली आणि तिनें तिला एक दिव्य माला, दिव्य वस्त्रें, दिव्य अलंकार व दिव्य अंगराग म्हणजे जें अंगाला लावलें असतां अंग नेहमीं तजेलदार दिसतें असें एक प्रकारचें उटणें दिलें. त्या अंग-रागानें सीतेच्या देहाची कांति कांहीं अपूर्वच झाली. अशा प्रकारच्या वस्तु त्या वेळीं अरण्यांत विपुल असत आणि बहुत दिवस अरण्यांत राहिल्यानें ऋषींना व ऋषिपत्न्यांना त्यांची चांगली माहितीही असे.

## ११ पंचवटींतील निवास

अत्रिऋषींचा निरोप घेऊन हें अयोध्यापति-दांपत्य पुढें निघालें. वाटेंत अत्रिऋषींप्रमाणेंच शरभंग, सुतीक्ष्ण इत्यादि ऋषींचे आश्रमही त्यांना लागले. तिथेंही त्यांचें यथोचित स्वागत झालें. 'विराधा'दि राक्षसांशींही त्यांची गांठ पडली, पण राक्षसांशीं युद्धप्रसंग प्राप्त झाला असतां त्यांना आपल्या अमोघ बाणांनीं यमसदनाला पाठविणें हा राम-लक्ष्मणांच्या हातचा नुसता मळच होता; तेव्हां त्यांना वाटेंतल्या या अनार्य शत्रूंची मुळींच भीति वाटत नसे.

या वेळची अशी एक गोष्ट सांगतात कीं, श्रीरामचंद्र राक्षसांना वारंवार मारूं लागले तेव्हां सीतेनें त्यांना एकदां म्हटलें कीं, 'राक्षसांची ही 'हत्या' आपली अधोगति करील.'

तिनें रामाला एक जुनी गोष्ट सांगितली, ती अशी:-एकदां इंद्रानें आपलें खड्ग एका ऋषीकडे ठेव म्हणून ठेवून दिलें. खड्गाचें रक्षण व्हावें म्हणून तो ऋषि कोठेंही जावयाचें झालें तरी तें खड्ग बरोबर घेऊन जात असे. त्याचा परिणाम असा झाला कीं ऋषीला हिंसा करण्याची इच्छा उत्पन्न झाली व तो हिंसा करूं लागला. त्या हिंसेमुळें त्याच्या पुण्याचा क्षय होऊन तो ऋषि पुढें अधोगतीला गेला.

ही गोष्ट सांगून सीता रामाला म्हणालीः–आपल्याजवळ हें धनुष्य आहे त्यानेंच आपली मूळची दयार्द्र बुद्धि पालटून तुम्ही या राक्षसांची हिंसा करण्याला प्रवृत्त झालां आहां असें वाटतें. आणि मला अशीही भीति वाटते कीं त्या ऋषी-प्रमाणेंच आपलीही गति होईल.

यावर श्रीरामचंद्रांनीं उत्तर दिलें:-

"तुझी धर्मबुद्धि व दयालुत्व प्रशंसनीय आहे यांत शंका नाहीं. पण माझ्याबद्दल तूं घेतलेली शंका मात्र बरोबर नाहीं. मीं राज्य सोडलें असलें तरी वर्णधर्म सोडलेला नाहीं. दुष्टांपासून सज्जनांचें रक्षण करणें हा क्षत्रियांचा धर्म आहे. केवळ कंदमूळांवर निर्वाह करून तप करणाऱ्या निरुपद्रवी मुनींस राक्षस त्रास देत आहेत, हें पाहूनही मीं स्वस्थ बसणें योग्य होईल काय? छे! तो अधर्मच ठरेल. हातांत धनुष्य असल्यामुळें केवळ करमणुकीखातर त्याचा कुठेंतरी उपयोग करावा अशा बुद्धीनें मी राक्षसांचा वध करतों असें नाहीं; केवळ धर्म-रक्षणार्थंच मी त्यांचा वध करीत आहें." असो.

पुढें फिरतां फिरतां त्यांनीं एका ठिकाणीं पांच वडांच्या झाडांची गर्द छाया पाहिली आणि हें ठिकाण कांहीं दिवस मुक्काम करण्याला सोयीचें आहे असें ठरवून त्यांनीं त्या वडांच्या छायेंत आपली एक पर्णकुटिका तयार केली. त्याच्या अगोदर थोडे दिवस तपोवन नांवाच्या भागीं अगस्ति ऋषि त्यांना भेटले होते व त्यांनीं त्यांना एक दिव्य धनुष्य, ब्रह्मदत्त नांवाचा एक तेजस्वी बाण आणि अनेक बाण राहणारे कित्येक भाते नजर केले होते. अरण्यांत फिरतांना सीता-देवीची फार काळजी घेण्याविषयींही त्यांनीं रामाला सांगितलें होतें आणि त्यांच्या सांगण्यावरूनच वरील पांच वडांची जागा (पंचवटी) त्यांनीं कांहीं दिवस राहण्याला पसंत केली होती.

या ऋषिमुनींशिवाय त्या अरण्यांत इतरही कित्येक अनार्य वा द्रविड जातींचे पण सात्विक वृत्तीचे व दयाळु अंतःकरणाचे पुरुष रामाला भेटत. राक्षस हे फार शक्तिमान असले तरी दुष्ट, क्रूर व बहुधा नरमांसभक्षक असत. त्यांच्या व या सात्विक वृत्तीच्या अनार्य वा द्रविड लोकांच्या नेहमीं लढाया होत. अर्थात् समान-शत्रुत्वामुळें त्यांचें श्रीरामचंद्राशीं सख्य होण्याला वेळ लागत नसे.

दण्डकारण्यांत आल्यावर श्रीरामाला जटायु नांवाचा एक गृध्र जातीचा धिप्पाड पुरुष भेटला. त्याची व दशरथ राजाची ओळख होती इतकेंच नव्हे, तर तो

दशरथाचा चांगला मित्र होता असेंही रामाला समजलें. तेव्हां रामानें त्याची सर्व पूर्वहकीकत विचारून घेतली, त्याला चुलत्याप्रमाणें मान दिला आणि त्याचा चांगला परामर्ष घेण्याचें कबूल केलें. त्यानेंही उलट राम-लक्ष्मण बाहेर जातील तेव्हां त्यांच्या आश्रमांत पहारा करून सीतेचें रक्षण करण्याचें कबूल केलें.

राम-लक्ष्मणांनीं सकाळीं उठून स्नानसंध्यादि नित्यकर्में आटोपून मृगयेकरितां अरण्यांत जावें, सृष्टिसुंदरीचें मनमुराद दर्शन घेऊन आणि रानांतील नानाप्रकारचीं कंदमुळें व फळें जमा करून आश्रमांत आणावीं आणि सर्वांनीं एकत्र बसून त्यांचा आस्वाद घ्यावा; सीतामाईनें पर्णकुटींतील 'प्रपंच' नीटनेटक्या रीतीनें सांभाळावा आणि मधून मधून शेजारच्या ऋषींच्या आश्रमांत जाऊन ऋषिपत्नयांशीं धर्मचर्चा करावी व त्यांचे आशीर्वाद घ्यावे असा त्यांचा दिनक्रम असे.

अशा रीतीनें दण्डकारण्यांतल्या त्या आश्रमांतील पतिपत्नींचें व बंधु-बंधूंचें परस्पर प्रेम आणि पर्णकुटींतील शांति व समाधान पाहून इंद्राच्या नंदनवनानेंही लाजेनें मान खालीं घालावी अशा प्रकारचें वातावरण श्रीरामचंद्र राहात असत त्या पंचवटींत लौकरच उत्पन्न झालें.

## १२ रावणाचें अदृष्ट

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें या हद्दपार झालेल्या राजपुत्रांचे वनवासांतील दिवस मोठ्या आनंदांत चालले होते, तोंच एके दिवशीं 'शूर्पणखा' नांवाची एक राक्षसकुमारी श्रीरामाला भेटली. श्रीरामाचें रूप पाहून ती मोहित झाली आणि तिनें आपल्याला वरण्याविषयीं रामाला गळ घातली!

रामानें थट्टेनें माझ्यापेक्षां माझा भाऊ लक्ष्मण तुला चांगला नवरा शोभेल असें सांगून तिला लक्ष्मणाकडे पाठविलें. ती लक्ष्मणाकडे आली तेव्हां लक्ष्मणानें तिचा हा उद्धटपणा पाहून तिचें नाक आणि कान कापून टाकले! तेव्हां ती मोठमोठ्यानें ओरडत आपला भाऊ खर याच्याकडे गेली.

---

१ वाल्मीकि--रामायणांत या शूर्पणखेचें वर्णन केलें आहे तें असें:--

पोट घागरीसारखें, डोळे लहान व पिचके, केंस तांबडे व रांठ, तोंड हिडिस, स्वर कर्कश, भाषण ग्राम्य. तरी पण ती रामाला म्हणाली, "ही तुझी बायको सीता अगदीं कुरूप आहे; ती तुला मुळींच शोभत नाहीं. तेव्हां मी तिला खाऊन टाकतें आणि मग आम्हीं या दण्डकारण्यांतील निरनिराळ्या ठिकाणीं मन मानेल तसा विहार करूं या!"



खराला राम-लक्ष्मणांचा फार राग आला आणि तो आपले इतर स्नेहीसोबती जमा करून राक्षसांचें भलें मोठें सैन्य घेऊन राम-लक्ष्मणांवर चालून आला. उभयपक्षीं तुंबळ युद्ध झालें. पण शेवटीं राक्षसांचा पराभव होऊन शेंकडों राक्षस मारले गेले आणि उरले ते रानावनांतून पळाले.

त्यांतला अकंपन नांवाचा एक राक्षस लंकेंत रावणाकडे गेला आणि त्यानें उत्तरेकडून राम आणि लक्ष्मण असे दोन मानव प्राणी दंडकारण्यांत येऊन वस्ती करून राहिले आहेत, त्यांच्यापैकीं रामाची बायको सीता ही अति रूपवान असून, अप्सरा, गंधर्वकन्या अगर नागस्त्रिया यांतही तिच्या तोडीची सुस्वरूप स्त्री कोणी मिळणार नाहीं, असें तिचें वर्णन करून 'तूं तिला प्राप्त करून घे' असा त्याला उपदेश केला. खर आणि शूर्पणखा यांची या राम-लक्ष्मणांनीं काय अवस्था केली हेंही त्यानें रावणाला सांगितलें.

रावणाला सीतेच्या स्वयंवराच्या वेळची आठवण होतीच. त्यानें तात्काळ ही संधि बरी आहे असें जाणून दंडकारण्यांत जाण्याची तयारी केली. वाटेंत मारीच म्हणून त्याचा एक स्नेही होता. त्याची या कामीं मदत मिळावी म्हणून त्याच्याकडे उतरून त्यानें आपल्या या स्वारीचें प्रयोजन त्याला सांगितलें. पण मारीच हा राक्षस

असला तरी दुर्वृत्त नव्हता. शिवाय विश्वामित्राच्या मखरक्षणाच्या वेळचा रामाचा पराक्रम त्याला माहीत होताच. त्यानें 'परदारापहरणाचें पातक तूं करूं नको, त्यानें तुझा नाश होईल' म्हणून रावणास सांगून त्याला परत पाठवून दिलें; पण रावणाचें अदृष्टच ओढवलें होतें, त्याला तो तरी काय करील? शूर्पणखेचें व त्याचें सावत्र वहिणीचें नातें होतें. ती आपलें तें निर्नासिक आणि निःकर्ण रूप घेऊन रावणाकडे आली आणि मर्मभेदक भाषणांनीं त्याची निर्भर्त्सना करून त्याला तिनें सीताहरणाला पुनः प्रवृत्त केलें!

## १३ कपटप्रयोग

रावण आतां सीतेला घेतल्याशिवाय परत लंकेला यावयाचें नाहीं असा निश्चय करून निघाला. वाटेंत त्याला राम-लक्ष्मणांच्या पराक्रमाच्या पुष्कळ गोष्टी समजल्या. तेव्हां अंगबलानें नव्हे तर कपटानें राम-लक्ष्मणांना फसवून सीतेला पळवून आणावी अशी मसलत त्यानें योजिली. कारण राक्षस हे त्या वेळीं जसे शरीरबलांत तसे कपटविद्येंतही अग्रेसर होते.

दण्डकारण्यांत जातांना तो पूर्वीप्रमाणेंच आपला स्नेही मारीच याजकडे उतरला. मारीचानें पुनः त्याचा निषेध करून त्याला या पापकर्मापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. तो रावणाला म्हणाला, "अरे, 'विनाशकाले विपरीतबुद्धिः' म्हणतात तें यालाच! तुला ही बुद्धि स्वतःच सुचली कीं दुसऱ्या कोणीं सुचविली? स्वतःच सुचली असेल तर तुझें पुण्य संपलें म्हणावयाचें! दुसऱ्यानें सुचविली असेल तर तो तुझा हितशत्रूच असला पाहिजे...तूं आपणांस राजा म्हणवितोस; पण तुझे पदरीं चांगले सल्लागार नसावे. कारण तसें असतें तर असा भलताच विचार मनांत आणून तूं मरणाला आमंत्रण देण्यास तयार झाला नसतास! अजून सावध

---

१ या वेळीं शूर्पणखेनें रावणाला काय सांगितलें असेल त्याची एकानें पुढीलप्रमाणें कल्पना बसविली आहे:–"अरे, आपल्या आयाबहिणींचा उपमर्द होत असतां कोणता पुरुष स्वस्थ राहील! जो स्वस्थ राहील तो पुरुष कसला? निःसंशय तो षंढच म्हटला पाहिजे! अरे, त्या दशरथाच्या पोरानें माझें नाक व कान कापले तरी आपला तूं स्वस्थच! प्रत्यक्ष तुझा भाऊ खर व दूषण प्रभृति चौदा हजार राक्षस त्या दुष्टानें ठार केले तरीसुद्धां त्याला शासन करण्याचें तूं मनांत आणीत नाहींस, यावरून तुझा पराक्रम समजला! तुला भाऊ म्हणण्याचीही मला लाज वाटते! रावणा, तूं खरोखर सिंहासनावर बसण्यास नालायक आहेस असें मी स्पष्ट म्हणतें!"

हो. मनांतली गोष्ट मनांतच ठेव. ती मनांतून काढून टाकशील तर उत्तमच, पण जनांत प्रगट करून हंसें तरी करून घेऊं नकोस!"

पण रावणानें त्याला उत्तर दिलें:—"मारीचा, तुझें पुराण ऐकण्याला मी येथें आलों नाहीं. माझा निश्चय बदलणार नाहीं. तूं मला साह्य न करशील तर तुला जीवंत ठेवून तरी मला काय करायचें आहे! मी प्रथम तुलाच ठार करतों! पुढील विचार पुढें. समजलास?"

यावर मग मारीच तरी काय बोलणार? शेवटीं मित्रकार्य म्हणून मारीचानें रावणाला मदत करण्याचें कबूल केलें. आणि दोघांनीं दोन निरनिराळे वेष घेऊन रामचंद्राच्या पंचवटींतील पर्णकुटीकडे जावें असें ठरलें. मारीचानें एका सुवर्णमृगाचें रूप घेतलें आणि तो ठुमकत मुरडत पंचवटींतील त्या पर्णकुटीकडे आला. त्याच्या या वेळच्या सौंदर्याचें वर्णन रामायणांत पुढीलप्रमाणें केलें आहे—

'त्याचें शरीर सुवर्णाचें असून त्यावर नवरत्नें जडविल्याप्रमाणें सुंदर ठिपके दिसत होते. त्याचे खूर इंद्रनील रत्नांचे केले आहेत कीं काय असें भासे व दांतांचे ठिकाणीं हिरकण्या असल्याप्रमाणें वाटत असे. त्याच्या शरीराची प्रभा अशी कांहीं चमकत असे कीं पहाणारांचे डोळेच दिपत!'

असा हा मारीच मृग रामाचे आश्रमाजवळ येऊन वागडूं लागला. तो नजीकच्या बागेंत जाई व घाबरल्यासारखें दाखवून पुनः बाहेर येई. केव्हां कावराबावरा झाल्याप्रमाणें सभोंवार पाही तर केव्हां शांतपणें चरत राही. केव्हां कंदुकक्रीडेप्रमाणें टुण टुण उड्या मारी तर केव्हां स्वस्थ उभा राही. असे प्रकार करतां करतां तो सीतेच्या दृष्टीस पडला आणि सीतेनें आपल्याला पाहिलें अशी खात्री झाल्यावर तो तिथून हळूच मागें पहात पहात दूर निघून गेला.

सीतेची दृष्टी या मृगाकडे गेली तेव्हां ती त्याच्या अंगयष्टीच्या सौंदर्यानें मोहित झाली आणि त्या मृगाचें कातडें आपल्याला कंचुकीसाठीं मिळेल तर पाहिजे असें म्हणाली. लक्ष्मणानें तो कोणीतरी मायावी राक्षस असेल अशी शंका घेतली. पण सीतेला तसें वाटेना आणि तिनें हट्टच घेतला कीं, मला त्याचें कातडें पाहिजेच!

शेवटीं रामानें त्याचा पाठलाग करण्याचें कबूल केलें आणि तो आपले धनुष्यबाण घेऊन बाहेर पडला. मृगानें त्याला चाळवीत चाळवीत लांब अंतरावर नेलें आणि रामानें बाण सोडल्याबरोबर "हा सीते! हा लक्ष्मणा!" अशी आरोळी ठोकून प्राण सोडला!

# १४ अविवेकः परमापदां पदम् !

मायावी मारीचाची ती हांक ऐकून सीता घाबरून गेली. तिचा तोल सुटला आणि ती लक्ष्मणाला म्हणाली, "भावोजी, धांवा ! रामावर कांहींतरी संकट आलें असावें. देवा ! काय भयंकर प्रसंग माझ्यावर आणलास हा ! भावोजी ! चला, वाट पाहूं नका."

पण लक्ष्मणाची खात्री होती कीं रामचंद्राला या अरण्यांत राक्षसांपासून भिण्याचें मुळींच कारण नाहीं. त्याचा बाण कधींच फुकट जावयाचा नाहीं आणि राक्षस कितीही बलाढ्य असले तरी त्याच्यापुढें त्यांचें कांहीं चालावयाचें नाहीं. म्हणून तो तिला म्हणाला:–

"वहिनी, तूं अगदीं भिऊं नको. रामाला कसलेंही भय नाहीं. राम असा शोकानें कधीं ओरडणार नाहीं. तुला एकटीला इथें टाकून मी कसा जाऊं? तूं भिऊं नको. धीर धर. रामचंद्रजी इतक्यांत परत येतील."

पण सीतेचें समाधान होईना. राम म्हणजे तिचा केवळ प्राण. त्याच्यावर खरोखरच संकट आलें आहे अशी तिची समजूत. तेव्हां लक्ष्मणाच्या धीराच्या शब्दांचा भलताच अर्थ करून ती विचार न करतांच त्याला म्हणाली:–"रामाच्या रक्षणासाठीं तुम्ही धांवून जात नाहीं, यावरून तुमच्या मनांत कांहीं पाप असावें असें मला वाटतें. रामाची सेवा करावी हें तुमचें नुसतें ढोंग असावें. त्यांच्यावर संकट आलें कीं आपला डाव साधावा अशीच तुमची इच्छा दिसते !"

लक्ष्मणासारख्या एकनिष्ठ बंधूच्या काळजावर घाव घालणारे किती कठोर शब्द हे ! पण सीतेच्या तोंडून ते निघाले खरे.

लक्ष्मण मात्र ते शब्द ऐकूनही तिच्यावर रागावला नाहीं. तो शांतपणें म्हणाला, "वहिनी, काय बोलतां हें? हें अरण्य घोर असलें तरी रामाच्या केंसालाही धक्का लावण्याची कोणाची प्राज्ञा नाहीं हें तुम्हांला माहीत नाहीं का? कोणा तरी मायावी राक्षसाचे हे शब्द असतील किंवा तो हरिणच एकादा राक्षस असेल. त्यानें मरतां मरतां हे शब्द मुद्दाम आम्हांला फसविण्यासाठीं काढले असतील. तुम्हांला एकटीला इथें सोडून जावयाचें नाहीं अशी मला रामचंद्रजींची आज्ञा आहे. ती कशी मोडूं?"

पण लक्ष्मणाच्या या बोलण्याचा सीतेच्या घाबरलेल्या व भांबावलेल्या मनावर

कांहींच परिणाम झाला नाहीं. ती उलट लक्ष्मणावर अधिकच रागावली व म्हणाली:—

"दुष्टा, राम मरावा अशीच तुझी इच्छा दिसते. पण यांत आश्चर्य तरी कसलें? सावत्रभाऊ असेच असतात. ते बाहेरून गोड बोलून केंसानें गळा कापतात! माझ्या प्रातीचीच इच्छा तुझ्या पोटांत आहे; किंवा तुझा त्या भरताकडे ओढा असेल. पण लक्षांत ठेव; मी तुझा हेतु साधूं देणार नाहीं. तुझ्यासमक्ष मी इथें प्राण देत्यें! रामाविरहित मी या जगांत क्षणभरही राहाणार नाहीं."

सीतेचे हे शब्द म्हणजे कानांत ओतलेलें तापलेलें तेलच! लक्ष्मणाला पुढें काय बोलावें व काय करावें तें सुचेना. तो आश्चर्यमूढ होऊन स्तब्ध उभा राहिला.

पण असा नुसता उभा तरी किती वेळ राहाणार! तो सुज्ञ होता, विचारी होता; सीतेच्या क्रोधयुक्त भाषणाला तसलेंच उत्तर देणें त्याला शक्य होतें; पण त्यानें तसें केलें नाहीं. उलट अत्यंत आत्मसंयम ठेवून तो म्हणाला:—

"वहिनी, तूं मला अगदीं देवीसमान आहेस. तुला उलटून बोलावें हा माझा धर्म नाहीं. अविचारानें भलतेंसलतें बोलणें हा स्त्रियांचा स्वभावच आहे. तेव्हां तूं जें कांहीं बोललीस त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. तुझ्या कठोर भाषणानें माझें अंतःकरण अगदीं पोळून गेलें आहे. येथील सर्व वनदेवतांना साक्षी ठेवून मी असें सांगतों कीं, मी जें कांहीं बोललों तें केवळ तुझ्या हिताकडे लक्ष देऊनच बोललों. पण तुला तें विपरीत वाटतें हें माझें दुर्दैव! आणखी काय सांगूं? तुझी आज्ञाच आहे तर हा पहा मी राम गेला आहे तिकडेच जातों. या इथल्या वन-देवताच आतां तुझें रक्षण करोत."

असें म्हणून सीता अश्रु ढाळीत असतांच लक्ष्मण आपले धनुष्यबाण घेऊन क्षुब्ध मनानेंच राम ज्या बाजूला गेला होता तिकडे निघून गेला.

सीतेचें या वेळचें हें वर्तन जितकें चमत्कारिक तितकेंच दुःखदायक होतें.

सीतेचा जीव रामाच्या जिवाशीं तन्मय झाला होता; त्या रामाचा जीव धोक्यांत आहे अशी सीतेला शंका आली; त्यानें ती घाबरून केवळ वेडी झाली; या सगळया गोष्टी खऱ्या. पण अशा वेळीं सारासार विचार न सुटणें यांतच खरोखर मनुष्याचा मोठेपणा आहे.

या प्रसंगीं सीता या मोठेपणाच्या कसोटीला उतरली नाहीं. सामान्य स्त्री-जातीला शोभणारेंच तिच्या हातून आचरण झालें हें कबूल करावें लागतें.

कदाचित् पुढें तिच्यावर जी विपत्ति यावयाची होती ती येण्याला अवकाश मिळावा, म्हणून तिला ही दैवयोगानें विपरीत बुद्धि झाली असावी. नाहींतर सीते-सारख्या सर्वगुणसंपन्न स्त्रीच्या हातून असें विपरीत आचरण कसें व्हावें हा प्रश्न बरोबर सुटत नाहीं.” (–किनरे)

## १५ दुर्धर प्रसंग

लक्ष्मण बाहेर निघून गेला असें पाहून जवळच रावण बैराग्याच्या वेषानें लपून बसला होता तो पुढें झाला आणि पर्णकुटीच्या दाराबाहेर उभा राहून भिक्षा वाढण्याविषयीं सीतेला सांगूं लागला. सीता हातांत भिक्षाद्रव्य घेऊन पर्णकुटीच्या दाराबाहेर आली तोंच रावणानें तिला झटकन उचलून खांद्यावर घेतली आणि सूंबाल्या करून तो वायुवेगानें पळत सुटला!

या वेळीं सीतेची मनःस्थिति काय झाली असेल याची कल्पनाच केली पाहिजे. रावण तिला घेऊन जात असतां ती मोठमोठ्यानें आक्रोश करून वाटेंतल्या पशुपक्ष्यांनाच नव्हे, तर लतावृक्षांनाही सांगे–“माझ्या रामाला असें सांगा कीं, तुझी लाडकी सीता एका राक्षसानें पळवून नेली!”

राम वनवासांत आल्यावर जटायूची व त्याची गांठ पडली होती आणि हा दशरथाचा मित्र होता हें मागें सांगितलेंच आहे. रावणानें सीतेला उचललें त्या वेळीं जटायु तिथें नव्हता. पण पुढें नजीकच त्याची व रावणाची गांठ पडली, तेव्हां जटायूनें त्याला अडविलें. दोघांचें कांहीं काल युद्धही झालें. पण त्यांत शेवटीं जटायु हरला. त्यानें आपलें मरण आपल्या पंखांत आहे असें भाबडेपणानें रावणाला सांगितलें, तेव्हां रावणानें त्याचे पंखच उपटून काढले, त्यामुळें तो विव्हळत खालीं पडला.

जटायूशीं चाललेल्या युद्धाच्या वेळीं सीता एका वृक्षाला घट्ट कवटाळून धरून उभी होती. जटायु खालीं पडल्याबरोबर रावण तिथें आला आणि त्यानें तिचे केंस जोरानें धरून तिला खांद्यावर घेतलें आणि आकाशांत उड्डाण केलें!

त्या वेळच्या प्रसंगाचें काय वर्णन करावें? त्या वेळच्या धडपडींत सीतेच्या डोक्यांतील फुलें, पायांतील नूपुरें, हातांतलीं कांकणें नि गळ्यांतला हार तुटून खालीं पडला. ‘हा रामा! हा लक्ष्मणा!’ असा तिचा विलाप चालूच होता. जातां जातां या राक्षसानें आपल्याला सोडावें म्हणून ती केव्हां दीनवाणीनें

त्याची विनवणी करी, तर कधीं कठोर भाषणांनीं त्याची निर्भर्त्सना करी. पण रावणानें तिकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. तो तडक लंकेच्या बाजूनें निघाला होता.

इतक्यांत एका पर्वताच्या शिखरावर पांच वानर बसलेले तिनें पाहिले. तेव्हां ते ही बातमी रामाला सांगतील अशा आशेनें तिनें आपल्या रेशमी उत्तरीय वस्त्रांत कांहीं अलंकार बांधले आणि ते त्यांच्याकडे टाकून दिले. जाण्याच्या घाईंत असल्यामुळें रावणाच्या लक्षांत ही गोष्ट कांहीं आली नाहीं. असो.

जटायूचा संपाति नांवाचा एक भाऊ होता, त्याचे पंख कांहीं कारणामुळें जळून जाऊन तो दण्डकारण्यांतल्या एका पर्वतशिखरावर पडून होता. त्याचा मुलगा सुपार्श्व बापाची सेवाचाकरी करून त्या अरण्यांत राहात असे. जटायूशीं चाललेली झटापट आटोपून रावण पुढें निघाला तों त्याची सुपार्श्वाशीं गांठ पडली. सुपार्श्वानेंही त्याला अडवून त्याच्याशीं युद्ध केलें. या युद्धांत रावणाचा पराभव झाला. पण त्याला कसेंही करून लंकेला लौकर जावयाचें असल्यामुळें त्यानें सुपार्श्वाशीं ज्यास्त वेळ युद्ध न करतां त्याला शरण जाण्याचें ठरविलें आणि शरण आलेल्याला सोडून द्यावें अशी प्राचीन राजनीति असल्यामुळें सुपार्श्वानें त्याला सोडून देऊन ही सारी हकीकत बापाला येऊन सांगितली.

संपातीला या बातमीनें आनंद झालासा दिसला. कारण ज्या वेळीं त्याचे पंख जळून गेले होते, त्या वेळीं त्याला एका ऋषीनें सांगितलें होतें कीं, रामचंद्र सीताशोधार्थ या बाजूला येईल त्या वेळीं तुझ्या तोंडून सीतेची बातमी त्याला कळली म्हणजे तुला पुनः पंख फुटतील. त्याप्रमाणें तो आतां श्रीरामचंद्र या बाजूला केव्हां येतो म्हणून वाट पहात राहिला होता.

## १६ श्रीरामाची शोकाकुलता

रावण सीतेला घेऊन लंकेला निघाला त्याच वेळीं तिकडे त्या सुवर्णमृगरूपी मारीचाच्या मागें लागलेले राम आणि लक्ष्मण त्याचा वध करून परत पर्णकुटींत आले. तों तिथें काय? सीता पर्णकुटींत नाहीं!

सीतेचें रामावर जसें निर्व्याज प्रेम होतें तसें रामाचेंही सीतेवर होतें. सीता नाहींशी झाल्यामुळें त्याला परम दुःख झालें. आपण नको नको म्हणत असतां तिनें अरण्यांत येण्याचा हट्ट घेतला आणि अरण्यांत आल्यावर आतां ही दशा! तिला कोणीं राक्षसानें पळवून नेली, कीं एकाद्या हिंस्र पशूनें तिच्यावर झडप घालून

अनुक्रम ७.७.७५ नों. दि. २०१७१

तिला फाडून खाली, समजावें तरी काय? तिचे एकेक गुण आठवत चालले तसतसा राम सीता-वियोगानें अधिकच हळहळूं लागला. शेवटीं तर त्याची इतकी दीनवाणी अवस्था झाली आणि त्याला सीतेचा इतका ध्यास लागला कीं, वाटेंत सांपडलेल्या झाडालाही मिठी मारून तो 'हा सीते! हा सीते!' म्हणून शोक करूं लागला!

या वेळच्या रामाच्या अवस्थेचें वर्णन कवींनीं केलें आहे तें हृदयद्रावक आहे:—

जातां जातां वृक्ष, लता, पशु, पक्षी जें कांहीं समोर दिसेल त्याला तो सीतेची बातमी विचारीत सुटला. कदंबवृक्षाला कवटाळून तो म्हणाला, "कदंबा, माझ्या सीतेचा तूं अगदीं लाडका वृक्ष आहेस. तूं जर तिला पाहिलें असलेंस तर ती कोठें आहे हें सांग." तिलक वृक्षाला उद्देशून तो म्हणाला, "तूं सर्व वृक्षांत श्रेष्ठ आहेस, तशीच माझी जानकीही सर्व स्त्रियांत श्रेष्ठ आहे. तुझ्या चारही बाजूंना भ्रमर गुंजारव करीत आहेत. जानकीच्या मनांत तुझ्याविषयीं विशेष आदर आहे. ती कुठें गेली आहे हें तुला ठाऊक असलेंच पाहिजे." अशोक वृक्षाला तो म्हणाला, "मी शोकानें केवळ वेडा बनलों आहें. या वेळीं जानकीचें मला दर्शन घडवून तूं आपल्या नांवाप्रमाणें माझा शोक दूर करशील का?"

वृक्षवल्लींप्रमाणेंच त्या वनांतील पशूंनाही तो असलेच प्रश्न करी. एकादा मृगांचा कळप दृष्टीस पडला कीं तो त्यांना हटकून म्हणे, "मृगांनो, मृगनयना जानकी तुमच्या पक्की ओळखीची आहे. तुमच्या संगतीनें ती अरण्यांत भ्रमण करण्याकरतां का गेली आहे?" हत्ती दिसला कीं तो त्याला विचारी, "हे गजा, माझी गजगामिनी प्रिया तूं पाहिलीस का?" मध्येंच त्याला सीता पुढें धांवत चालल्याचा भास होई, तेव्हां तो म्हणे, "हे कमललोचने, तूं अशी धांवतेस कां? मीं तुला पाहिलें, पाहिलें बरें! तूं या वृक्षांच्या आड लपली आहेस. तिथूनच माझ्याशीं

---

१ गिरी गोळपीठें मही माळ माथें। तटें गौतमीच्या नदी नीरपंथें॥
रमानाथ तो धांवतां साद घाली। मुखें जानकी! जानकी! हेच बोली॥ १॥

× × × ×

रे रे वृक्षा गिरींद्रा कुरग मृगपते, चारुचंद्रा सतीतें।
बिंबोष्ठी पद्मनेत्री जघनघनकटीं मेखलाबंध जीतें॥
ते माझी प्राणप्रीया सकलगुणनिधी चोरुनीयां अरण्यीं।
नेता तो कोण सांगा, सकळ मज तुम्ही शांतवा प्राणदानीं॥ २॥

—मुक्तेश्वर

कां भाषण करीत नाहींस बरें? वेडे, जरा थांबना! अशी निर्दय होऊं नको. माझी तुला करुणा येऊं दे. तूं अशी थट्टा आजपर्यंत कधीं केली नाहींस मग आजच तुला अशी थट्टा कां बरें आठवली? सीते, तुझें तें पिवळें रेशमी वस्त्र मीं ओळखलें बरें! तूं धांवत चालली आहेस हें मला दिसतें आहे. तुझ्या मनांत जर कांहीं माझ्याविषयीं प्रेम म्हणून असेल तर थांब, पुढें जाऊं नको!" पण पुढें हा सारा भासच आहे हें लक्षांत येतांच तो अधिकच कष्टी होई.

## १७ अशोकवनांतील बंदिवास

मागें पंधराव्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें जटायूला मरणोन्मुख अवस्थेंत टाकून आणि सुपार्श्वाशीं शरणागति पत्करून रावण सीतेला घेऊन निघाला तो आतां मध्यें बिलकुल न थांबतां एकसारखा धांवत सुटला!

शेवटीं त्यानें एकदां लंका नगरी गांठली आणि तिथल्या अशोक नांवाच्या वनांत सीतेला राक्षस-स्त्रियांच्या कडक पहाऱ्यांत नेऊन ठेविलें!

सीतेच्या या बंदिशाळेंतील पहारेकरी राक्षस स्त्रियांचें वर्णन रामायणांत केलें आहे, त्यांत म्हटलें आहे:-

---

१ सीतेबद्दल त्याच्या मनांत केवढा प्रेमा होता हें वनवासांतील यापुढच्या एका प्रसंगावरून ध्यानांत येईल.

रामसुग्रीवांचें सख्य झाल्यावर सुग्रीव सीतेच्या शोधाच्या प्रयत्नांत दिरंगाई करीत आहे, अशी शंका येऊन रामचंद्र एकदां लक्ष्मणाला म्हणाले, "अरे, तो इतक्या दिवसांत एकदां भेटण्याससुद्धां आला नाहीं. तेव्हां "अनाथो हतराज्योऽयं रावणेन च धर्षितः। दीनो दूरगृहः कामी मां चैव शरणंगतः॥" असेंच तो मानीत असावा; म्हणूनच तो माझी पर्वा करीत नसेल."

यावर लक्ष्मण म्हणाला, "रामा, असा उतावीळपणा करून कसें चालेल? मनाला थोडें आवरून धर. असल्या शंका काढून मनाला दुःखी करण्यापेक्षां समाधि लावून बसलास तर काय बिघडेल?"

रामचंद्र म्हणाले, "बरें बाबा, आतां मी सगळी काळजी सोडून ध्यानच करीत बसतों. म्हणजे झालें कीं नाहीं?"

असें म्हणून त्यांनीं ध्यान सुरू केलें. पण या वेळीं त्यांच्या ध्यानाची देवता कोणती होती? "जें मनीं तें ध्यानीं" हेंच खरें. सीतेवांचून त्यांना ध्यानांतही कांहींच दिसेना!

"या राक्षसींपैकीं कोणाला एकच डोळा तर कोणाला एकच कान होता. कोणाचे कान वस्त्राप्रमाणें पांघरतां येतील इतके लांब होते, कोणाला मुळींच नव्हते, तर कोणाला शंकूप्रमाणें होते. कोणाच्या नाकांचीं भोंकें वर असल्यामुळें श्वासोच्छ्वास मस्तकांतून चालला होता. कोणाचें मस्तक मोठें तर कोणाची मान बारीक होती. कोणाचे केंस मुळींच गेले होते, तर कोणाच्या केंसाचे योगानें आयती घोंगडी बनली होती. कोणाचे कान व कपाळ लांब, तर कोणाचें उदर व स्तन लांब होते. कोणाचे ओंठ खालीं लोंबत होते तर कोणाचे हनुवटीला जखडले होते. एकीचें मुख लांब तर एकीचे गुडघे लांब, कोणी खुजी तर कोणी ढांगळ, कोणी कुबडी तर कोणी वांकडी, कोणी ठेंगणी तर कोणी भयंकर उंच होती. कित्येकांचीं तोंडें वाघ, म्हैस, कोल्हा, हत्ती, उंट, घोडा यांप्रमाणें होतीं. कोणाला एकच हात तर कोणाला एकच पाय होता." ( रामायण-समालोचना )

लंकेंतील या अशोकवनाची श्रीमंती मात्र सांगण्यासारखी आहे.

"त्या वनांत ठिकठिकाणीं चांदी-सोन्याची व रत्नांची फरशी केलेली होती. मधून मधून उत्तम सुगंधित जलानें भरलेल्या नाना आकारांच्या वापी दिसत होत्या. त्यांना चारी बाजूंनीं उतरण्यास मौल्यवान रत्नांच्या पायऱ्या केलेल्या होत्या. सभोंवतीं मुक्ताप्रवाळांची वाळू, पाण्याखालीं स्फटिकाची फरशी, कांठांवर चित्रविचित्र सोन्याचे कृत्रिम वृक्ष असा त्या दिव्य वापींचा थाट होता. एका बाजूला एक कृत्रिम पहाड होता. त्या पहाडावरून एक नदी खालीं पडत होती. तिच्या कांठचे वृक्ष इतके लवले होते कीं, त्यांच्या कांहीं फांद्या पाण्यापर्यंत पोहोंचल्या होत्या. बंधुजन निवारण करीत असतांही जशी एकादी स्त्री क्रोधानें प्राण देण्याकरतां कड्यावरून पडावी, त्याप्रमाणें ती नदी त्या वृक्षांमुळें दिसत होती. नदीच्या बाजूला लतामंडप असून ते पानांनीं अगदीं झांकलेले होते.··· दुसऱ्या एका ठिकाणीं अनेक अशोक वृक्षांनीं वेष्टिलेली रत्नस्तंभांची एक शाला होती."

रावणानें सीतेसाठीं योजलेला बंदिखाना अशा प्रकारचा होता.

## १८ रामलक्ष्मणांचें परिभ्रमण

सीताविरहामुळें उत्पन्न झालेला शोकाचा पहिला आवेग निघून गेल्यावर राम-लक्ष्मणांनीं पुढें काय करावें याचा विचार चालविला.

सीता व्याघ्र-सिंहाच्या भक्ष्यस्थानीं पडली नसेल, तर एकाद्या मायावी

राक्षसानेंच तिला पळवून नेली असली पाहिजे आणि सुवर्णमृगाच्या बाबतींत नुकताच जो अनुभव आला त्यावरून हेंच अधिक संभवनीय आहे असें अनुमान त्यांनीं बांधलें आणि पंचवटींतील मठी सोडून पूर्वेकडे आणि दक्षिणेकडे सीता-शोधार्थ निघून जाण्याचें त्यांनीं ठरविलें.

कांहीं दिवसांनीं त्यांना वाटेंत जटायु भेटला, तो या वेळीं आसन्नमरण होऊन पडला होता. राम-लक्ष्मणांची गांठ पडतांच त्याला आनंदाचें भरतें आलें. त्यानें सर्व हकीकत रामाला सांगितली आणि इतके दिवस जिवंत राहिल्याचें सार्थक झालें असें वाटून लौकरच प्राण सोडला.

राम-लक्ष्मणांनीं तो आपल्या पित्याचा मित्र म्हणजे चुलत्याप्रमाणेंच आहे असें मानून त्याची उत्तरक्रिया केली. पुढें संपातीची गांठ पडल्यावर सीतेला रावणानें पळवून नेली याबद्दल संशय राहिला नाहीं, तेव्हां ते पुढें दक्षिणेकडे निघाले. वाटेंत त्यांना प्रथम क्रौंचारण्य लागलें. त्यांतून पार पडून पूर्वेस गेल्यावर आणखी एक घोर वन त्यांना लागलें. त्याच्यापुढें त्यांना एक दरी लागली. ती दरी ओलांडून पुढें जातात तो त्यांना पुन्हां एक महारण्य लागलें. त्यांतून ते जात असतांना त्यांना एक भयंकर आवाज ऐकूं आला. त्याच्यापुढचें रामायणांतील वर्णन असें आहेः-

"पुढें पहातात तों एक भयानक राक्षस रस्ता अडवून बसलेला त्यांचे दृष्टीस पडला. त्याच्या पर्वतप्राय शरीरास डोकें नव्हतें. त्या भयंकर कबंध राक्षसास छातीवर एकच अक्राळ विक्राळ डोळा होता व पोटाच्या ठिकाणीं 'आ' पसरलेला व दंष्ट्रांनीं भरलेला असा जबडा होता. त्याच्या मांड्या तुटक्या होत्या व म्हणून तो जागच्या जागीं बसला होता. परंतु त्याचे हात एक योजन लांब होते. त्या हातांच्या तडाक्यांत जें श्वापद येई, मग तें हरिण, वाघ अगर हत्तीही असो, तें पकडून तो राक्षस आयतें तोंडांत टाकीत होता."

यानंतर रामचंद्राचें व या राक्षसाचें संभाषण झालें, त्यांत राक्षसानें आपली कुळकथा सांगितली ती अशीः-

"मी दनूचा पुत्र. पूर्वी भयंकर रूप धारण करून ब्राह्मणांना भेडसावीत असें. तेव्हां महर्षि स्थूलशिरा मला रागावून म्हणाले, 'तुझें असेंच रूप असो;' त्यामुळें माझें हें असें भयंकर रूप झालें. नंतर मीं तप करून ब्रह्मदेवापासून दीर्घायुष्य मिळविलें. त्यानंतर गर्वानें मतिभ्रष्ट होऊन मीं इंद्रावर चाल केली. त्यानें मला वज्र

मारलें, त्यामुळें माझें डोकें पोटांत शिरलें व मांड्याही तुटल्या. मग मीं इंद्राची प्रार्थना केली, तेव्हां त्यानें माझा चरितार्थ चालून ब्रह्मदेवाच्या वराप्रमाणें माझें दीर्घायुष्य रहावें म्हणून मला हे लांब हात दिले व सांगितलें कीं, जेव्हां राम तुझे बाहू तोडून तुझें शरीर जाळील तेव्हां तुला तुझें पूर्वरूप प्राप्त होईल."

या पुस्तकाच्या पहिल्याच प्रकरणांत सीतेच्या जन्माची अद्भुतरम्य कथा दिली आहे, त्याचप्रमाणें रामकालीन दक्षिण हिंदुस्तानांतील या कबंध राक्षसाची ही अद्भुत कथा येथें जरा विस्तारानें देण्याचा हेतु एवढाच कीं, आपल्या प्राचीन कवींचा सृष्टींतील चमत्कारिक देखाव्यांचीं अलंकारिक वर्णनें करण्यांत कसा हातखंडा होता ही गोष्ट वाचकांच्या लक्षांत यावी; आणि त्यांना आपली चिकित्सक बुद्धि चालवून रहस्योद्ग्राही पद्धतीनें या वर्णनांतूनच खरा इतिहास हुडकून काढतां यावा.

वरच्या कबंध राक्षसाचें वर्णन हें त्या वेळच्या दक्षिणपथावरील एकाद्या अरण्यमय भूप्रदेशाचें वर्णन असून श्रीरामचंद्रांनीं कबंधाच्या शरीराला अग्निसात् करून त्याला सद्गति दिली याचा अर्थ त्यांनीं त्या वनाला आग लावून पुढें तो प्रदेश मानवांच्या वसतीला योग्य केला, एवढाच घ्यावयाचा, हें चाणाक्ष वाचकांच्या लक्षांत येईलच.

## १९ वानरांशीं सख्य

मागें सांगितल्याप्रमाणें राम-लक्ष्मण सीताशोधार्थ त्या घोर अरण्यांतून फिरत असतां आतां त्यांना एक नवीनच प्रदेश लागला. या प्रदेशांत वानर नांवाच्या लोकांची वस्ती होती. हे वानर लोक द्रविड वंशापैकीं होते, तरी आर्यांचा द्वेष करीत नसत. इतर द्रविड वंशीय जमातींपेक्षां ते फार सुधारलेले होते.

वाली व सुग्रीव असे दोघे बंधू त्यांचे पुढारी होते, व हनुमान, अंगद इत्यादि त्यांचे सरदार फार पराक्रमी, धाडसी व परोपकारार्थ केव्हांही प्राणार्पण करण्याला तयार असे होते.

वाली व सुग्रीव यांच्यामध्यें या वेळीं त्या प्रदेशाच्या आधिपत्याबद्दल वाद चालला होता, आणि वालीनें सुग्रीवाचा पराभव करून सगळें राज्य आणि सुग्रीवाची स्त्री रुमा हीही हस्तगत करून घेतली होती. तेव्हां राम-लक्ष्मणांनीं सुग्रीवाचा पक्ष उचलला आणि वालीचा पराभव करून सुग्रीवाला त्याचें राज्य व त्याची बायको परत मिळवून दिली. याचा मोबदला म्हणून सुग्रीवानें श्रीरामचंद्राला सीता परत मिळविण्यासाठीं लागेल तें साह्य देण्याचें कबूल केलें.

सुग्रीवाच्या पदरीं अतुलबलशाली, युक्तिबाज आणि जिवाला जीव देणारे अनेक सरदार होते. त्यांत हनुमान हा त्याचा प्रधान सचिव होता. दशरथानें पुत्रकामेष्टि यज्ञ केल्यावर अग्नीपासून त्याला मिळालेला हवि त्यानें आपल्या स्त्रियांना वांटून दिला, त्या वेळीं कैकेयीचा भाग एका घारीनें उचलून नेला व तो अंजनी नांवाच्या एका वानरीच्या हातीं पडल्यावर तिनें तो भक्षण केल्यामुळें रामादि चौघां बंधूंबरोबरच अयोध्येपासून फार दूरच्या प्रांतांत पण जवळ जवळ एकाच वेळीं अंजनीच्या पोटीं हनुमानाचा जन्म झाला.' अशी हनुमजन्माची कथा रामायणांत दिलेली आहे.



हनुमान जन्मतःच इतका बळकट, चलाख व तरतरीत निपजला होता कीं तो उपजल्यापासून थोड्याच दिवसांत सूर्यबिंबाशीं खेळण्याचा हट्ट धरूं लागला. मोठमोठे दगड उचलणें, उंच झाडांवर चढणें, या झाडावरून त्या झाडावर सहज उडी मारून जाणें वगैरे त्याच्या बाललीलांनीं लोक त्याला वाऱ्यासारखा जाणारा म्हणून वायुसुत अथवा मारुति म्हणूं लागले. त्याची मुद्रा इतकी तेजस्वी आणि त्या मुद्रेवरील सात्विक भाव इतका उत्कट होता कीं त्याला पाहतांच दुष्ट लोकांना थरकांप सुटत असे.

सुग्रीवानें या हनुमानाची रामाशीं गांठ घालून दिली आणि पूर्वजन्मींचा कांहीं संबंध असो, वर सांगितलेल्या हविर्भागाच्या संबंधसमानत्वानें असो, कीं दुसऱ्या कांहीं कारणानें असो, या वेळीं त्यांची जी मैत्री जमली ती आजन्म कायम टिकली. हनुमान हा रामाचा एकनिष्ठ सेवक बनला आणि राम त्याला आपल्या चवथ्या भावाप्रमाणें मानूं लागला. हनुमानानें ब्रह्मचारी राहण्याची शपथ घेतली होती आणि ती त्यानें इतकी उत्कृष्टपणें पाळली कीं, हिंदु लोकांनीं त्याला सप्त चिरंजीवांत स्थान देऊन त्याचें नित्य प्रातःकाळीं स्मरण करण्याचा परिपाठ ठेवला आहे.

## २० हनुमानानें लावलेला शोध

हनुमानाची व रामाची मैत्री दृढ झाल्यावर सीताशोधाचें काम त्यानें पत्करलें आणि तो दक्षिणेकडे निघाला. या वेळीं त्यानें दक्षिण दिशेनें जाऊन लंकेंत कसा प्रवेश केला याबद्दलच्या ज्या कथा रामायणांत दिल्या आहेत, त्यांत एका ठिकाणीं पुढील मजकूर आहेः-

हनुमान आणि इतर वानर वीर सीतेच्या शोधासाठीं दक्षिणेला निघाले तेव्हां वाटेंत त्यांना एक विस्तीर्ण भुयार लागलें. त्यांतून हंस, सारस इत्यादि पक्षी पाण्यानें भिजलेले व स्वच्छपंख झालेले असे बाहेर आलेले पाहून त्यांना आश्चर्य वाटलें आणि या बिळांत बहुधा पाणी असेल या कल्पनेनें ते सर्व त्या बिळांत शिरले. तेथें चोहोंकडे अंधार होता. कोणास कांहीं दिसेना. तसेंच धैर्य धरून ते पुढें चालले, इतक्यांत त्यांस प्रकाश दिसूं लागला व एक सुंदर उपवन त्यांच्या दृष्टीस पडलें. उत्तम उत्तम प्रकारचीं फळें व फुलें लागलेले वृक्ष त्या उपवनाला शोभा देत होते. त्या उपवनांत जागजागीं लहानमोठीं तळीं सुवर्णकमलांनीं भरलेलीं व सुवर्णाच्या पायऱ्यांनीं चारी बाजूंनीं बांधून काढलेलीं दृष्टीस पडलीं. पुढें पाहतात तों मोठमोठे सोन्याचे वृक्ष दिसूं लागले. पाण्यांतील मासेही

सुवर्णांचे होते. याप्रमाणें जिकडे तिकडे देदीप्यमान प्रभा पाहून व विस्मित होऊन या उपवनाचा मालक कोण आहे याचा ते शोध करूं लागले, तों एक तापस वेष धारण केलेली स्त्री त्यांच्यासमोर आसनावर बसलेली दिसली.

नंतर त्यांनीं त्या स्त्रीची प्रार्थना केल्यावर तिनें त्यांना डोळे मिटावयास सांगून त्यांना एकदम त्या भुयाराच्या बाहेर नेऊन ठेविलें.

या वर्णनांतील भौगोलिक उल्लेखांवरून त्या वेळचा तो भूभाग म्हणजे आजचा अमुक एक प्रांत असें जरी निश्चित सांगतां येत नाहीं, तरी सीताशोधार्थ निघालेल्या वानरांचें हें गुहेंत शिरणें आणि कांहीं दिवसांनीं बाहेर पडणें या गोष्टी त्या वेळच्या प्रचंड अरण्यांतील एकादी अत्यंत बिकट वाट किंवा पर्वतांतील गहन गुहा अथवा एकादा अतिशय लांबीचा बोगदा सूचित करीत नसतील कशावरून ? असो.

मारुतीनें यानंतर रावणाच्या लंकेंत जाऊन तिची सर्व बाजूंनीं तपासणी केली. सीता कुठें आहे, रावणानें तिची व्यवस्था कशी ठेविली आहे इत्यादि सर्व इत्थंभूत बातमी काढून मारुतीनें परत येऊन ती रामाला सांगितली.

रावणाचे कुंभकर्ण व बिभीषण असे आणखी दोन बंधु असून कुंभकर्ण फार बलाढ्य, अजस्त्र देहाचा पण तितकाच आळशी आहे; तो नेहमीं निजून असतो आणि रावणानें कारणपरत्वें उठवून लढाईला जुंपला तरच त्याच्या उपयोगी पडतो; बिभीषण हा राक्षस कुळांतला असला तरी रावणासारखा कपटी, विषयलंपट, अगर क्रूर नाहीं; त्याला रावणाचीं परदारापहरणासारखीं कृत्यें आवडत नाहींत व तो त्याबद्दल रावणाचा नेहमीं निषेध करीत असतो अशीही बातमी मारुतीनें आणिली.

तिकडून येतांना रावणाच्या राक्षस सैनिकांना आपल्या बलाची चुणूक दाखविण्यालाही त्यानें कमी केलें नाहीं. त्यानें लंकेंतल्या कित्येक चांगल्या चांगल्या बागा उध्वस्त करून टाकल्या, कित्येक छोट्या मोठ्या उपनगरांना आगी लावल्या आणि सीतेला इतक्या लांबवर आणून ठेविली तरी हा अन्याय पचण्याजोगा नाहीं अशी रावणाची खात्री करून दिली.

रामचंद्रांनीं त्याला खुणेची आंगठी दिली होती ती त्यानें सीतेला दाखविली आणि सीतेला आपण प्रत्यक्ष पाहिली अशी रामाची खात्री करून देण्यासारख्या सीतेनें अयोध्येंतून निघून अरण्यांत प्रवेश करतेवेळच्या सांगितलेल्या कांहीं खुणेच्या

गोष्टीही त्यानें रामाला सांगितल्या. त्यावरून सीता लंकेंत सुखरूप आहे, पण आतां विलंब न लावितां लंकेवर स्वारी करून तिची सुटका केली पाहिजे, असें रामलक्ष्मणांनीं ठरविलें आणि राक्षसांना पाण्यांत पाहणारे सुग्रीव आणि त्याच्यासारखे इतर जे राजे व जमाती अनुकूल होण्यासारख्या होत्या, त्यांना एकत्र करून हें सर्व सैन्य दक्षिणेकडे निघालें.

## २१ पातिव्रत्याचें तेज

रावणाच्या बंदिवासांत येऊन पडल्यावर सीतेच्या मनाची अवस्था काय झाली असेल हें कल्पनेनेंच जाणलें पाहिजे. तिला मागच्या सर्व गोष्टी आठवून अत्यंत दुःख झालें. विशेषतः लक्ष्मणाला आपण टाकून बोलल्याचा तिला विशेषच पश्चात्ताप झाला. पण आतां दुःख करून काय उपयोग? असाही तिनें विवेक केला आणि 'आलिया भोगासी सादर' होण्याचा निश्चय करून तिनें आपलें मन घट्ट केलें. शिवाय रावण कितीही बलाढ्य असला तरी हें पापकर्म आहे हें त्याला कळत होतें आणि पापी मनुष्य केवढाही बलाढ्य असला तरी ऐन प्रसंगीं भित्रा बनतो हा जगाचा नेहमींचा अनुभव आहे.

सीता रावणाच्या हातीं सांपडली होती. पण तिच्या इच्छेविरुद्ध तिला हात लावण्याची छाती त्याला कधींच झाली नाहीं. स्वतःच्या पराक्रमाची बढाई मारून नि रामाची निंदा करून तिला वश करून घेण्याचाच त्यानें प्रयत्न चालविला. आणि शेवटीं जेव्हां सीता नागिणीसारखी चवताळून त्याला म्हणाली कीं, "दुष्टा, मला बंदींत टाकून तूं माझे कितीही हाल हाल केलेस, माझा वध जरी केलास, तरी मी तुला कदापि वश व्हावयाची नाहीं. धर्मशील रामाची मी धर्मपत्नी आहें. तुला पाप्याला माझ्या अंगाला हातही लावण्याची छाती व्हावयाची नाहीं." तेव्हां रावणानें थोडें दमानें घेण्याचाच विचार केला नि तिला सांगितलें, "सीते! ऐक. मी एक वर्षपर्यंत तुझी वाट पाहीन. त्या मुदतींत जर तूं मला अनुकूल झाली नाहींस, तर माझे स्वयंपाकी तुझे तुकडे तुकडे करून तुझें मांस शिजवितील व तें मला न्याहारीला देतील!"

यानंतर मध्यंतरीं बराच काल गेल्यावर रावणानें पुनः एकदां सीतेपाशीं येऊन तिला धाक घालण्याचा प्रयत्न केला. या वेळीं सीतेनें रावणाला दिलेलें उत्तर नि केलेला उपदेश तिच्या धीरोदात्त वर्तनावर चांगलाच प्रकाश टाकणारा आहे. ती म्हणाली:—"रावणा, मी सामान्य स्त्री आहें असें तूं समजूं नकोस;

परस्त्रीवर लक्ष ठेवणें चांगलें नाहीं; तुझ्या स्त्रियांवर जर कोणीं पापी नजर टाकली तर तुला कसें वाटेल याचा विचार कर.

रावणा, धनाच्या किंवा ऐश्वर्याच्या लोभानें मोहून जाणारी मी नाहीं. प्रभा जशी सूर्याची तशी मी निरंतर रामाची आहें. दुःखानें ग्रस्त झालेल्या या अभागिनीला नेऊन तूं रामाच्या स्वाधीन कर. लंकेचें हें ऐश्वर्य कायम रहावें अशी तुझी जर इच्छा असेल, आपल्या कुळाचा संहार होऊं नये असें जर तुला वाटत असेल, तुझ्या जिवाची जर तुला परवा वाटत असेल, तर मला रामाकडे पोंचती करून त्याचें मन प्रसन्न कर. त्याच्याशीं मैत्री जोड. त्याला शरण जा. विचार कर.

माझें बोलणें तुला रुचणार नाहीं. पण जर तूं तें मानलें नाहींस तर माझ्या रामाच्या धनुष्याचा घोर शब्द तुला लौकरच ऐकावा लागेल. रामाच्या हातून मग तुझी सुटका करण्याला कोणीही समर्थ होणार नाहीं.

राम-लक्ष्मणांचे तीक्ष्ण बाण पेटलेल्या तोंडांच्या सर्पाप्रमाणें या नगरीवर पडूं लागतील. मग तूं बोल बोल करतां आपल्या बांधवांसह नष्ट होशील···तूं कैला-सास जा, किंवा पाताळांत जाऊन बस, पण रामाच्या हातून तुला कोणीच सोड-विणार नाहीं. म्हणून पुनः सांगतें, वेळींच उमज, सावध हो आणि त्या माझ्या तेजस्वी रामाचे पाय धर."

पण रावणाचें नष्टचर्यच ओढवलें होतें. त्याला तो तरी काय करील? त्याची बुद्धि कांहीं केल्या मार्गावर येईना. त्यानें उलट सीतेला सांगितलें:—

"बायकांचा हा स्वभावच आहे कीं जसें जसें त्यांचें समाधान करावें तशा तशा त्या डोक्यावर बसतात! सीते, तूं जें आतां कठोर भाषण केलेंस त्यावद्दल तुला वधदंडच योग्य आहे···पण मीं तुला जो अवधि दिला आहे (अद्यापि दोन महिने उरले आहेत) तोंपर्यंत मी वाट पाहीन. त्या मुदतींत जर तूं माझ्या म्हणण्याला कबूल झाली नाहींस तर मीं पूर्वींच सांगितल्याप्रमाणें माझे आचारी तुझे तुकडे तुकडे करून तुझें मांस मला न्याहारीला देतील!"

यावर सीता उसळून म्हणाली:—"नीचा! तुला या पापी कृत्यापासून परावृत्त करणारा असा तुझा कोणीच आप्त या नगरींत नाहीं का? धर्मशील रामाची मी धर्मपत्नी आहें. माझ्यावर वांकडी नजर ठेवणारा मूर्ख तुझ्याशिवाय त्रिभुवनांत कोणी नाहीं. पामरा! तूं मला हे पापी शब्द बोललास; पण माझ्या रामाच्या तडाख्यांतून तूं सुटणार नाहींस हें लक्षांत ठेव."

"मीं तुझें केव्हांच भस्म करून टाकलें असतें; पण माझें पुण्य मी खर्चूं इच्छीत नाहीं. रामाच्या आज्ञेवांचून मला तसें करतांही येत नाहीं. तूं आपल्याला शूर म्हणवितोस, कुबेराचा भाऊ म्हणवितोस, आपल्या सैन्यबळाची फुशारकी मारतोस, मग दुसऱ्याची पत्नी चोरून आणण्याचें नामर्दपणाचें व निंद्य कृत्य तूं कां केलेंस ?"

नमुन्यासाठीं दिलेल्या या संवादावरून शत्रूच्या तावडींत सांपडलेल्या सीतेचा श्रीरामचंद्राच्या पराक्रमावरील विश्वास आणि रावणाच्या पापी मनाला वाटणारा धाक हीं चांगलींच दिसून येतात.

## २२ राम-रावणयुद्ध

लंकेवर स्वारी करण्यासाठीं दक्षिणेकडे निघालेलें राम-लक्ष्मण-सुग्रीवांचें सैन्य मजल-दरमजल करीत भरतखंडाच्या दक्षिण टोंकाशीं येऊन दाखल झालें. पण पुढें पाहातात तों अथांग सागर ! त्यांतून पुढें जावयाचें कसें? मारुतीसारख्या एकाद्या अचाट शक्तीच्या पुरुषाची गोष्ट निराळी. पण एवढी मोठी सेना समुद्राच्या पलीकडे न्यावयाची म्हणजे सर्वांना पोहून जाणें शक्य नव्हतें. तेव्हां त्या ठिकाणीं सेतु म्हणजे पूल बांधण्याची कल्पना निघून 'नील' नांवाच्या एका वानर स्थापत्यविशारदाच्या मदतीनें मोठमोठे दगड समुद्रांत टाकून एक तात्पुरता पूल बनविण्यांत आला आणि रामाचें सगळें सैन्य लंका बेटांत जाऊन दाखल झालें।

राम-सुग्रीवांचें हें वानरसैन्य लंकेंत गेल्यावर पुढें युद्धनीतीप्रमाणें साम-दाम-भेद वगैरे सर्व प्राथमिक उपाय करून पाहाण्यांत आले. अंगद हा प्रख्यात मुत्सद्दी रावणाकडे शिष्टाईसाठीं गेला, तों रावणानें त्याला पकडून ठार करण्याचीच मसलत योजली. पण अंगद कच्च्या गुरूचा चेला नव्हता. त्यानें रावणाच्या हातावर तुरी देऊन त्याच्या वाड्याचा कळसच काढून आणला !

बिभीषण रावणाचा भाऊ असला तरी त्याला रावणाचीं दुष्कृत्यें आवडत नसत हें मागें सांगितलेंच आहे. तेव्हां त्याला सामील करून घेऊन लंकेंतल्या

---

१ या सेतूचें वर्णन रामायणांत दिलें आहे तें असें:-

पहिल्या दिवशीं चौदा योजनें लांब सेतु तयार झाला; दुसऱ्या दिवशीं वीस, तिसऱ्या दिवशीं एकवीस, चौथ्या दिवशीं बावीस आणि पांचव्या दिवशीं तेवीस याप्रमाणें पांच दिवसांत १०० योजनें लांब आणि दहा योजनें रुंद असा तो 'नलसेतु' तयार झाला.

माऱ्याच्या सर्व जागा व रावणाच्या राज्यांतलीं इतर अनेक कुलंगडीं रामलक्ष्मणांनीं समजून घेतलीं.

सामाचे सगळे उपाय खुंटल्यावर युद्धाशिवाय गत्यंतर नाहीं असें दिसून आलें आणि अखेर उभयपक्षीं अत्यंत तुंबळ असें युद्ध होऊन त्यांत रावणाचा पराभव झाला. कुंभकर्णासारखे रावणाचे भाऊ आणि इंद्रजितासारखे मुलगे सर्व या युद्धांत ठार झाले आणि कित्येक वर्षेंपर्यंत देव-दानवांना कांपावयास लावणारा महाबलाढ्य रावणही शेवटीं रामाच्या हातून मारला गेला! या युद्धाचें वर्णन करतांना कवींनीं 'राम-रावणयोर्युद्धं राम-रावणयोरिव' म्हणजे राम-रावणांचें युद्ध रामरावणांच्या युद्धासारखेंच-त्याला दुसऱ्या कशाची उपमा देतां यावयाची नाहीं असे उद्गार काढले आहेत. त्यावरून या युद्धाच्या प्रचंडतेची किंवा भीषणतेची कल्पना करावी!



या युद्धांत हनुमानादि रामसेवकांनीं आपल्या पराक्रमाची व युद्धकौशल्याची शिकस्त केली. अनेक वेळां राक्षसांच्या मायावी पाशांतून रामलक्ष्मणांची सुटका केली. भयंकर संकटांतून त्यांचे प्राण वांचविले आणि अनेक वेळां आपल्या प्राणांची पर्वा न करतां केवळ रामाज्ञा आणि रामकाज म्हणून त्यांनीं मागेंपुढें न पाहतां अत्यंत घोर संकटें आपल्यावर ओढवून घेतलीं. पण शेवटीं या सर्व दगदगीचा व साहसाचा सुपरिणाम होऊन सगळ्या भरतखंडाला भारी होऊन राहिलेला रावण खुद्द त्याच्या देशांतल्या लढाईंतच गतप्राण होऊन पडला आणि सीतेची आणि तिच्यासारख्याच अनेक साध्वी स्त्रियांची सुटका होऊन राम-लक्ष्मण सीतेला घेऊन भरतखंडांत परत आले.

## २३ सीतेच्या बंदिवासांतील मैत्रिणी

सीतेच्या बंदिवासांत तिच्या मनाला विरंगुळा वाटण्यासारख्याही कांहीं गोष्टी होत्या. त्यांत तिच्यावर कडकपणें पहारा करणाऱ्या राक्षसींपैकीं दोघी तिच्याविषयीं सहानुभूति बाळगून उद्वेगप्रसंगीं तिला धीर देत असत, हें नमूद करण्यासारखें आहे.

या राक्षसींचीं नांवें त्रिजटा व सरमा अशीं होतीं. पैकीं त्रिजटा ही स्वार्थानेंच सीतेला वश झाली होती. तिला एकदां असें स्वप्न पडलें होतें कीं, "रावणाची सुवर्णलंका उध्वस्त होऊन रामचंद्र सीतेला घेऊन अयोध्येला चालले आहेत." हें स्वप्न खरें होणार असें वाटल्यामुळें ती सीतेकडून पुढें आपल्यावर उपकार होतील या आशेनें सीतेशीं सौम्यपणें वागे व आपल्या इतर मैत्रिणींनाही सीतेला त्रास देऊं नका असें सांगे.

सरमा ही बाहेरून क्रूर दिसत असली तरी अंतःकरणाची कोमल होती. तिला सीतेची कींव येई व ती अनेक वार तिचें सांत्वन करून धीर देई.

श्रीरामचंद्र लंका बेटांत आल्यावर प्रत्यक्ष युद्ध सुरू होण्यापूर्वी थोडे दिवस सीतेला भिववून सोडण्यासाठीं रावणानें अगदीं हुबेहुब रामाच्या डोक्यासारखें एक मायावी माणसाचें डोकें सीतेपुढें आणून टाकलें आणि तो म्हणाला, "हे मूर्ख व हट्टी स्त्रिये, वानरसैन्यासह समुद्र ओलांडून राम लंकेंत येऊन बसला असतां माझा सेनापति प्रहस्त यानें त्याजवर रात्रीच्यावेळीं छापा घालून रामाला ठार मारलें. हें पहा त्याचें डोकें! आतां तरी तूं आपला वेडा हट्ट सोड व मला वश हो!"

तें शिर पाहतांच सीतेचीही बुद्धि क्षणभर मोह पावली. ती हाहाःकार करून रडूं लागली आणि शोकावेगांत रावणाला म्हणालीः—"रावणा! रामाच्या शवाजवळ नेऊन माझाही वध कर. पतीशीं पत्नीची गांठ घातल्याचें पुण्य तरी पदरीं घे! त्यांच्या शिराशीं माझें शिर, त्यांच्या देहाशीं माझा देह भिडवून टाक!"

पण सीता असा विलाप करीत आहे तोंच रावणाचा एक द्वारपाल येऊन रावणाला म्हणाला, "सेनापति व मंत्री आपल्या दर्शनाच्या इच्छेनें दारांत उभे आहेत." तेव्हां रावण तसाच तेथून निघून गेला आणि त्याच्याबरोबर तें शिरही अदृश्य झालें!

रावण गेल्यानंतर सरमा सीतेजवळ येऊन म्हणाली, "तें रामाचें शिर खरें नसून केवळ मायेचें होतें. राम सुरक्षित आहे; त्याला मीं प्रत्यक्ष पाहिलें आहे."

बिभीषणाची कला या नांवाची एक कन्या होती तीही सीतेचें हित इच्छिणारी होती.

## २४ युद्ध-कालांतील कांहीं प्रसंग

मागें बाविसाव्या प्रकरणांत वर्णिलेलें राम-रावणांमधील युद्ध चालू असतां सीतामाईवर ओढवलेले कांहीं प्रसंगही सांगण्यासारखे आहेत.

एकदां उभय सैन्यांत परस्परांकडून बाणांचा वर्षाव चालला असतां मध्येंच राम-लक्ष्मणांना मूर्च्छा येऊन ते खालीं पडले. रावणानें लगेच लंकेंत राम-लक्ष्मण गतप्राण झाल्याची द्वाही फिरविली आणि खुद्द सीतेलाही त्रिजटा राक्षसिणीसह पुष्पक विमानांत बसवून तो देखावा दाखविण्यासाठीं पाठवून दिलें.

सीतेला तो भयंकर देखावा पाहून काय वाटलें असेल याची कल्पनाच करावी. ती शोकानें व्याप्त होऊन आक्रोश करूं लागली. पण त्रिजटेनें खालीं सूक्ष्मपणें पाहून सीतेला सांगितलें कीं, राम-लक्ष्मण मेले नसून जिवंत आहेत. फक्त त्यांना मूर्च्छा आली आहे, ते लौकरच उठतील.

पुढें कांहीं वेळानें राम-लक्ष्मणांची मूर्च्छा नाहींशी झाली, ते पुनः वर उठले, वानरसैन्य हर्षानें बेहोष झालें आणि पुनः युद्धाला सुरुवात झाली.

यानंतर युद्धाच्या अखेरच्या आदल्या दिवशीं रावणाचा पराक्रमी पुत्र इंद्रजित मारला गेल्यावर रावण अगदीं बेहोष होऊन सीतेला ठेविलें होतें त्या अशोक वनांत गेला आणि सीतेच्या पोटांत खंजीर खुपसून खरोखरच तिचा प्राण घेण्यासाठीं तिच्या रोखानें धांवूं लागला.

पण या वेळीं सुपार्श्व नांवाचा रावणाचा सचिव जवळ होता, त्यानें या स्त्री-वधापासून त्याला परावृत्त केलें आणि त्याला सांगितलें कीं, "सीतेच्या सौंदर्याकडे पहा आणि असल्या स्त्रीरत्नावर पराक्रम गाजविण्याऐवजीं राम-लक्ष्मणांवरच काय तो पराक्रम गाजवा म्हणजे सीता अजूनही तुम्हांला प्राप्त होईल."

थोडा विचार केल्यावर रावणाला सचिवाचें हें म्हणणें पटलें आणि तो राम-लक्ष्मणांवर हल्ला करण्यासाठीं निघून गेला. आणि तो तेव्हांचा त्याचा अखेरचाच हल्ला ठरला !

याच्या उलट श्रीरामाच्या बंधु–प्रेमाची व पत्नी–प्रेमाची कसोटी लागणारे प्रसंगही या युद्धकालांत दिसून आले.

एकदां रावणाच्या एका तीक्ष्ण शक्तीनें लक्ष्मण मूर्च्छित होऊन पडला, पण त्याच वेळीं श्रीरामचंद्रही रावणावर बाणांचा वर्षाव करीत होते. त्यामुळें लक्ष्मणाकडे लक्ष देण्याला त्यांना सवडच झाली नाहीं.

पुढें त्या दिवसाचें युद्ध आटोपल्यावर राम लक्ष्मणाजवळ येऊन पाहतात तों तो अद्यापिही मूर्च्छितच !

तो शुद्धीवर येण्याचें लक्षण दिसेना. श्रीरामांनीं त्याचें मस्तक आपल्या मांडीवर घेतलें आणि ते मोठ्यानें शोक करूं लागले.

"या जगांत बायको मिळेल, संबंधी मिळतील, पण असा बंधु मिळणार नाहीं. लक्ष्मणा! माझ्याबरोबर तूं वनवासाला आलास तेव्हां आतां मीही तुझ्याबरोबरच स्वर्गाला येतों. आपण दोघेही बरोबरच जाऊं!" अशा प्रकारें त्यांनीं अत्यंत दीनवाणीनें शोक आरंभिला. पण इतक्यांत रामसैन्यांतला धन्वंतरी सुषेण रामचंद्राला धीर देऊन म्हणालाः–

"महाराज! लक्ष्मण मेला नाहीं. याच्या हृदयांत अजून धुगधुगी आहे; श्वासोच्छ्वासही चालू आहे. या वेळीं संजीविनी वनस्पति मिळेल तर मी याला आतां शुद्धीवर आणतों." हें ऐकून हनुमानानें ताबडतोब निघून सुषेणानें सांगितलेल्या ठिकाणाहून ती वनस्पति आणली आणि सुषेणानें त्या वनस्पतीचा रस लक्ष्मणाच्या नाकांत पिळून त्याला सावध केलें.

दुसऱ्या एका प्रसंगीं इंद्रजितानें राम-लक्ष्मणांना हतप्रभ करण्यासाठीं एक नवीच युक्ति योजली. त्यानें सीतेसारखीच एक मायावी स्त्री तयार करून तिला रथांत बसवून युद्धभूमीवर आणलें आणि हनुमानासमक्ष "हें पहा, आम्हां राक्षसांवर ओढवलेल्या अनर्थाचें मूळच मी उपटून टाकतों" असें म्हणून त्या मायावी सीतेचे केंस एका हातानें धरून दुसऱ्या हातानें तिच्या देहाचे दोन तुकडे करून टाकले ! हनुमानाला तो सर्व प्रकार खराच वाटला, आणि दुःखानें व्याप्त होऊन ही हकीकत रामास सांगण्यासाठीं तो माघारा फिरला. वाटेंत जांबवानाची व त्याची गांठ पडली. ते दोघेही रामापाशीं आले आणि त्यांनीं सीतावधाची ही करुण कहाणी रामाला निवेदन केली. राम–लक्ष्मण शोकानें विव्हळ झाले. पण त्यांतल्या त्यांत लक्ष्मण तर दुःखानें देहभान विसरून रामास म्हणालाः–

"रामा! धर्म, धर्म म्हणून तुम्ही त्याचें जिवापाड रक्षण करतां. पण ह्या धर्मे कांहीं तुमचें रक्षण करीत नाहीं! ... तेव्हां धर्माधर्म या गोष्टीच खोट्या आहेत असें कां म्हणूं नये? धर्मापेक्षां बळ आणि पराक्रमच श्रेष्ठ होय. मला वाटतें, अर्थ हेंच धर्माचें मूळ आहे. तुम्हीं राज्य टाकलें तेव्हांच तुमचें हें मूळ नाहींसें झालें आणि यामुळेंच तुमची भार्या रावणानें नेली. आतां इंद्रजितानें तिचा वधही केला!"

मनुष्यावर एकामागून एक सारखीं संकटेंच येऊं लागलीं म्हणजे सदाचरणी मनुष्य सुद्धां धर्माविषयीं कसा अश्रद्ध बनतो याचें हें एक उदाहरण आहे. पण लक्ष्मणाच्या या बोलण्यावर कोणीं उत्तर देण्यापूर्वीच बिभीषण तेथें आला आणि त्यानें इंद्रजिताच्या कपटजालाचा स्फोट करून रावण सीतेला कधींही जिवें मारणार नाहीं अशी आपली खात्री आहे म्हणून सांगितलें. तेव्हां अर्थातच राम–लक्ष्मणांना पुनः धीर आला आणि त्यापुढें इंद्रजिताशीं झालेल्या युद्धांत लक्ष्मणाकडून इंद्रजितच मारला गेला.

## २५ पतीची भेट

बाविसाव्या प्रकरणांत रावणवधाची हकीकत सांगितलीच आहे. ही हकीकत हनुमानानें ताबडतोब जाऊन सीतेला कळविली. आणि तो तिला श्रीरामाच्या दर्शनासाठीं घेऊन आला. त्यावेळच्या श्रीसीता-रामांच्या अंतःकरणांतील भावनांचें यथार्थ चित्र रेखाटणें अशक्य आहे!

दोघांच्याही तोंडून शब्द निघेना; सीतामाईच्या डोळ्यांतून टप् टप् अश्रु गळूं लागले. आपलें परम दैवत म्हणजे पति असें मानणारी सीता अत्यंत हर्षानें, विस्मयानें व प्रेमानें श्रीरामाच्या मुखाकडे पाहूं लागली, पण श्रीरामांनीं ह्या वेळीं आपल्या हृदयांतील विकार दाबून धरले होते. कांहीं वेळानें ते म्हणाले, "सीते, शत्रूला रणांगणांत ठार मारून व तुला बंदिवासांतून सोडवून येथें आणलें आहे. शूर पुरुषानें जें कर्तव्य करावयाचें तें मीं केलें. माझ्या शत्रूचा आणि माझ्या अपमानाचा मीं बरोबरच निःपात केला...हनुमानानें शतयोजन समुद्राचें उल्लंघन करून लंकेचा विध्वंस केला. त्या महान् पराक्रमाचें आज चीज झालें आहे...पण सीते, ह्या एवढा जो मीं अट्टहास केला, तो केवळ तुझ्याकरतां नव्हे हें मात्र लक्षांत ठेव.

माझ्यावर व माझ्या कुळावर जो कलंक आला होता, तो धुवून काढण्याकरतांच मीं व माझ्या मित्रांनीं या महान् युद्धाचा परिश्रम केला. पण कांहीं झालें तरी तुझा बराच काल परगृहांत गेल्यामुळें तुझ्या शुद्ध स्थितीविषयीं संशय आल्याशिवाय कसा रहावा? तेव्हां तुझ्या या माझ्यापुढें उभें राहण्यानें मला आनंद होत नसून तुझें तोंड पाहूं नये असें मला वाटूं लागलें आहे. तेव्हां तूं वाटेल तिकडे निघून जा!”

श्रीरामाचें हें अनपेक्षित भाषण ऐकून सीतामाईवर वीज कडाडल्यासारखी झाली व तिला काय बोलावें व काय करावें हेंच समजेना! शेवटीं कांहीं वेळ निःशब्द स्तब्धतेंत गेल्यावर ती आपले डोळे पुसून सद्गदित वाणीनें म्हणाली, “श्रीरामचंद्रा! जसा एकादा प्राकृत पुरुष आपल्या प्राकृत बायकोला टाकून बोलतो, त्याप्रमाणें असलेलें हें तुमचें भाषण माझ्या अंतःकरणाला घरें पाडीत आहे! तुम्हांला तुमच्याच मोठेपणाची शपथ आहे! रावणानें मला जबरदस्तीनें उचलून नेल्यामुळें त्याचा मला स्पर्श झाला हें खरें; पण तो माझ्या दैवाचा अपराध आहे! माझें हृदय माझ्या हातांत आहे; तें तुमच्याशिवाय अन्य पुरुषाकडे कधींही गेलें नाहीं. जर तुमच्याबरोबर इतकीं वर्षें काढूनही तुम्हांला माझी ओळख झाली नसेल, तर मला जगून तरी काय करावयाचें आहे?...माझी इतके दिवस दिसून येणारी भक्ति, माझें प्रख्यात कुळ आणि माझें शील या गोष्टी फुकटच गेल्या काय?”

नंतर ती लक्ष्मणाकडे वळून म्हणाली, “भावोजी, या संकटांत मला एकच उपाय दिसतो आहे. काष्टें आणवून आतांच चिता तयार करा. म्हणजे मी त्या चितेंत उडी घेतें. मी शुद्ध असेन तर अग्नि मला दहन करूं शकणार नाहीं; आणि मी पापी असेन तर अग्नींत जळून मरणें हेंच मला उचित आहे.”

शेवटीं तिनें सांगितल्याप्रमाणें खरोखरच एक चिता तयार करण्यांत आली. आणि सीतेनें श्रीरामाला प्रदक्षिणा घालून आणि “हे आदिनारायणा! तूं सर्व लोकांचा साक्षी आहेस, माझें चित्त जर श्रीरामचंद्राशिवाय दुसऱ्याकडे कधींही गेलें नसेल तर माझें रक्षण कर” अशी अग्नीची प्रार्थना करून तिनें त्या अग्नींत उडी टाकिली!

सभोंवतीं जमलेले सर्व वानर, राक्षस आणि ऋक्ष आश्चर्यानें थक्क झाले. पण इतक्यांत काय चमत्कार सांगावा? सीतेनें अग्निप्रवेश करतांच अग्नि थंड झाला

आणि सीता पूर्वीपेक्षां अधिकच सुंदर, तेजस्वी आणि देदीप्यमान होऊन बाहेर आली!

श्रीरामचंद्र निस्तब्धपणें हें सर्व पहात होते. सीता अग्निकुंडाच्या बाहेर आल्यावर ते म्हणाले, "सीता शुद्ध आहे व माझ्यावर तिचें चित्त पूर्ण आहे हें मी जाणतों. शिवाय अशा पतिव्रता स्त्रियांना त्यांच्या सद्गुणांच्या तेजामुळें अग्निज्वालेप्रमाणें परपुरुषास स्पर्शही करतां येणें शक्य नाहीं. पण सीतेनें हें दिव्य करणेंच जरूर होतें, नाहीं तर रावणाच्या अंतःपुरांत दीर्घकाल राहिलेल्या सीतेचा मीं कांहीं एक विचार न करतां स्वीकार केला असता तर माझ्यावर बालिशतेचा व कामपरायणतेचा आरोप आला असता."

यानंतर सुग्रीव-जांबवानादि सर्व सरदार आणि सेनापतींनीं श्रीरामाचा जय-जयकार केला. श्रीरामांनीं बिभीषण, सुग्रीव, जांबवान आणि हनुमान यांना प्रेमानें आलिंगन दिलें आणि तो दिवस सर्वांचाच मोठ्या आनंदाच्या गडबडींत गेला.

## २६ अयोध्येंत पुनरागमन

रावणवध होऊन सीता-रामांची भेट झाली त्या सुमारासच रामाच्या वनवासाचीं ठरलेलीं १४ वर्षें पुरीं होत आलीं होतीं. रामाचा भाऊ भरत, मातुश्री कौसल्या, वसिष्ठादि ऋषि आणि अयोध्येंतील सर्व प्रजाजन रामाच्या आगमनाची चातका-प्रमाणें वाट पहात होते. तेव्हां आतां लंकेंत ज्यास्त दिवस घालवावयाचे नाहींत असें रामांनीं ठरविलें. श्रीरामचंद्र म्हणाले:—

"आतां इथें राहण्याला वेळ नाहीं. माझा भ्रातृवत्सल बंधु भरत नंदिग्रामांत मुनिव्रतानें राहिला आहे. चौदा वर्षांनीं मी परत न गेलों तर आपण प्राणत्याग करूं अशी त्याची प्रतिज्ञा आहे. तेव्हां आपल्याला शक्य तितक्या लौकर निघून गेलें पाहिजे."

तेव्हां बिभीषणानें लंकेंतील सुप्रसिद्ध पुष्पक विमान आणवून सर्वांना त्यांत बसविलें आणि विमान चालू झालें. वाटेंत श्रीरामांनीं सीतेला आपण जनस्थाना-पासून निघून लंकेंत येईपर्यंतचा मार्ग आणि त्या मार्गावरचीं निरनिराळीं स्थानें दाखविलीं. नंदिग्रामापासून कांहीं अंतरावर आल्यावर रामचंद्र येत असल्याची बातमी भरताला सांगण्यासाठीं मारुतिरायाला पुढें पाठविण्यांत आलें.

हनुमानानें भरताची भेट घेऊन त्याला श्रीराम रावणाचा वध करून सीता-

माईसह परत येत असल्याची बातमी सांगितली. भरतानें शत्रुघ्नाला सांगून सर्व अयोध्यानगरी शृंगारण्याची तजवीज केली आणि आपण स्वतः श्रीरामाला सामोरा निघाला. डोकीवर रामाच्या पादुका नि हातांत पांढरें स्वच्छ राजछत्र व चामरें घेऊन तो सर्वांच्या पुढें झाला. पुष्पक विमान दिसूं लागलें. सर्वांचे डोळे तिकडे लागले. विमान खालीं उतरलें. भरतानें रामचंद्राला पहातांच साष्टांग नमस्कार घातला. त्याच्या डोळयांतून अश्रूंचा पूर वाहत होता. श्रीरामांनीं पुढें होऊन भरताला दृढालिंगन दिलें. 'भरता! किती कृश झालास रे!' असे उद्गार त्यांच्या मुखावाटे निघाले. दोघांच्याही प्रेमाचा पूर अश्रूंच्या रूपानें वाहूं लागला! नंतर श्रीरामांनीं कौसल्याप्रभृति आपल्या मातांच्या चरणांवर मस्तक ठेविलें. सीतेला तर सर्वांनींच एकदम पोटाशीं धरलें.

'राजा-प्रजा, माता-पुत्र, सासवा-सुना, बंधु-बंधु, गुरु-शिष्य, स्नेही-स्नेही व त्यांच्या स्त्रिया इत्यादि संबंधांत अतिशय प्रेम साहजिकच असतें. त्यांत रामचंद्र व सीता यांसारखीं आपल्या गुणांनीं सर्वांचें चित्त आकर्षण करणारीं अवतारी माणसें चौदा वर्षें दृष्टीआड राहून मोठ्या संकटांतून मोठ्या पराक्रमानें व धैर्यानें बाहेर पडून जेव्हां लोकांच्या दृष्टीस पडलीं तेव्हां त्यांच्या प्रेमाला जें भरतें आलें तें समुद्राच्या वर्षाकालांतील अफाट लाटांप्रमाणें पुष्कळ वेळपर्यंत उचंबळत राहिलें, यांत आश्चर्य नाहीं. असो.

भरतभेट झाल्यानंतर सर्वांनीं मोठ्या समारंभानें नगरांत प्रवेश केला. श्रीरामचंद्राबरोबर दक्षिणेंतून आलेल्या मित्रांना, सरदारांना व सैनिकांना त्यांच्या दर्जाप्रमाणें अनेक प्रकारचीं बक्षिसें वांटण्यांत आलीं आणि सर्वत्र आनंदी आनंद होऊन गेला.

## २७ रामराज्य

चौदा वर्षांचा वनवास संपून श्रीरामचंद्र अयोध्येंत येऊन आपल्या राज्याचा कारभार पाहूं लागले. या त्यांच्या कारभारविषयक कौशल्याचें व तत्कालीन एकंदर सुस्थितीचें वर्णन 'रामराज्य' या एका शब्दांतच समाविष्ट झालेलें आहे. कारण हा शब्द उच्चारल्याबरोबर सर्व प्रकारच्या सुखांनीं नि आनंदांनीं युक्त असें राज्य आपल्या मनश्चक्षूंपुढें उभें राहतें. ज्या राज्यांत चोरी, चहाडी, लबाडी यांचा संपर्क नाहीं, ज्या राज्यांतले सगळे लोक सत्यानें वागणारे, ज्या राज्यांत नेहमीं पाऊस

नियमित वेळीं पडून धान्य व फळें-मुळें यांनीं पृथ्वी समृद्ध रहावयाची, ज्या राज्यांत लोकांना रोग म्हणजे काय हें माहीत नाहीं, ज्या राज्यांत स्त्रियांना अकालवैधव्य म्हणजे काय याची कल्पनाही नाहीं, ज्या राज्यांत वृद्धांवर बालकांचा मृत्यु पाहण्याचा प्रसंग कधींच येत नाहीं, ज्या राज्यांत सर्व लोक आपापल्या वर्णधर्माप्रमाणें आपापल्या व्यवसायांत मग्न, ज्या राज्यांतील सर्व प्रजा धर्मनिष्ठ व स्वकर्तव्यदक्ष, ज्या राज्याला दुष्काळ, परचक्रादि आपत्तींची माहिती नाहीं, ज्या राज्यांतील राजा ( आतां वाटल्यास 'लोकप्रतिनिधि' म्हणा—सं० ) प्रजानुरंजनतत्पर आणि प्रजा राजाची आज्ञा ( आतां 'सरकारची आज्ञा' म्हणा—सं० ) शिरसा मानणारी, थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ज्या राज्यांत कोणत्याही दुःखाचा लवलेशही नसून सर्वत्र आनंदीआनंद भरलेला आहे तें राज्य म्हणजे रामराज्य अशी रामराज्याविषयीं लोकांची कल्पना आहे आणि ती रामचंद्राच्या चारित्र्यावरून व त्याच्या राज्यांतील लोकस्थितीवरून त्याच्या कारकीर्दीपासून आतांपर्यंत जनमनांत खिळून राहिलेली आहे. यावरून श्रीरामचंद्रांनीं त्या कालीं खुद्द अयोध्येंत आणि आसपासच्या प्रदेशांत इतकेंच नव्हे तर सर्व भरतखंडभर आणि भरतखंडाबाहेरही आपल्या चारित्र्याच्या आणि सुराज्यव्यवस्थेच्या प्रभावानें केवढा लौकिक मिळविला होता याची कल्पना येईल.

आपल्या मांडलिकांशीं आणि शत्रुपक्षाशींही त्यांचें वर्तन किती दिलदारपणाचें होतें हें लंकेचें राज्य रावणाकडून जिंकून घेतल्यावर तें त्यांनीं जसेंच्या तसें बिभीषणाच्या हवालीं केलें यावरून कोणालाही समजून येण्यासारखें आहे. त्यांच्या राज्यांत सर्व प्रजा संतुष्ट, सुखी आणि स्वकर्मनिरत अशी असे. हेवा, मत्सर, द्रोह इत्यादि दुर्गुणांना त्यांच्या राज्यांत थारा नव्हता. सत्य आणि अस्तेय हीं त्यांच्या राज्याचीं निदर्शक चिन्हें होतीं.

---

१. वाल्मीकीनेंच रामराज्याचें वर्णन करतांना म्हटलें आहे:—

"रामराज्यांत विधवा दृष्टीस पडेनाशा झाल्या. सर्वांचें रोगांचें भय नाहींसें झालें. चोरी नाहींशी झाली. सर्व प्रकारचे अनर्थ नाहींसे झाले. वृद्धानें बालकांचें प्रेतकार्य करावें असा उलटा प्रसंग येणें बंद झालें. सर्व लोक रामचंद्राच्या धर्मपरायण वृत्तीला पाहून स्वतः धर्मपरायण झाले. मूळ, फल, पुष्प, धनधान्य यांची नेहमीं समृद्धि होऊं लागली. पर्जन्य वेळेवर पडूं लागला. याप्रमाणें सर्व राज्यांत सुखाचा व नीतीचा प्रकर्ष होऊन लोक आनंदित झाले."

रामचंद्र आणि सीता यांचें परस्पर प्रेम किती होतें हें वर्णन करून सांगण्याचें कारणच नाहीं. चौदा वर्षांच्या वनवासांत त्याची अनेक वेळां कसोटी लागली होती. रामाला एकवचनी, एकबाणी, या विशेषणांप्रमाणेंच एकपत्नी असेंही विशेषण लावण्यांत येतें. या विशेषणांतच त्याच्या जितेन्द्रियत्वाची व धर्मनिष्ठेची खूण सांपडते. सीता देवी तर आदर्श पत्नी होती आणि आपल्या पातिव्रत्याच्या तेजानें रावणासारख्या मदांध राक्षसालाही, प्रत्यक्ष त्याच्या तावडींत एकाकी सांपडली असतां अनेक वेळां तिनें दिपवून टाकून हतबुद्ध करून सोडलें होतें. असा हा सीतारामांचा जोडा सिंहासनावर बसलेला, लक्ष्मण–भरत–शत्रुघ्न आणि वज्रबाहु मारुतिराय समोर हात जोडून रामाची आज्ञा केव्हां होते आणि आपण ती केव्हां पार पाडतों म्हणून उत्सुक असलेले, वसिष्ठादि कुलगुरु वाटेल त्या प्रसंगीं सदुपदेश व सल्लामसलत देण्याला तयार, आणि राजमंत्री आणि सेनाधिकारी कसलाही प्रसंग प्राप्त झाला असतां रामाज्ञा शिरसावंद्य मानून ती तावडतोब अमलांत आणण्याला एका पायावर उभे, असें हें राज्यचित्र कोणाच्या डोळ्यांना आनंद देणार नाहीं ?

## २८ भवितव्यतेचा खेळ

रामाला राज्याभिषेक होऊन तो अयोध्येंत सुखानें राहूं लागल्यावर थोड्याच वर्षांनीं सीतेला कांहीं महिने गेले, आणि अपत्यलाभ होण्याचीं सर्व चिन्हें दिसूं लागलीं. तेव्हां एक दिवस रामांनीं सीतेला तुझी इच्छा काय आहे, म्हणून प्रश्न केला. सीता म्हणाली:—"पवित्र तपोवनें पाहण्याची आणि एकाद्या मुनीच्या आश्रमांत फळेंमुळें खाऊन राहण्याची मला इच्छा झाली आहे !"

ही इच्छा म्हणजे भावी आपत्तीची पूर्वसूचना होती !

दररोज राज्यकारभाराचीं सर्व कामें आटोपल्यावर रात्रीच्यावेळीं आपल्याविषयीं लोक काय म्हणतात हें समजून घेण्याच्या हेतूनें गुप्तपणें नगरांतून फिरण्याची किंवा गुप्त हेरांकडून आलेली बातमी समजून घेण्याची रामचंद्राची चाल होती. त्याप्रमाणें एका रात्रीं एका हेरानें येऊन सांगितलें कीं, अयोध्येच्या एका भागांत एका धोब्याच्या घरीं नवराबायकोंचें भांडण चाललें होतें; त्याचें कारण असें कीं त्या धोब्याची बायको नवऱ्याच्या इच्छेविरुद्ध ज्यास्त दिवस माहेरीं किंवा दुसऱ्या कोणाच्या घरीं राहून पुनः नवऱ्याच्या घरीं आली होती आणि नवरा रागानें तिला घरांत घेण्याला कबूल होत नव्हता; बोलतां बोलतां तो सहज

उद्गारला, "रामानें इतकीं वर्षें रावणाच्या घरीं राहिलेल्या सीतेला निर्लज्जपणें परत घेतली; पण मी तसा नाहीं. मी तुझा मुळींच अंगिकार करणार नाहीं."

हेरानें सांगितलेले धोब्याच्या तोंडचे हे शब्द ऐकून आपल्याविषयीं आणि सीतेविषयीं शंका घेऊन वाईट शब्द उच्चारणारा एक तरी इसम राज्यांत आहे याबद्दल रामचंद्रांना फार दुःख झालें. सीतेच्या निष्कलंक चारित्र्याविषयीं आपल्या राज्यांत एकाला तरी संशय रहावा म्हणजे तो आपल्या धवल कीर्तीला बारीकसा कां होईना, पण डागच होय; तो डाग धुवून टाकल्याशिवाय राहणें योग्य नाहीं असें त्यांच्या मनानें घेतलें. आणि त्यांनीं दुसऱ्या दिवशीं आपल्या मंत्र्यादिकांना ही हकीकत कळवून सीतेचा ताबडतोब त्याग करण्याचा विचार ठरविला. लक्ष्मणादि बंधूंना व राजवाड्यांतील इतर कोणासही हा विचार पसंत नव्हता; पण रामाचा शब्द म्हणजे शब्द! तो मोडणार कोण?

आपल्याला पुनः वनवासाचीं दुःखें भोगावीं लागणार याची सीतेला कल्पनाही नव्हती. आणि जिच्यासाठीं आपण महान् अरण्यांतून अनेक वर्षें कंदमुळांवर निर्वाह करून समुद्रांत अतिदूर असलेल्या लंकेंत प्रवेश करण्यासारखें धाडस केलें, आणि रावणासारख्या पराक्रमी राक्षसाशीं घनघोर युद्ध करून त्याचा नाश केला, त्या सीतेला आतां ती गरोदर असतां आपण होऊन अरण्यांत सोडून देण्याचा हृदयविदारक प्रसंग आपल्यावर येईल याची लक्ष्मणालाही कल्पना नव्हती. पण 'भवितव्यता बलीयसी' म्हणतात ती असल्याच प्रसंगांमुळें.

रामांनीं सीतेचा त्याग करण्याचें निश्चित करून तिला एका रथांत बसवून आपल्या राज्याच्या हद्दीच्या बाहेर अरण्यांत नेऊन सोडण्याची लक्ष्मणाला आज्ञा केली आणि लक्ष्मणाला ती रामाज्ञा म्हणून मानणें भाग पडलें!

ठरल्याप्रमाणें लक्ष्मण आणि सीता रथांत बसलीं. रथ नगराबाहेर चालू झाला आणि एका अरण्यांत जाऊन थांबला. त्या ठिकाणीं लक्ष्मणानें सीतेला सर्व हकीकत निवेदन केली, आणि मोठ्या दुःखित अंतःकरणानें 'आतां यापुढें वनदेवताच तुझें रक्षण करोत' असें म्हणून तो स्तब्ध राहिला!

या प्रसंगीं आसपास एखाद्या तपोनिष्ठ ऋषीचा आश्रम आहे कीं काय याचा मात्र त्यानें तपास केला होता आणि प्रसंग पडल्यास त्या ऋषींच्या तपोवनांत तिला जातां यावें किंवा एखाद्या वेळीं ऋषीच्या आश्रमीय मंडळीच्या ती दृष्टीस पडावी अशा ठिकाणींच त्यानें तिला नेऊन सोडलें होतें.

९५ ७५
०१. ०१५

या वेळच्या सीतेच्या मनःस्थितीचें वर्णन करणें कठीण आहे. तिला आपलें जन्मापासूनचें सर्व वृत्त आठवलें. राजा जनकाच्या घरचें बालपण; रामाबरोबर झालेला विवाह; वय, पराक्रम आणि चारित्र्य यांनीं तुल्यगुण अशा भर्त्याशीं रममाण होण्यांत झालेलें सुख; पुढें कैकेयीच्या मत्सरामुळें घडलेला वनवास; पण त्या वनवासांतही इंद्राच्या नंदनवनांतील सुखालाही लाजवील असें आपण भोगलेलें सुख; वनवासांतील ऋषिपत्न्यांची ओळख; रामाचें सुवर्णमृगहनन; रावणाकडून झालेलें आपलें हरण; रावणाच्या राज्यांतील आपला बंदिवास; रावणानें दाखविलेलीं अनेक आमिषें आणि केलेले कपटाचार; पुढें हनुमानाची भेट व रावणाचा रामानें केलेला संहार; अनेक वर्षांच्या वियोगानंतर पुनः झालेली रामपदप्राप्ति व अयोध्येंतील सुखाचे दिवस, हीं सर्व तिला एकामागून एक आठवलीं आणि आतां गरोदर स्थितींत या अरण्यांत आपली काय अवस्था होईल याचें भेसुर चित्र तिच्या डोळ्यांसमोर उभें राहून ती ओक्साबोक्शीं रडूं लागली !

पण कांहीं झालें तरी ती वीरपत्नी होती आणि आपल्या पातिव्रत्याचा प्रभाव या प्रसंगींही आपलें रक्षण करूं शकेल याची तिला खात्री होती. त्यामुळें शोकाचा पहिला आवेग ओसरल्यावर तिनें आपलें मन घट्ट केलें आणि ती लक्ष्मणाला म्हणाली:—

लक्ष्मणा ! बरें आहे. जें माझ्या कपाळीं आलें तें मी भोगण्यास तयार आहें. जा; तूं परत जा. मला तूं राजाच्या आज्ञेप्रमाणें सोडून जा. माझी ही गर्भारपणाची स्थिति मात्र पूर्ण अवलोकन करून ठेव. जा; तुझें कर्तव्य तूं कर. सर्व सासूबाईंना माझे हात जोडून नमस्कार सांग आणि त्या परमधार्मिक राजालाही माझा निरोप सांग कीं, "महाराज, सर्वांसमक्ष दिव्य करून मी निष्पाप आहें हें मीं सिद्ध केलें आहे; माझी तुमच्या ठिकाणीं किती भक्ति आहे हेंही तुम्ही जाणतच आहां; असें असून लोकापवादाच्या भीतीनें माझा तुम्हीं त्याग केला तो मला सर्वथैव मान्य आहे. कारण स्त्रियांना पति हेंच दैवत आहे. ..........

मला माझ्या या देहाची आतां मुळींच पर्वा नाहीं; आपला वंश माझ्या पोटांत आहे, तो बाहेर पडल्यावर जन्मोजन्मीं मला आपणच पति मिळावे, परंतु या जन्माप्रमाणें आपला मला वियोग न व्हावा, याकरतां मी उग्र तप करणार आहें; तेव्हां जरी पत्नी या नात्यानें आपण माझ्यावर यापुढें प्रेम न ठेविलें तरी आपल्या राज्यांतील एक तपस्विनी या दृष्टीनें माझ्यावर आपली सदैव कृपादृष्टि असावी."

अशा रीतीनें रामाज्ञेप्रमाणें सीतेचा त्या अघोर वनांत त्याग करून लक्ष्मण जड पावलांनीं परत फिरला; आणि सीता ही आतां पुढें काय करावें या विचाराला लागली.

## २९ पुत्रप्राप्ति

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें लक्ष्मण सीतामाईला अरण्यांत सोडून अयोध्येला निघून गेल्यावर 'पुढें काय करावें? या अरण्यांत आतां आपली स्थिति काय होईल?' इत्यादि विचारांत सीता निमग्न असतां तिथून नजीकच असलेल्या वाल्मीकीच्या आश्रमांतील[१] कांहीं शिष्य फुलें, समिधा इत्यादि यज्ञिय द्रव्यें जमा करण्यासाठीं तिथें आले. त्यांना सीतेचा करुणस्वर ऐकूं आल्यावर ते पुढें आले, तों गरोदर स्थितींत असलेली एक प्रौढ स्त्री अश्रुमोचन करीत असलेली त्यांना आढळली. त्यांनीं ही हकीकत वाल्मीकि ऋषींना जाऊन सांगितली. वाल्मीकि ऋषि तावडतोब तिथें आले. त्यांनीं अंतर्ज्ञानानें हा सर्व प्रकार पूर्वींच जाणला होता. त्यांनीं सीतेचें सांत्वन करून आपल्या आश्रमांत चलण्याची विनंति केली. सीतेला ती विनंति मान्य करणें भागच होतें. तेव्हां मोठ्या दुःखित अंतःकरणानें व जड पावलांनीं ती वाल्मीकीबरोबर त्यांच्या आश्रमांत जाऊन दांखल झाली.

सीता वाल्मीकीच्या आश्रमांत आल्यावर त्यानें तिची उत्तम व्यवस्था ठेविली. ती गरोदर आहे हें पाहून तर त्याला फारच आनंद वाटला. श्रीरामचंद्रासारख्या सर्वगुणसंपन्न आणि लोकाराधनासाठीं सर्वस्वावर तिलांजलि देणाऱ्या राजाची बायको आपल्या आश्रयाला यावी, इतकेंच नव्हे तर येथें प्रसूत होऊन तिला मुलगा व्हावा आणि त्याचें संवर्धन नि पालनपोषण करून त्याला राजपदाला अनुरूप असें शिक्षण देण्याची संधी आपल्याला मिळावी, हा विचार त्याला अत्यंत आनंददायक वाटला आणि त्यानें व त्याच्या आश्रमांतील सर्व मंडळींनीं सीतेला आपण कोणीकडे तरी अरण्यांत येऊन पडलों आहों असें न वाटतां तिच्या त्या वेळच्या स्थितीला आवश्यक अशा सर्व प्रकारच्या सोयी आणि साधनें तिला मिळवून देण्याची पराकाष्ठा केली.

योग्य काळ येतांच सीता त्या आश्रमांत प्रसूत झाली आणि तिला एकाऐवजीं

---

१ हा आश्रम 'तमसा' नदीच्या कांठीं होता.

दोन जुळे मुलगे झाले! वाल्मीकीनें त्या मुलांचे नालच्छेदनादि सर्व विधि यथासांग करविले आणि त्यांचीं लव आणि कुश अशीं नांवें ठेविलीं.[1]

हे जुळे मुलगे होते हें वाल्मीकिरामायणावरून दिसतेंच. पण दुसऱ्या एका ठिकाणची हकीकत वेगळी आहे ती अशी:—

सीता देवीला वास्तविक कुश हा एकच मुलगा झाला होता. परंतु एकदां ती नदीवर धुवावयास गेली असतां कांहीं वानरींनीं तिला 'तुझा मुलगा कोठें आहे?' असें विचारलें. तेव्हां 'मुलगा घरीं निजला आहे' असें सीतादेवीनें सांगितलें. त्यावर त्या वानरी म्हणाल्या; 'तूं मनुष्य जातीची स्त्री असून इतकी निर्दय? मग आम्ही वानरी बऱ्या. पोराला एक क्षणभरही आम्ही विसंबत नाहीं!' तें ऐकून सीतादेवी पुनः आश्रमीं आली व पाळण्यांतून कुशाला घेऊन गेली.

वाल्मीकि त्या वेळीं पाळण्याची दोरी हालवीत होते, पण त्यांचा डोळा लागला होता. पुढें जागे झाल्यावर पाळण्यांत मुलगा नाहींसें पाहून ते चिंतातुर झाले व सीतादेवी आल्यावर शोक करील म्हणून तेथल्या तेथें त्यांनीं 'लवां'चा एक मुलगा करून ठेवला!

इतक्यांत सीतादेवी नदीवरून आली. वाल्मीकि ऋषि पहातात तों तिच्या खांद्यावर मुलगा! 'हें काय?' म्हणून वाल्मीकींनीं विचारलें, तेव्हां वानरींची हकीकत सांगून 'तुमचा डोळा लागला असतांना मी येऊन कुशास घेऊन गेल्यें' असें सीता म्हणाली व नव्या मुलाविषयीं विचारूं लागली. तेव्हां वाल्मीकींनीं आपलें दिव्य कृत्य सांगून 'त्या कुशाबरोबरच या लवासही पुत्र समज व संभाळ' असें ते म्हणाले.!

× × × ×

हे बाल राजपुत्र दिवसामासांनीं वाढतां वाढतां सीतेच्या आणि आश्रमवासी सर्व जनांच्या अंतःकरणांना आल्हाद देऊं लागले. त्यांच्या बाललीला पाहून सीता आपलें दुःख क्षणैक तरी विसरून जात असे, आणि आश्रमांतला शिष्यगण तर हे आपल्याला चांगले सवंगडी मिळाले म्हणून नेहमीं आनंदांत असे.

---

१ या नांवांची कथा पुढीलप्रमाणें आहे:—

जो मुलगा वडील होता त्याच्या मस्तकावर मंतरलेल्या दर्भांच्या अग्रभागांनीं अभिषेक करण्यांत आला, त्यावरून त्याचें 'कुश' असें नांव ठेविलें.

नंतर दर्भांच्या खालच्या भागांनीं (लव) धाकट्या मुलाला अभिषिंचन केलें म्हणून वाल्मीकींनीं त्याचें नांव 'लव' ठेविलें.

होतां होतां ते चांगले सात आठ वर्षांचे झाले, तेव्हां वाल्मीकीनें त्यांचें मौंजीबंधन करून त्यांना वेदविद्या, शास्त्रविद्या, धनुर्विद्या इत्यादि क्षत्रियोचित अशा सर्व प्रकारच्या विद्या शिकविल्या. आणि स्वतः रचलेली रामकथा त्यांच्याकडून पाठ करवून घेतली. मात्र आपण त्या रामाचेच मुलगे आहों याची जाणीव त्यांना दिली नाहीं !

## ३० पितापुत्रांचें युद्ध

या दुसऱ्या सीतावियोगांत रामानें असला काल कसा घालविला असेल याचीही वाचकांनीं कल्पनाच केली पाहिजे. पूर्ववयांतला सीतेचा वियोग अनिच्छन्न होता. तो नष्ट होण्याची कांहीं तरी आशा होती. पण आतांचा हा वियोग आपण होऊन घडवून आणलेला होता. आणि सीतेची वास्तपुस्तही करावयाची नाहीं अशा निश्चयानें घडवून आणलेला असल्यामुळें तो कधींही नष्ट होण्याची आशा नव्हती. पण रामानें हे सर्व दिवस मनांतलें दुःख मनांत ठेवूनच काढले आणि आपल्या लौकिक व्यवहारांत कांहीं उणें पडूं दिलें नाहीं. असो.

त्या काळीं राजपीठाधिष्ठित व्यक्तीनें आपल्या आयुष्यांत एक तरी अश्वमेध यज्ञ करावा असा दंडक होता. रामाच्या वयाचीं आतां वरींच वर्षें झालीं होतीं. त्याची सर्व प्रजा आणि त्याचे सर्व मांडलिक त्याच्यावर अनुरक्त होते. तेव्हां क्षत्रियाचाराप्रमाणें एक अश्वमेध यज्ञ करावा असा विचार योजून त्यानें आपल्या प्रधानांना सर्व प्रकारची तयारी करण्याची आज्ञा केली.

रामाची आज्ञा झाल्यावर तयारीला काय उशीर ? लौकरच सर्व सिद्धता झाली. नाना देशींचे राजे आणि विद्वान ब्राह्मण यज्ञासाठीं उपस्थित झाले. शुभमुहूर्तावर यज्ञाचें पुण्याहवाचन होऊन रीतीप्रमाणें घोड्याच्या कपाळावर चिठी चिकटवून त्याला दिग्विजयार्थ बाहेर सोडण्यांत आलें.

घोडा जाईल तिकडच्या राजांनीं यज्ञकर्त्या राजाचें मांडलिकत्व कबूल करून त्याला करभार द्यावयाचा व तसा तो द्यावयाचा नसेल तर युद्धाला उभें राहावयाचें असा परिपाठ असे. घोड्याच्या मागोमाग यज्ञकर्त्या राजाचें चतुरंग बल तयार असेच. त्याप्रमाणें रामचंद्राचा हा घोडा आणि त्याच्या मागचें तें सैन्य दिग्विजय करीत चाललें, तें एक दिवस वाल्मीकीच्या आश्रमानजीक येऊन टेपलें.

रामाच्या अश्वमेध यज्ञाचा घोडा वाल्मीकीच्या आश्रमानजीक आला त्या वेळीं

वाल्मीकीचे शिष्य लव-कुशांसहवर्तमान आश्रमाच्या आसपास खेळत होते. त्यांनीं पाठीवर सुवर्णवस्त्रांच्या झुली घालून शृंगारलेला हा घोडा आणि त्याच्यामागून येणारे ते सैनिक पाहिले तेव्हां त्यांना प्रथम थोडासा आनंद व मागाहून भीति वाटली व ते आश्रमांत पळून जाऊं लागले. पण लवकुशांनीं त्यांना थांबवून धरलें आणि घोड्याला पकडून एका झाडाला बांधून ठेवलें।

घोड्याच्या मस्तकावरची पत्रिका त्यांनीं वाचून पाहिली तेव्हां त्यांना कळलें कीं रामचंद्र नांवाच्या कोणा क्षत्रिय राजानें अश्वमेध यज्ञ करण्याचें आरंभिलें असून इतर सर्व क्षत्रियांनीं आपलें मांडलिकत्व कबूल करावें म्हणून त्यानें हा घोडा सोडला आहे.

वाल्मीकीला ही सर्व हकीकत समजली व तो पुढें काय होतें तें पाहत स्वस्थ राहिला.

लव-कुश हे प्रत्यक्ष रामाचेच मुलगे. ज्याच्या अंगांत पाणी असेल आणि मनगटांत जोर असेल त्यानें या घोड्याला अडवावा ही त्या पत्रिकेंतील दर्पोक्ति पाहून त्यांचें क्षत्रिय रक्त वर उसळलें आणि ते त्या घोड्याला बांधून ठेऊन पुढें कोण येतो त्याची वाट पाहत राहिले.

घोडा बांधला गेला ही बातमी पाठीमागच्या वीरांना समजतांच रामाचें सगळें सैन्य आश्रमानजीक येऊन ठेपलें. हे दोघे बालवीर छाती पुढें काढून त्या सैन्याच्या समोर उभे राहिले आणि आपले भाते सरसावून 'कोण ते युद्धाला पुढें या' म्हणून त्यांनीं त्या अश्वरक्षकांना आव्हान केलें।

एकेक वीर लव-कुशांपुढें येऊन पराभूत होऊन माघारा जाई किंवा त्यांच्या बाणानें विद्ध होऊन भूमीवर पडे. पुढें शत्रुघ्न, भरत आणि लक्ष्मण अशा खाशा स्वाऱ्याही कुश-लवांच्या शर व अस्त्र-नैपुण्यानें स्तिमित होऊन त्यांच्या जाळ्यांत अडकून पडल्या.

शेवटीं श्रीरामचंद्रांना ही बातमी समजली, तेव्हां त्यांना स्वतः राजधानी सोडून या अद्वितीय युद्धांत भाग घ्यावा लागला।

वाल्मीकीच्या आश्रमाशेजारीं चाललेलें हें पिता-पुत्रयुद्ध पाहण्याला नाना देशींचे लोकच नव्हे तर स्वर्गांतले देवही जमा झाले. बापलेंकांमध्यें कांहीं काळ खरोखरच घनघोर युद्ध झालें. ते छोटे वीर कांहीं केल्या मागें हटेनात. तेव्हां हीं बाळें ऋषीच्या आश्रमांत वाढलेलीं असलीं तरी तीं ब्राह्मणाचीं नव्हत, हे

क्षत्रियांचे बच्चे असले पाहिजेत अशी खात्री होऊन रामचंद्रांनीं त्या मुलांचें नांव-गांव विचारलें. त्या मुलांनीं अगदीं बेपर्वाईनें उत्तर दिलें, "युद्धांत नांव-गांव घेऊन काय करावयाचें आहे? युद्धांत नांव–गांव न पहातां पौरुष पहावयाचें असतें. तेव्हां आम्ही कोणीही असलों तरी तुझ्यावरोबर युद्ध करण्याला उभे राहिलों आहों. युद्ध करावयाचें असेल तर कर; नाहींतर शरण ये, म्हणजे जीवदान देतों!"

पुढें पुनः युद्धाला सुरुवात झाली. रामचंद्रांनीं एका अस्त्राचा जप करून तें त्या मुलांवर सोडावें तों त्यांनीं तात्काळ त्या अस्त्राचा प्रतिरोध करणाऱ्या दुसऱ्या अस्त्राचा जप करून त्या अस्त्रांची झोंबी लावावी, असा प्रकार चालू झाला. कित्येक प्रहर हें युद्ध निकरानें लढलें गेलें. शेवटीं सभोंवार जमलेल्या ऋषींनीं आतां पुरे झाली ही गम्मत असें म्हणून रामाची आणि कुशलवांची ओळख करून दिली. वाल्मीकीनें रामाला सर्व वृत्तांत सांगितला आणि ही सगळी मंडळी ऋषिगणांसमवेत अश्वमेध पुरा करण्यासाठीं अयोध्या नगरींत जाऊन दाखल झाली.

## ३१ पुनर्मीलन आणि शेवट

पितापुत्रांची ओळख होऊन सीतेसहवर्तमान सर्व मंडळी श्रीरामाच्या अश्वमेधाला आली. वाल्मीकि महर्षींनीं कुशलवांना सर्व रामायण पढवून ठेवलें होतें, तें त्यांनीं श्रीरामचंद्राला गाऊन दाखविलें. श्रीरामचंद्राच्या मनांतून आतां सीतेनें पुनः एकदां दिव्य करून सर्वांसमक्ष आपली शुद्धता जाहीर करावी असें होतें. सीतेलाही अशी संधि मिळाल्यास पाहिजेच होती. मात्र आतां तिला राजवैभव भोगण्यासाठीं हें दिव्य करण्याची आवश्यकता वाटत नव्हती. तर आतां आपलें वय झालेंच आहे, तेव्हां श्रीरामासमक्ष देहत्याग झाल्यास इहजन्माचें सार्थक झाल्यासारखें होईल हाच विचार प्रामुख्यानें तिच्या मनांत होता. तेव्हां श्रीरामाची तशी इच्छा दिसल्याबरोबर लागलीच सीतेनें दिव्य करण्याची तयारी केली. वसिष्ठ–विश्वामित्रादि ऋषिगण, तसेंच अनेक ठिकाणचे राजे, वानर आणि राक्षस–मित्र यज्ञमंडपांत जमा झाले.

वाल्मीकि महर्षि मागें आणि हात जोडलेली, डोळ्यांतून अश्रुप्रवाह वाहत असलेली व मुख खालीं केलेली सीता पुढें, अशीं तीं दोघें सभेच्या मध्यभागीं आलीं. प्रत्येकाचे डोळे पुढच्या त्या भीषण कृत्याकडे लागून राहिले.

कांहीं वेळानें सर्व सभा निस्तब्ध आहे असें पाहून वाल्मीकि महर्षि म्हणाले:–
"दाशरथे रामचंद्रा! ही तुझी पतिव्रता व धर्मशील पत्नी सीता लोकापवादामुळें

तूं अरण्यांत टाकलीस, तेव्हांपासून ती माझ्या आश्रमांत होती. ही तुझ्या समाधानाकरतां आज दिव्य करून दाखविणार आहे. हे सीतेचे दोघे पुत्र तुझेच आहेत. मी प्रचेतसाचा आठवा पुत्र आहें. मी आजपर्यंत कधींही खोटें बोललों नाहीं. विदेह राजाची ही कन्या सर्वथैव निष्पाप व शुद्ध आहे हें मी सत्य सांगतों आहें. हें खोटें असेल तर माझी आज हजारों वर्षें केलेली तपश्चर्या निष्फळ होईल. सीताही आतां आपण निष्पाप असल्याबद्दल तुझी खात्री करून देईल."

यावर रामचंद्र हात जोडून म्हणाले:—"सीतेनें अग्नीचें दिव्य एकदां केलें व सर्व देवांनीं ती निष्पाप असल्याबद्दल माझी खात्री केली म्हणूनच मी तिचा स्वीकार करून तिला अयोध्येस घेऊन आलों. परंतु येथें तिच्याविषयीं लोकापवाद सुरू झाला म्हणून सीता निष्पाप आहे असें जाणत असूनही मीं तिला टाकलें, याबद्दल मला क्षमा करा. हे दोघे पुत्र माझे आहेत हें मला ठाऊक आहे. आतां या सर्व लोकांच्या खात्रीकरतां सीतेनें पुनः दिव्य करावें. सर्व लोकांसमक्ष सीता शुद्ध झाली म्हणजे मला तिच्याविषयीं अत्यंत प्रीति वाटेल."

रामचंद्राच्या या भाषणानंतर सीतेनेंही धीटपणानें पुढें पाऊल टाकलें. ती आतां अत्यंत कृश झाली होती. तपस्वी जनांच्या वेषाला योग्य असें भगवें वस्त्र तिनें परिधान केलें होतें. तिची दृष्टि सारखी जमिनीवर लागली होती. तिनें आतां हात जोडून धरणीमातेची प्रार्थना केली आणि मोठ्यानें म्हटलें:—

"जर आजपर्यंत रघुनाथाशिवाय दुसऱ्या कोणत्याही पुरुषास मीं मनांतसुद्धां आणलें नसेल, तर धरणीमाते तूं मला पोटांत घे! मनानें, कर्मानें व शब्दानें मीं आजपर्यंत श्रीरामावरच प्रेम केलें असेल, तर धरणीमाते तूं मला पोटांत घे! मला श्रीरामचंद्रावांचून दुसरा कोणताही पुरुष माहीत नाहीं हें जर अक्षरशः सत्य असेल, तर धरणीमाते तूं मला पोटांत घे[१]!" आणि खरोखरच धरणीमातेनें सीतामाईची ही विनंती अक्षरशः मान्य केली. कारण वर सांगितल्याप्रमाणें "धरणीमाते तूं मला पोटांत घे" हे शब्द तिसऱ्यांदां तिच्या मुखावाटे बाहेर

---

१ सीतादेवीच्या या अद्भुत निर्याणाविषयीं एका ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं अस्सल सोनें जसें कितीदांही अग्नींत घातलें तरी पिंवळेंच्या पिंवळेंच राहतें तद्वत् अनेक संकटांतून व लोकापवादाच्या माऱ्यांतून सीतादेवी शुद्धच्या शुद्धच राहिली, आणि आपल्या मागें एकही निंदक राहूं न देतां जगाला रामराम करून लोकांना चटका लावून निघून गेली!

पडतात न पडतात तोंच तिच्या पायांखालची जमीन एकदम दुभंग झाली आणि हां हां म्हणतां सीता त्यांत गडप होऊन गेली!

मनोवासनेमाजि रामूचि नांदे । उठे शब्द त्यामाजि रामूचि बोधे ॥
असे हेंचि जें सत्य साचार माये । त्वरें वाट दे वीवरीं माधवीये ॥ १ ॥
तनू आचरे तेथही चित्त रामीं । नसे राघवावीण आणीक कामीं ॥
असे सत्य हें वर्तलें साधनीं ये । धरे वीवरीं मार्ग दे माधवीये ॥ २ ॥
दिसे जागृतीं राम स्वप्नीं सुषुप्तीं । परा उन्मनीं भाव तो राम व्यक्तीं ॥
असे साच तें सौदरीं नांदवीं ये । त्वरें वीवरीं वाट दे माधवीये ॥ ३ ॥

× × × ×

तनू चिंतितां त्या राघूराजयाची । हरे वेधना (व्यथा) या भवात्रश्चिकाची ॥
स्मरा सादरें सर्वदा राम वाचे । रुळे (लोंबे) अंकणा क्रूर तो काळ साचें ॥४॥

—मुक्तेश्वर.

अशा रीतीनें या आदर्श पतिव्रतेचा जन्म नि शेवट भूमातेच्या उदरांतच झाला.[1]

## उपसंहार

उपोद्घातांत सांगितल्याप्रमाणें श्रीसीतामाईची आजन्म-भूमिप्रवेशकथा इथें संपली. यांतील कित्येक ठिकाणचा अद्भुत भाग बाजूला ठेविला तरी आदर्श गृहिणी म्हणून सीतेचें नांव आज हजारों वर्षें भरतखंडांत कां गाजत आहे हें या त्रोटक चरित्रावरूनही वाचकांना कळून येईल. तिचें पातिव्रत्य किती अप्रतिम व लोकोत्तर होतें, हें रामचंद्रांनीं एका रजकाच्या संशयग्रस्त बोलण्याची कदर बाळगण्यासाठीं जन्माची सोबतीण असलेल्या व लंकानिवासानंतर अग्निदिव्यांतून तावून सुलाखून निघालेल्या या सतीला 'आराधनाय लोकार्थं मुञ्चतो नास्ति मे व्यथा' हें उदात्त तत्त्व पुढें करून जेव्हां वनांत नेऊन सोडलें, तेव्हां तिनें रामचंद्रांना जो निरोप पाठविला, त्यावरून चांगलें दिसून येतें.

प्रथम तिनें "आपल्या गरोदर पत्नीला वनांत टाकणें हें तुमच्या कुळास व शीलास शोभत नाहीं" असें म्हटलें; पण लगेच "यांत तुमचा तरी काय दोष?

---

१ अलीकडेही एकाद्या अलौकिक प्रसंगीं सृष्टिरचनेंत कल्पनातीत स्थित्यंतर घडून आल्याचें दिसून येतें. नेपोलियनच्या मृत्यूच्या वेळची गोष्ट प्रसिद्धच आहे. तेव्हां सीतेच्या दिव्याचा हा दुसरा प्रसंग भूमातेनेंही उत्पातरूपानें साजरा करून आपल्या लाडक्या कन्येला पोटांत घ्यावें ही घटना घडून येणें असंभवनीय नाहीं.

माझें प्राक्तनच तसलें" असा विवेक करून पुढें सांगितलें कीं, "याच वेळीं मीं कदाचित् देहत्यागही केला असता. पण तुमचें वीर्य गर्भांत आहे त्याचा अडथळा झाला आहे. पण असें असलें तरी लक्षांत ठेवा कीं प्रसूति झाल्यावर मी अशीच तपश्चर्या करीन कीं जन्मजन्मांतरीं तुम्हींच माझे पति व्हावें."

लोकोत्तर पातिव्रत्याप्रमाणेंच सुखाच्या वेळीं हुरळून जाणें व दुःखाच्या वेळीं अगदीं गर्भगळित होणें हे जे दोष सामान्य स्त्रियांच्या–नव्हे पुरुषांच्याही–ठिकाणीं दिसून येतात त्या दोषांचा अभाव आणि दोन्ही प्रसंगीं वृत्तीचें गांभीर्य टिकवून धरण्याचा गुण सीतामाईच्या ठिकाणीं दिसून आला. आणि यांतही तिच्या श्रेष्ठत्वाचें बीज आहे असें थोड्या विचारान्तीं कळून येईल.

शिवाय सीतादेवीच्या चरित्राचें अनुकरणीयत्व तिच्यावर आलेले प्रसंग सामान्य स्त्रियांवरही येण्यासारखे असल्यामुळें त्या त्या प्रसंगीं ती कशी वागली हें पाहिल्यानें सहजच मनाला पटतें. कारण श्रीमंती, गरिबी, पति हतवीर्य झालेली स्थिति, पतीचा वियोग झालेली स्थिति, पतीनें टाकलेली स्थिति, इत्यादि सर्व प्रकारच्या अवस्थांतील भूमिका सीतादेवीनें प्रत्यक्ष आचरून दाखविल्या आहेत. मारुतीनें तर एका प्रसंगीं असे उद्गार काढले होते कीं, "श्रीरामप्रभूंनीं हिच्याकरतां केवळ समुद्रवलयांकित पृथ्वीच नव्हे, तर सर्व ब्रह्मांड जरी उलथें पालथें केलें तरीसुद्धां तें यथायोग्यच होय. कारण त्रैलोक्याचें आधिपत्य आणि सीतादेवी या दोहोंची जर तुलना करून पाहिली, तर त्रैलोक्याचें संपूर्ण राज्य श्रीसीतादेवीच्या पासंगालाही पुरणार नाहीं."

शेवटीं हें सीतामाईचें चरित्र आपण सतत डोळ्यांपुढें कां ठेविलें पाहिजे हें त्रिखंडकीर्ति श्रीमद्विवेकानंदांच्या शब्दांतच सांगून वाचकांचा निरोप घेऊं. स्वामीजी म्हणतातः—

"आर्यावर्ता, श्रीसीतादेवीला कालत्रयींही विसरूं नको. कारण स्त्रीधर्माचा तो एक अत्युच्च व उज्वल आदर्श आहे. भूतकालीन सर्व पुराणवाङ्मय कुचकामाचें ठरवून जर कोणाला रसातळाला पोहोंचवावेंसें वाटत असेल, तर मी त्यांना खात्रीनें सांगतों कीं, 'मग दुसरी एकादी सीतादेवी आढळेपर्यंत तुम्हांला तुमच्या विद्यमान व भविष्यकाळच्या वाङ्मयालाही जलसमाधीच द्यावी लागेल! ......पुराणेतिहासांतून दुसरे पूर्ण स्त्रियांचे आदर्श कोणीं कितीही निवडून काढले तरी त्यांना फार तर सीतादेवीच्या प्रभावळींत बसवितां येईल; पण सीतादेवीचें

आद्यस्थान त्यांना कधींही देतां येणार नाहीं······आमचें सर्व पुराणवाङ्मय जरी आम्हांस पारखें होत गेलें तरी आर्यावर्तांत जोंपर्यंत पांच आर्य जिवंत राहतील व त्यांना विचार व उच्चार करण्याची शक्ति असेल तोंपर्यंत सीतादेवीचें चरित्र विद्यमानच राहील.·······································

सीतादेवीचें चरित्र बाजूला काढून आर्य स्त्री–जातीच्या सुधारणेचा कोणताही उपाय कितीही शिताफीनें व अक्कलहुशारीनें योजला तरी त्यांत कदापि यश येणार नाहीं...आर्यावर्तांतील स्त्रियांनीं आपली सर्व संस्कृति, प्रगति व शीलसंघटना सीतादेवीचें चरित्र नेहमीं डोळ्यांपुढें ठेवून तिनें दाखविलेल्या राजमार्गानें प्रयत्नांची वाट चालूनच केली पाहिजे; हाच त्यांना एक सुरक्षित व यशस्वी उपाय आहे." इति शम् !

---

## अभ्यास व प्रश्न

### [ उपोद्घात ]

( १ ) "राम कदाचित् अनेक झाले असतील; पण सीता एकच होऊन गेली" याचें स्पष्टीकरण करा.

( २ ) सीतेच्या अंगचे कोणते गुण इथें विशेषत्वानें सांगितले आहेत?

( ३ ) सीताराम, सीतापति, जानकीजीवन यांचे अर्थ व समास सांगा.

( ४ ) महाकाव्य, पातिव्रत्य आणि आदर्श हीं कोणत्या प्रकारचीं नामें आहेत?

### [ १ ]

( १ ) "लक्ष्मी केवळ दुःखाची खाण" हें म्हणणें खरें आहे काय? कसें?

( २ ) स्थिरस्थावर, लावण्यखनी, उपवर, इत्थंभूत, निधिनिक्षेप यांचे अर्थ व समास सांगा.

( ३ ) 'प्रतिपाळिते' आणि 'अभिलाषिते' या शब्दांचें वैशिष्ट्य काय आहे?

( ४ ) या गोष्टींत 'अद्भुतता' कुठें आहे? अशा अद्भुत गोष्टींचीं आणखी दोन उदाहरणें सांगा.

( ५ ) मंदोदरी ही सतीपंचकांतील एक स्त्री आहे. हिनें रावणाला काय सांगितलें?

( ६ ) 'दाता–प्रतिगृहीता' याप्रमाणें आणखी तीन शब्दांच्या जोड्या तयार करा.

( ७ ) गर्गसंहितेंत सीतेच्या आईचें नांव 'रत्नमाला' असें दिलेलें असून रत्नमाला ही 'वैदेह जनक सीरध्वज' यास दिलेली होती असें म्हटलें आहे. सीतेच्या जन्मकथेचें ऐतिहासिक स्वरूप इथें कोणतें सांगितलें आहे? तें तुम्हांला पटतें का? कां?

[ २ ]

( १ ) श्रीविष्णूच्या एकंदर अवतारांचीं नांवें सांगा. अवतारांची पौराणिक मीमांसा काय असते?

( २ ) 'कुलगुरु' म्हणजे काय? तुमच्या कुलगुरूची माहिती मिळवा.

( ३ ) 'मौंजीबंधन' याचा शब्दशः अर्थ काय? त्याचा रूढ अर्थ कोणता आहे?

( ४ ) 'पुत्रकामेष्टि' हें एका यज्ञाचें नांव आहे. अशींच आणखी दोन यज्ञांचीं नांवें सांगा.

( ५ ) पूर्वी राजे लोकांत आणि सामान्य लोकांतही अनेक बायका करण्याची चाल होती. आतां असें करतां येईल का? कां?

[ ३ ]

( १ ) 'शिवधनुष्य' म्हणजे शंकराचें धनुष्य हें त्यानें जनकाचा पूर्वज 'निमिपुत्र' देवरात याला दिलें, तेव्हांपासून तें या घराण्याच्या शस्त्रागारांत होतें. सीता त्याचा कोणता उपयोग करी?

( २ ) सीतेच्या शिक्षणाविषयीं इथें कोणती माहिती दिली आहे? हल्लींच्या शिक्षणांत या गोष्टी येतात का? कां?

( ३ ) सीतेविषयीं कोणीं कोणतें भविष्य वर्तविलें होतें?

( ४ ) सरहस्य, श्रोत्रिय, सिद्धान्ती आणि शमदमावलंबी यांचे अर्थ स्पष्ट करा.

[ ४ ]

( १ ) पूर्वी पुस्तकी विद्येनंतर देशपर्यटन करविणें अवश्य मानलें जाई. 'केल्यानें देशाटन' इ० श्लोक प्रसिद्धच आहे. या देशपर्यटनाचे फायदे सांगा.

( २ ) विश्वामित्राच्या कोपिष्टपणाची एक गोष्ट सांगा. 'दुर्वास' आणि 'जमदग्नि' हे असेच दुसरे कोपिष्ठ ऋषि होते. त्यांच्या गोष्टी मिळवून वाचा.

( ३ ) 'सिद्धाश्रम' याचा अर्थ ज्या ठिकाणचें तप सिद्धीला जातें असा आहे. या आश्रमाचें येथलें वर्णन वाचून तुम्हीं पाहिलेल्या एकाद्या बागेचें असेंच वर्णन करण्याचा प्रयत्न करा.

( ४ ) 'राक्षस' याचा फार पूर्वीचा अर्थ 'रक्षण करणारा' असा होता. पुढें तो शब्द क्रूर, नरमांसभक्षक लोकांना लावूं लागले. आज त्याचा अलंकारिक अर्थ कोणता आहे?

[ ५ ]

( १ ) सीतारामांचा विवाह स्वयंवरानें झाला कीं नाहीं याबद्दल रामायणपरीक्षकांत मतभेद आहे. कारण 'स्वयंवर' म्हणजे उपवर वधूनें अथवा कन्यकेनें स्वतःच्या परीक्षेनें आवडीनुरूप वर पसंत करून त्याच्या गळ्यांत माळ घालणें. पण येथें सीतेच्या आवडीवर ही गोष्ट अवलंबून न ठेवतां 'त्र्यंबक' धनुष्याच्या 'पणा' वर ठेविली होती, व तीही जनकाच्याच पसंतीनें. आणि हें 'स्वयंवर' नव्हतें म्हणावें, तर सर्व व्यवहार हुबेहुब स्वयंवराप्रमाणें चालले होते. 'वामन', 'नागेश', 'विठ्ठल', 'चिंतामणि' इत्यादि कवींनीं यावर सुंदर काव्यें रचिलीं आहेत. तीं मिळवून वाचा.

( २ ) "रावण मूळचा ब्राह्मणपुत्र असून गुणांनीं राक्षस बनला होता" ह्याचें स्पष्टीकरण करा.

( ३ ) 'प्रत्यंचा' म्हणजे काय? 'धनुर्विद्या'विषयक आणखी दोन शब्द सांगा.

[ ६ ]

( १ ) विवाहाचा शास्त्रोक्त विधि–लौकिकाचारासुद्धां वामन पंडित या प्रसिद्ध कवीनें वर्णिला आहे. वामनाच्या कवितेंतून तो वेगळा काढून आपल्या वहींत टिपून ठेवा. विवाहाचीं मुख्य अंगें सांगा.

( २ ) तुमच्या ओळखीच्या वधू–वरांच्या विवाहानंतरच्या परस्परप्रेमाचें वर्णन करा.

( ३ ) आदर्श गृहस्थाश्रमाविषयीं इथें काय म्हटलें आहे? त्यांतील प्रत्येक घटकाचें स्पष्टीकरण करा.

( ४ ) परशुराम हा श्रीविष्णूचा सहावा अवतार व दाशरथि राम हा सातवा अवतार होय. आठवा अवतार कोणता?

[ ७ ]

( १ ) यांतील रामाच्या गुणांचें वर्णन कसें केलें आहे पहा. त्यांत आणखी कोणत्या गुणांची भर घालतां येईल? ( तुम्हांला माहीत असलेल्या रामचरित्रावरून हे गुण सांगा. )

( २ ) 'वानप्रस्थाश्रम', 'अनुपस्थिति', 'उर्वरित' आणि 'अवतारी विभूति' यांचे अर्थ सांगा.

( ३ ) 'मुखांत माती कालविणें', 'जीवश्च कंठश्च मैत्री' आणि 'कान फुंकणें' यांचें स्पष्टीकरण करून त्यांचा वाक्यांत उपयोग करून दाखवा.

( ४ ) पुढील वाक्यांचें स्पष्टीकरण कराः–( अ ) मंथरेनें कैकेयीचा सवती-मत्सर पेटवून तिच्या अंतःकरणांत द्वेषाग्नीचें होमकुंड तयार केलें.

( आ ) कैकेयी वयानें कनिष्ठ असली तरी–किंबहुना त्या कारणा-मुळेंच दशरथाची फार लाडकी राणी होती.

तुमच्या माहितीच्या अशी परिस्थिति असलेल्या व्यक्तींच्या आयुष्यांतील दोन दोन घटना सांगा. [ त्या व्यक्ति तुमच्या नात्यांतील किंवा ओळखीच्या असल्या तरी त्यांचीं नांवें न देतां त्या जागीं 'अ' 'आ' इत्यादि अक्षरें घालावीं. ]

[ ८ ]

( १ ) यांत दिलेल्या हकीगतीवरून सीता व लक्ष्मण यांच्या अंगचे कोणते गुण दिसून येतात?

( २ ) श्रीरामांनीं अरण्यवासाचीं दुःखें यांत कथन केलीं आहेत तीं तुम्ही आपल्या शब्दांत थोडक्यांत सांगा.

( ३ ) सीता–कौसल्या यांच्यामधला यावेळचा एक संवाद तयार करा.

( ४ ) 'वज्राघात', 'त्रैलोक्य', 'पाढा वाचणें' आणि 'आडरानांत शिरणें' यांचे अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करून दाखवा.

( ५ ) यांत 'बायकांचें शेवटचें अस्त्र' कशाला म्हटलें आहे? तें खरें आहे का? कसें?

[ ९ ]

( १ ) भरताला कैकेयीचें करणें कां आवडलें नाहीं? त्यानें तिला काय सांगितलें?

( २ ) 'प्रतिनिधि' म्हणजे काय? सध्यां असा प्रतिनिधिद्वारा राज्यकारभार पाहिला जातो काय? कां?

( ३ ) श्रीरामांनीं अरण्यासंबंधानें लक्ष्मणाला काय सांगितलें?

( ४ ) यांतील वर्णनावरून भरताच्या अंगचे कोणते गुण दिसून आले?

'भरत' या नांवाचा आणखी एकादा पुरुष पूर्वी होऊन गेलेला तुम्हांला माहीत आहे का? त्याच्यासंबंधानें ५ वाक्यें लिहा.

[ १० ]

( १ ) अनसूयेनें सीतेला कोणता उपदेश केला? पतिव्रतेचीं लक्षणें कोणतीं सांगितलीं?

( २ ) श्रीदत्तात्रेयाचा अवतार श्रीरामचंद्राच्या पूर्वीचा. तो अत्रि–अनसूया यांच्या पुण्याईनें त्यांच्या घरीं त्यांच्या प्रौढपणीं झाला. त्याबद्दलची पौराणिक कथा मिळवून वाचा.

( ३ ) यांत 'सावित्री'चा उल्लेख आला आहे, तीही सीतेच्या पूर्वीचीच सती होय. 'सावित्रीगीत' मिळवून वाचा व त्यावरून सावित्रीचें चरित्र दहा ओळींत लिहून काढा.

[ ११ ]

( १ ) यांत कोणत्या ऋषींचीं व राक्षसांचीं नांवें आलीं आहेत? त्यांच्या-संबंधीं अधिक माहिती मिळवा.

( २ ) रामानें राक्षसांचा केलेला वध ही हिंसा होती काय? चर्चा करा.

( ३ ) 'पंचवटी' हें नांव त्या ठिकाणीं पूर्वी पांच वड होते म्हणून पडलें आहे. अशाच प्रकारचीं आणखीं दोन गांवांचीं किंवा वाड्यांचीं नांवें सांगा.

( ४ ) यांतील राक्षसांचें वर्णन तुमच्या शब्दांत पांच ओळींत लिहा.

( ५ ) 'हातचा मळ', 'समानशत्रुत्व' यांचें संदर्भासह स्पष्टीकरण करा.

( ६ ) एकाद्या अरण्यांत तुम्हीं सहलीला गेलां आहां अशी कल्पना करून त्या दिवसाच्या कार्यक्रमाचें वर्णन करा.

[ १२ ]

( १ ) 'शूर्पणखा' हें नांव कशावरून पडलें असावें असें तुम्हांला वाटतें? अशाच प्रकारचीं आणखी दोन नांवें सांगा.

( २ ) येथें 'प्रयोजन' हा शब्द कोणत्या अर्थी योजला आहे? त्याचा दुसरा अर्थ काय आहे? अशा प्रकारचे दोन अर्थ असणारे आणखी तीन शब्द सांगा.

( ३ ) 'अदृष्ट' हा शब्द इथें रावणासंबंधानें कां योजला आहे ?

( ४ ) "आधीं बुद्धि जाते नि मग भांडवल जातें" ही म्हण या प्रकरणांतील हकीकत वाचून सार्थ आहे असें म्हणतां येईल का ? कसें ?

[ १३ ]

( १ ) यांतील मारीच व रावण यांच्या संवादावरून मारीचाच्या अंगचा कोणता गुण दिसून आला ?

( २ ) 'सुवर्णमृगा'चें वर्णन इथें कसें केलें आहे ? तुम्हीं पाहिलेल्या एकाद्या हरिणाचें वर्णन करा.

( ३ ) 'पुराण' हा शब्द इथें कोणत्या अर्थानें वापरला आहे ? हा शब्द योजून आणखी एकादें वाक्य बनवा.

( ४ ) 'अग्रेसर', 'हितशत्रु', 'मित्रकार्य' यांचे अर्थ स्पष्ट करा.

( ५ ) राक्षसांचें **मायावी रूप** व **आकाशगमन** यासंबंधानें श्री. तांबे-शास्त्री म्हणतातः—

"आमचे मतें आकाशांतून संचार करणें व पाहिजे तें रूप धारण करणें ही एक विद्या किंवा सिद्धि होती. राक्षसांपैकीं पुष्कळांस ही विद्या येत असे असें दिसतें. तथापि सर्वच राक्षसांस ही विद्या अवगत नसे······ही विद्या म्हणजे नजरबंदी करण्याची विद्या होय. म्हणजे दुसऱ्या माणसास वस्तु असून न दिसणें, विकृत स्वरूपांत दिसणें, अगर नसून दिसणें अशा प्रकारची ती विद्या असावी."

याला आधार म्हणून त्यांनीं फ्रान्स देशांत एका फकिरानें मोठमोठ्या तत्त्वज्ञांसमोर केलेल्या एका प्रयोगाची माहिती दिली आहे ती अशीः—

"त्या फकिरानें आकाशांत एक सुताचा दोरा फेंकला; तो दोरा मेघ-मंडळापर्यंत उंच गेला ! नंतर त्या फकिराचा चेला तो दोरा धरून भराभर वर चढला व क्षणांत अदृश्य झाला ! फकिरानें चेल्यास हांका मारल्या; पण तो परत येईना व हांकही देईना ! तेव्हां फकीर रागा-रागानें हातांत सुरा घेऊन त्याच दोऱ्यास धरून वर गेला व तोही अदृश्य झाला !

कांहीं वेळानें आकाशांतून रक्ताचे थेंब जमिनीवर पडूं लागले व नंतर त्या चेल्याचे हात, पाय व डोकें हीं भूमीवर पडलीं !

इतका प्रकार झाल्यावर तो फकीर व चेला एकाएकीं भूमीवर प्रगट झाले, व ते तुटून पडलेले अवयव अदृश्य झाले!

पाश्चात्य तत्ववेत्त्यांनीं या खेळाची कसून पाहणी केली. त्यांनीं सर्व देखाव्यांचे फोटो घेण्याची व्यवस्था केली होती. पण चमत्कार हा कीं फोटोंत एकही चमत्कार उठला नाहीं! प्रत्येक फोटोंत फकीर व चेला स्वस्थ उभे आहेत असें दिसे!

यावरून असा निष्कर्ष निघाला कीं, फकिरानें आपल्या विद्येनें प्रेक्षकांचे दृष्टीस भूल पाडून आपल्या इच्छाशक्तीनें हवे ते देखावे दाखविले व ते त्यांस खरे वाटले! फोटोचें यंत्र अचेतन पडल्यामुळें त्यावर फकिराच्या इच्छाशक्तीचा परिणाम झाला नाहीं!

[ १४ ]

(१) सीतेच्या या प्रसंगींच्या वर्तनाबद्दल तुम्हांला काय वाटतें हें थोडक्यांत सांगा.

(२) लक्ष्मणाच्या या वेळच्या शांत वृत्तीवरून तुम्ही कोणता बोध घ्याल?

(३) 'आश्चर्यमूढ', 'प्राज्ञा नसणें' आणि 'काळजावर घाव घालणें' यांचें स्पष्टीकरण करून त्यांचा वाक्यांत उपयोग करून दाखवा.

[ १५ ]

(१) जटायु व संपाति हे 'गृध्र' जमातीचे पुढारी होते असें आधुनिक पुराण-संशोधकांचें मत आहे. ऋक्ष, नाग, वानर ह्याही त्या वेळच्या जमातीच होत्या. किंवा असेंही असेल कीं त्या वेळच्या सैन्याच्या एकेका तुकडीच्या ध्वजावर हीं चिन्हें लावीत असतील व त्यामुळें त्या सैनिकांना व त्यांच्या जमातीला तींच नांवें पडलीं असतील. या दृष्टीनें विचार करा व यासंबंधानें आणखी उपपत्ति सुचवा.

(२) या वेळचा रावण–जटायु संवाद तयार करा.

(३) तुम्ही वाट चुकून एकाद्या रानांत सांपडलां आहां अशी कल्पना करून त्या वेळच्या मनःस्थितीचें वर्णन करा.

(४) तत्कालीन युद्धनीतीचा कोणता विशेष यांत सांगितला आहे?

[ १६ ]

( १ ) 'मृगनयना', 'गजगामिनी', 'कमललोचना' हीं विशेषणें सीतेला उद्देशून यांत आलेलीं आहेत. त्यांची फोड करून तीं आजच्या स्त्रियांना लावितां येतील कीं काय तें सांगा.

( २ ) यांत कोणत्या वृक्षांचीं नावें आलीं आहेत? रामानें त्यांना काय विचारलें? यावरून त्याची ह्या वेळीं अवस्था कशी झाली होती असें तुम्हांला वाटतें?

( ३ ) स्त्रीविरहामुळें दुःखी झालेल्या तुमच्या माहितीच्या एकाद्या व्यक्तीची अवस्था वर्णन करा.

[ १७ ]

( १ ) यांतील 'अशोक'वनाच्या वर्णनाप्रमाणेंच तुम्हीं पाहिलेल्या एकाद्या बागेचें वर्णन करा.

( २ ) यांत राक्षसींचें वर्णन कसें केलें आहे? असल्या स्त्रिया आतां कुठें दिसतात का? कां?

[ १८ ]

( १ ) जटायूला रामानें चुलत्यासारखा मानला होता असें यांत सांगितलें आहे. आर्यसंस्कृतीचा कोणता विशेष यांत दिसून येतो?

( २ ) 'कबंधा'ची कुळकथा थोडक्यांत सांगा.

( ३ ) 'अरबी भाषेंतील चमत्कारिक गोष्टींची आठवण' यांतील कोणतें वर्णन वाचून होते?

( ४ ) पुराणांतील वर्णनें शब्दशः खरीं न मानतां त्यांतील 'अलंकार' बाजूला ठेवून 'रहस्य' शोधून काढणें या पद्धतीला 'रहस्योद्ग्राही' पद्धति म्हणतात. या प्रकरणांत ही पद्धति कुठें अवलंबिली आहे?

( ५ ) 'स्थूलचिरा', 'अग्निसात् करणें', 'अद्भुतरम्य' आणि 'क्रौंचारण्य' यांचें संदर्भासह स्पष्टीकरण करा.

[ १९ ]

( १ ) वानरांविषयीं येथें काय म्हटलें आहे?

( २ ) हनुमानाच्या बालपणाची गोष्ट सांगा. 'वायुसुत' याचा अर्थ काय?

( ३ ) सप्त चिरंजीवांचीं नांवें सांगा.
( ४ ) 'अतुलबलशाली', 'आजन्म', 'जिवाला जीव देणें', 'थरकांप सुटणें' यांचे अर्थ स्पष्ट करा.

[ २० ]

( १ ) मारुतीला लागलेल्या भुयाराचें थोडक्यांत वर्णन करा.
( २ ) या वर्णनावरून काय दिसून येतें?
( ३ ) कुंभकर्ण व बिभीषण यांची कोणती माहिती यांत दिली आहे? त्यावरून काय दिसून येतें?
( ४ ) 'विषयलंपट', 'परदारापहरण' व 'पाण्यांत पहाणें' यांचे अर्थ स्पष्ट करा.

[ २१ ]

( १ ) पापी मनुष्य केवढाही बलाढ्य असला तरी ऐन प्रसंगीं भित्रा बनतो, असें या प्रकरणांतील कोणत्या प्रसंगावरून दिसून येतें?
( २ ) रावणानें सीतेला वश करण्यासाठीं कोणते उपाय योजले? सीतेनें रावणाला कोणता उपदेश केला?
( ३ ) रावणाचें भस्म न करण्याबद्दल सीतेनें कोणतें कारण दिलें होतें?
( ४ ) 'नष्टचर्य ओढवणें' म्हणजे काय? याचा तुमच्या स्वतःच्या दुसऱ्या एकाद्या वाक्यांत उपयोग करून दाखवा.
( ५ ) 'नागिणीसारखी चवताळली' असें इथें सीतेविषयीं म्हटलें आहे. पुरुषाविषयीं बोलावयाचें झाल्यास कोणता प्रयोग कराल?

[ २२ ]

( १ ) 'स्थापत्यविशारद' म्हणजे काय? ही पदवी कोणाबद्दल योजली आहे?
( २ ) 'अंगदा'विषयीं अधिक माहिती मिळवा. 'अंगदशिष्टाई' हा शब्द कोणत्या प्रकारच्या 'शिष्टाई'ला लावतात? कां?
( ३ ) 'रामरावणयोर्युद्धं रामरावणयोरिव' याचा अर्थ काय? यावरून काय सूचित केलें आहे?
( ४ ) 'हातावर तुरी देणें' आणि 'कच्च्या गुरूचा चेला' यांचें स्पष्टीकरण करा.

[ २३ ]

( १ ) सीतेच्या बंदिवासांतील मैत्रिणींविषयीं इथें कोणती माहिती दिली आहे?

(२) यांत मनुष्यस्वभावांतील चांगुलपणा कोणत्या बाबतींत दिसून आला? तुमच्या माहितीचें असेंच दुसरें एकादें उदाहरण सांगा.

(३) 'प्रहस्त' हा कोण होता? रावणाच्या आणखी सेनापतींचीं नांवें मिळवून आपल्या वहींत टिपून ठेवा.

[ २४ ]

(१) रावण सीतेला ठार मारण्याला कां प्रवृत्त झाला?

(२) रामाचें बंधुप्रेम दाखविणारा कोणता प्रसंग यांत वर्णिला आहे?

(३) लक्ष्मणानें शोकावेगांत कोणते उद्गार काढले? यावरून मनुष्यस्वभावांतील कोणत्या भागावर प्रकाश पडतो?

(४) श्रीरामचंद्राच्या बाजूनें लढणाऱ्या कोणत्या वीरांचीं नांवें यांत आलीं आहेत? त्यांची अधिक माहिती मिळवा.

(५) 'धन्वंतरी', 'शक्ति' आणि 'संजीविनी' यांवर थोडक्यांत टीपा लिहा.

[ २५ ]

(१) श्रीरामचंद्रांनीं या प्रसंगीं कोणता संयम दाखविला? या वेळीं त्यांनीं सीतेविषयीं काढलेले उद्गार स्वाभाविक होते का? चर्चा करा.

(२) 'प्राकृत' शब्द इथें कोणत्या अर्थानें योजिला आहे? त्याचा दुसरा अर्थ काय?

(३) "तुम्हांला तुमच्याच मोठेपणाची शपथ आहे" याचें स्पष्टीकरण करा.

(४) 'निःशब्द स्तब्धता' या वाक्प्रयोगाचें वैशिष्ट्य काय आहे? असेच आणखी दोन प्रयोग सांगा.

(५) 'अनपेक्षित', 'कामपरायणता' आणि 'सद्गदित' यांना व्याकरणांत कोणतीं नांवें देतात?

[ २६ ]

(१) "दोघांच्याही प्रेमाचा पूर अश्रूंच्या रूपानें वाहूं लागला" यांत कोणता अलंकार साधला आहे? याच अलंकाराचें आणखी एक उदाहरण सांगा.

(२) "राजा–प्रजा..... उचंबळत राहिलें" हा परिच्छेद तुमच्या स्वतःच्या शब्दांत लिहा.

(३) 'भ्रातृवत्सल', 'मुनिव्रत' आणि 'राजछत्र' यांचे अर्थ सांगा.

[ २७ ]

( १ ) 'रामराज्य' या शब्दांत कोणता अर्थ भरला आहे?
( २ ) श्रीरामचंद्राचें शत्रुपक्षाशीं वर्तन दिलदारपणाचें होतें, याचें कोणतें उदाहरण इथें दिलें आहे?
( ३ ) "सीतारामांचा जोडा .... एका पायावर उभा"—याप्रमाणें एक रेखाचित्र तयार करा.
( ४ ) 'अस्तेय', 'स्वकर्मनिरत', 'मदांध' आणि 'वज्रबाहु' यांचा अर्थ सांगून त्या समासांचीं नांवें सांगा.

[ २८ ]

( १ ) धोब्यानें रामचंद्राला कोणतें विशेषण लावलें?
( २ ) सीतेनें रामाला कोणता निरोप पाठविला? लक्ष्मणानें कोणती खबरदारी घेतली होती?
( ३ ) 'रामाचा शब्द म्हणजे शब्द!' याचें स्पष्टीकरण करा. असाच दुसरा एकादा वाक्प्रचार सांगा.
( ४ ) 'डोहळे होणें' हा वाक्प्रचार कसा रूढ झाला आहे? या प्रकरणांतील हकीकत त्याला धरून आहे का?
( ५ ) या प्रकरणाला दिलेलें नांव सार्थ आहे का? कसें? तुम्हीं दुसरें एकादें नांव सुचवा.
( ६ ) सीतेच्या आयुष्यांतील बालपणापासूनचा चित्रपट तयार करावयाचा झाला तर या प्रकरणांतील कोणता भाग उपयोगी पडेल?

[ २९ ]

( १ ) वाल्मीकीला आनंद कां वाटला? आणि आश्रमवासी शिष्यांना?
( २ ) रामचंद्राचें बालपण आणि लव-कुशांचें बालपण यांची तुलना करा.
( ३ ) 'तिलांजलि देणें' हा वाक्प्रचार कशावरून आला आहे? "लोकाराधनासाठीं सर्वस्वावर तिलांजलि देणें" याचें स्पष्टीकरण करा.
( ४ ) 'लोकाराधन' आणि 'लोकसंग्रह' यांतील भेद स्पष्ट करा.
( ५ ) 'क्षणैक', 'क्षत्रियोचित' यांतील संधींची फोड करा. हे संधि ज्या नियमांनीं झाले ते नियम सांगा व त्यांचीं आणखी दोन दोन उदाहरणें द्या.

[ ३० ]

( १ ) एकंदर श्रीरामचरित्रावरून रामचंद्राला दोन वेळां पत्नीवियोग घडला असें दिसून येतें. त्या दोन्ही प्रसंगांची तुलना करा.

( २ ) 'अश्वमेध' यज्ञाची माहिती मिळवा. येथील घोड्याचें वर्णन कसें केलें आहे?

( ३ ) पत्रिकेंत काय होतें? लवकुशांनीं रामचंद्राला कोणतें उत्तर दिलें? त्यावरून काय दिसून आलें?

( ४ ) 'अनिच्छिन्न', 'अनुरक्त', 'प्रतिरोध' यांतील उपसर्ग वेगळे करा. हेच उपसर्ग लावून आणखी दोन दोन शब्द बनवा.

[ ३१ ]

( १ ) सीतेनें जीं दोन दिव्यें केलीं त्यांत कोणता फरक होता? दुसऱ्या दिव्याच्या वेळची तिची मनःस्थिति कशी होती?

( २ ) 'वाल्मीकी'नें आपली कुळकथा कशी सांगितली आहे? त्याची दुसरी कोणती कुळकथा तुम्हांला माहीत आहे?

( ३ ) रामानें आपला पश्चात्ताप कसा व्यक्त केला?

( ४ ) 'इहजन्म', 'दिव्य' आणि 'भीषण' यांचे अर्थ सांगून त्यांच्या विरुद्ध अर्थाचे शब्दही सांगा.

## उपसंहार

( १ ) श्रीरामचंद्रांनीं सीतेला वनांत सोडतेवेळीं कोणतें तत्त्व पुढें केलें होतें? यांत त्यांनीं सीतेला अन्याय केला असें तुम्हांला वाटतें का? कां?

( २ ) सीतेनें रामचंद्राला कोणता निरोप पाठविला?

( ३ ) सीतेच्या श्रेष्ठत्वाचें बीज आणखी कोणत्या गुणांत दिसून आलें?

( ४ ) मारुतीनें सीतेविषयीं कोणते उद्गार काढले होते?

( ५ ) स्वामी विवेकानंद हे बंगाल्यांत होऊन गेलेले एक 'मिशनरी' वृत्तीचे साधु होते. त्यांना आपल्या अध्यात्मविद्येचें श्रेष्ठत्व पटल्यावर त्यांनीं हिंदुस्तानांतच नव्हे तर युरोप–अमेरिका खंडातही या विद्येचा प्रसार केला. त्यांनीं सीतेविषयीं काय म्हटलें आहे?

( ६ ) 'लोकोत्तर', 'जन्मजन्मांतरीं' आणि 'पासंगालाही न पुरणें' यांचे अर्थ स्पष्ट करून त्यांचा वाक्यांत उपयोग करून दाखवा.

## परिशिष्ट

## [ १ ]

## सीतागीत

[ हें मोरोपंतांनीं आपले यजमान बाबूजी नाईक बारामतीकर यांच्या घरीं असतां त्यांच्या घरच्या सुना-मुलींना झोंपाळयावर बसून गाण्यासाठीं म्हणून रचलें होतें. ]

यज्ञासाठीं भूमि, नांगरितां धन्या । सांपडली कन्या, सीतादेवी ॥ १ ॥
जनकाची पुत्री, दुर्जना दुर्मिळा । ती भार्या उर्मिळा लक्ष्मणाची ॥ २ ॥
जनकाचा बंधू होता एकनिष्ठ । वयानें कनिष्ठ श्रेष्ठ गुणें ॥ ३ ॥
तेणें भरतासी मांडवी दुहिता । दिली जी सुहिता, दोहीं कुळीं ॥ ४ ॥
शत्रुघ्नाला दिली, दुजी श्रुतकीर्ती । जीची गाती कीर्ती पतिव्रता ॥ ५ ॥
चवघी बहिणी, भाग्यें झाल्या जावा । त्यांच्या गीतीं गावा सुसंवाद ॥ ६ ॥
वनवासवृत्त सीतेसी पुसती । प्रेमें त्या सुसती तिघी जणी ॥ ७ ॥
चित्रकूटाहुनी, पादुका घेऊनी । वियोग देऊनी तुम्ही आलां ॥ ८ ॥
आम्हीही तेथूनी तशींच निघालों । वनांत रिघालों तिघें जणें ॥ ९ ॥
लक्ष्मण भावोजी मागें पुढें स्वामी । मज आहें धामीं ऐसें वाटे ॥ १० ॥
अत्रीच्या आश्रमीं नेलें मज वाटे । माहेरचि वाटे खरेंखुरें ॥ ११ ॥
अनसूया सती करी वेणीफणी । आनंदाची धणी दिली मज ॥ १२ ॥
तेथें शूर्पणखा भार्या व्हाया आली । तिला माझी भ्याली चित्तवृत्ती ॥ १३ ॥
भावोजींनीं तीचा कर्णनासाछेद । केला कीं ते वेदशास्त्रार्थज्ञ ॥ १४ ॥
तीचा भाऊ खर होऊनियां क्रुद्ध । करावया युद्ध आला बाई ॥ १५ ॥
चवदा सहस्र राक्षस पापिष्ट । रणीं केले पिष्ट स्वामींनीं ते ॥ १६ ॥
तिनें प्राणरक्तें मुख मळविलें । वृत्त कळविलें रावणासी ॥ १७ ॥
छळाचा उपाय मनीं आठवीला । दुष्टें पाठवीला मायामृग ॥ १८ ॥
कपटी राक्षस जाणोनियां प्राण । घ्यावयासी बाण मोकलीला ॥ १९ ॥
तो बाण लागतां हृदय विदारी । दुष्ट हांका मारी स्वामीवाणी ॥ २० ॥
हा सीते ! हा बंधो ! लक्ष्मणा ! ये धावें । अंतकाळीं पावें भेटावया ॥ २१ ॥
मज वाटे माझ्या स्वामीचीच हांक । शिरे कंप धाक हृदयांत ॥ २२ ॥
मी म्हणें भावोजी, धांवा रक्षा प्राण । हे घ्या चापबाण उठा वेगीं ॥ २३ ॥

भावोजी म्हणती राक्षसाची माया । कोण रामराया पाहों शके ॥ २४ ॥
न वदावें तेंचि बोलिल्यें मी कोपें । चित्त शब्दरोपें विदारीलें ॥ २५ ॥
वांच्छितोसि दुष्टा, अग्रजाचा घात । माझ्या अंगा हात लावावया ॥ २६ ॥
माझ्या दृष्टीपुढें नको राहूं जाच । नरकींचा जाच मूर्त तूंचि ॥ २७ ॥
ऐशी बाई माझी ऐकतांचि वाणी । डोळां आलें पाणी भावोजींच्या ॥ २८ ॥
वाटेंत धनुष्य ओढोनियां रेघ । गेले दयामेघ स्वामींकडे ॥ २९ ॥
तों आला रावण होवोनी संन्यासी । न कळे अन्यासी छद्म त्याचें ॥ ३० ॥
भिक्षा द्याया गेलें रेघेच्या बाहेर । सासर माहेर बूडवाया ॥ ३१ ॥
रेघेच्या बाहेरी, जसा दिला पाय । झाला महाकाय दशमुख ॥ ३२ ॥
जसा हरिणीतें हरीतो लांडगा । तसा तो दांडगा हरी मातें ॥ ३३ ॥
हा राम ! लक्ष्मण ! ऐसी हांक माजी । जटायु मामाजी आयकती ॥ ३४ ॥
सखे दशरथ मामाजींचे आप्त । सोडवाया प्राप्त झाले दैवें ॥ ३५ ॥
जातीचे ते गृध्र, वृद्ध मोठे शूर । रथ केला चूर रावणाचा ॥ ३६ ॥
अन्यायें रावण छेदी त्यांचे पक्ष । मज वाटे लक्ष बंधुघात ॥ ३७ ॥
मूर्च्छित मामाजी पडले भूवरी । स्कंधीं वाहे अरी, मला बाई ॥ ३८ ॥
नेऊनियां ठेवी अशोकवनांत । न शोक मनांत माये माझ्या ॥ ३९ ॥
सहस्र राक्षसी करिती रक्षण । चिंतातीत क्षण न सांपडे ॥ ४० ॥
दिव्यान्नाचें ताट ये मजजवळ । भक्षीं मी कवळ एक दोन ॥ ४१ ॥
फिरले घेऊनी मारीच्याचे प्राण । दिव्य धनुर्बाणपाणी मागें ॥ ४२ ॥
मार्गी लक्ष्मणजी करिती वन्दन । श्रीरघुनंदनचरणांतें ॥ ४३ ॥
म्हणती वत्सा, त्वां कां आज्ञा मोडिली । एकली सोडिली कां ती वनीं ॥ ४४ ॥
भावोजींनीं सर्व वृत्त कळवीलें । मुख मळविलें अश्रुपातें ॥ ४५ ॥
केला आधीं फार शोध मग शोक । धन जातां लोक करी जैसा ॥ ४६ ॥
शोधितां वनांत मामाजी पाहिले । धरूनि राहिले कंठीं प्राण ॥ ४७ ॥
पुसती बापाजी झाली हे कां गती । मामाजी सांगती अर्धशब्दें ॥ ४८ ॥
स्वामीपाशीं माझें सांगतां हरण । पावले मरण शोकभरें ॥ ४९ ॥
मामाजींची सांग संपादिली क्रिया । त्या काळीं हे प्रिया नाठविली ॥ ५० ॥
आलिंगिल्या वल्ली वियोगें भ्रमले । शोधीतां श्रमले रात्रंदिवस ॥ ५१ ॥
वनीं कबंधानें केला होता घात । चार कोस हात लांब त्याचे ॥ ५२ ॥

सुग्रीवासी भेटी ऋष्यमूकीं झाली । त्याची दृष्टी धाकीं पाहतांचीं ॥ ५३ ॥
सुग्रीव वानर सूर्याचा तनय । ज्या स्वप्नीं अनय नाहीं ठावा ॥ ५४ ॥
बंधूची स्त्री वाली बलात्कारें भोगी । सुग्रीव तो जोगी केला होतां ॥ ५५ ॥
एकें बाणें वाली स्वामींनीं मारिला । सुग्रीव तारिला संकटांत ॥ ५६ ॥
माझी वार्ता कोणा न कळे किमपी । पाठविले कपी शोधावया ॥ ५७ ॥
श्रीरामाची भार्या सोडवितां मेला । जटायु तो गेला सद्गतीसी ॥ ५८ ॥
शत गांवें बाई मारुती उडाला । पुण्यें न बुडाला सागरांत ॥ ५९ ॥
पुरीं शोधी होय सशोक मनांत । अशोकवनांत मग आला ॥ ६० ॥
हळूच मारुती सद्गुणसमुद्रा । वर्णी मग मुद्रा मज दावी ॥ ६१ ॥
मज म्हणे चाल, बैस माझे स्कंधीं । तूं दुर्गा, मी नंदी दास तूझा ॥ ६२ ॥
तेव्हां मी बोलिल्यें नेशील बा खरें । परी नव्हे बरें, असें जाणें ॥ ६३ ॥
युद्धीं मारितील या मेल्यासी स्वामी । तेव्हां मुख बा मी दाखवीन ॥ ६४ ॥
मग तें अशोक-वन कपी मोडी । राक्षसांचें झोडी बळें सैन्य ॥ ६५ ॥
रावणें वानर मानूनियां तुच्छ । पेटविलें पुच्छ जाळावया ॥ ६६ ॥
पुच्छ पेटतांचि हनुमंत उडे । लंकेमध्यें हुडे वाडे जाळी ॥ ६७ ॥
विचारोनि मज जाय स्वामीकडे । पायांवरी पडे हनुमंत ॥ ६८ ॥
सेतुपंथें सिंधु लंघुनियां आले । वार्तामृतें धाले कर्ण माझे ॥ ६९ ॥
दूत पाठविला दुर्जनभंगद । तेजस्वी अंगद वालीपुत्र ॥ ७० ॥
मारिले प्रधान रावणाचे पोर । त्यांत बळी थोर इंद्रजीत ॥ ७१ ॥
रावणाचा भ्राता कुंभकर्ण काळ । तेणें कपी माळ धरीयेला ॥ ७२ ॥
बहिणीची तैसी, त्याची करी गती । स्वयें कपिपती सुटोनियां ॥ ७३ ॥
इंद्रासी असह्य इंद्रजित परी । मारीला तो अरी भावोजींनीं ॥ ७४ ॥
मारीला प्रभूंनीं सहपरिवार । उतरीला भार धरणीचा ॥ ७५ ॥
शिबिकेंत मज घालोनि आणीलें । देह म्यां न्हाणीलें अग्निकुंडीं ॥ ७६ ॥
त्या काळीं देवांनीं केली पुष्पवृष्टी । आनंदानें सृष्टी कोंदाटली ॥ ७७ ॥
आले दशरथ मामाजी विमानीं । धन्य जीवीं मानीं आपणां मी ॥ ७८ ॥
दाविली किष्किंधा भेटविली तारा । सुग्रीवाची दारा, जाऊबाई ॥ ७९ ॥
संतती संपत्ती वाढे होय हीत । प्रेमें गातां गीत श्रीरामाचें ॥ ८० ॥
श्रीरामातें ध्यावें श्रीरामातें गावें । श्रीरामातें भावें आठवावें ॥ ८१ ॥

०

## परिशिष्ट

## [ २ ]

# सीतास्वयंवर

## ( १ )

[ स्वयंवराची ही कथा अनेक कवींच्या वर्णनाचा विषय झाली आहे. पुढील उतारा वामन पंडितांच्या काव्यांतून घेतला असून त्यांत व्यवहारवर्णनांत वेदान्त गोंवण्याचें त्यांचें कौशल्य कसें दिसून येतें पहा. ]

रायें विवाहास मुहूर्त केला
लागे हरिद्रा नृपकन्यकेला ।
सुवासिनींच्या करपुष्करांनीं
सुरत्नकुंभाकरपुष्करांनीं ॥

चहूंही मोक्षांचे कलश चहुंकोनीं मिरविती; १
न जे ब्रह्मीं हेमीं दिसतिहि खरेसे म्हणविती; ।
गुणीं शुभ्रीं दावी सगुणपण संतांस सुमती
असें न्हाणें वारी अभिनव वधू शांति सुमती ॥ २

चढे तीस सर्वात्मतेची हरिद्रा
न जे ठाउकी भेदवाद्या दरिद्रा ।
तिचें शेष ये षड्गुणा रामचंद्रा
अविद्याग्निसंतप्तविश्रामचंद्रा ॥ ३

एक राम जनिं देवदेव कीं
भाव हा उभय देवदेवकीं ।
जान्हवी पुरवि काम कामना
वापिकाखननकाम का मना ॥ ४

जीव जे प्रकृतिअष्टकवर्गी
तृप्त ते सकळ अष्टकवर्गी ।
ज्योतिषी द्विज पुरोहित सारे
त्यांत एकहि न मोहितसा रे ॥ ५

गुणत्रयांच्या तटिनीप्रवाहीं
सत्त्वांबु शोधूनि पृथक् विवाहीं ।
ते घालिती काळघडी द्विजाती
सत्यें घड्या रामनिमित्त जाती ॥ ६

वाजवीत विविधा निगमार्ते
घे नृप श्रुतिन्चिया उगमार्ते ।
आणिला निजगृहा नवरा हो
जो 'मनीं' म्हणति मानव 'राहो' ॥ ७

पूजूनि राम निगमोदित बोधरीती,
चित्तंतु आड पट मायिक जो धरीती ।
काढावयासिच निषेधुनि घेत हातीं,
शांतीसि अन्तरहि हेंचि असें पहाती ॥ ८

श्रीराममंगळकथा जन गात नाना;
अध्यात्ममार्गे बघतांचि वृथा तनाना ।
न भ्रांतिचा पट फिटे म्हणुनी, द्विजाती
गाती सुमंगळ सुधारस चित्र-जाती ॥ ९

ब्रह्मा वृद्ध, सकाम काम-रिपु तो रुद्र स्मशानीं वसे
दैत्यत्रस्त सुरेंद्र, इंद्रगुरुही इंद्राभिमानी असे ।
दुर्वासादि अशान्त, शांत मजही जो कांत इच्छीच ना
माळा हे कमळा, विचारुनि, गळां घाली जगज्जीवना ॥ १०

इच्छीना मजला सुरासुर भला ऐसा दिसेना मला,
आशेशीं रमला जिच्या नर, तिला तो दाससा भासला ।
श्रीवांछादि मला शिवे न, शमला, त्या या घनश्यामला
माळा हे कमळा, विचारुनि, गळां घाली जगन्मंगला ॥ ११

६ सीता०

(२)

[ पुढील पद्य 'आनंदतनया'चें आहे. स्वयंवराच्या वेळीं सीता नि तिची सखी रंगमंडपांत आल्यावर त्यांच्यामध्यें झालेला हा संवाद आहे. ]

'कोण तूझ्या मनासि येतो; सांग हो सीते!' ॥ धृ० ॥
"पैल कुसुंबी दुसार ल्याला?" बाई तो काय नव्हे
"पांघुरला नवरंग दुशाला?" बाई तो काय नव्हे
"विड्या देत हडपेकर ज्याला?" बाई तो काय नव्हे
"माथां मंदिल झळकत शेला?" बाई तो काय नव्हे
"तोरा बहुवस पैल तुऱ्याचा?" बाई तो काय नव्हे
"मनोहराकृति मदन वयाचा?" बाई तो काय नव्हे
"ल्याला पोशाक कंदर्पाचा?" बाई तो काय नव्हे
"अभिनव कंकण हस्त जयाचा?" बाई तो काय नव्हे
"पद्मासनिं करिं धरुनि कटारीं?" बाई तो काय नव्हे
"ल्याला बारिक दस्त दुतारी?" बाई तो काय नव्हे
"गौर धराधिप त्या शेजारीं?" बाई तो काय नव्हे
"दिक्करिसा नृप दोंदिल भारी?" बाई तो काय नव्हे

× × × × ×

"तो ऋषिमंडळिं दिव्य धनुर्धर?" तेव्हां न म्हणे नव्हे
"मेघःश्याम श्रीराम मनोहर?" तेव्हां न म्हणे नव्हे
"दाशरथी नृपराज धनुर्धर?" तेव्हां न म्हणे नव्हे
"आनंदात्मज पूर्ण परात्पर?" तेव्हां न म्हणे नव्हे
'बाणली निजखूण तन्मय तूझी गे सीते'

यावर ह.भ.प. पांगारकरांनी भाष्य केलें आहे तें असें:–

"प्रत्यक्ष रामाचें दर्शन झालें नसतें तोंपर्यंत 'बाई तो काय नव्हे' म्हणजे 'नेति नेति' ह्याप्रमाणेंच भाषा येते. पण दर्शनसाक्षात्कारादि होतांच 'तेव्हां न म्हणे नव्हे' ह्मणजे 'यतो वाचो निवर्तन्ते' हीच स्थिति सद्भक्ताची होते!!"

अनुक्रम ... विभाग ... क्रमांक ... नों. दि. ...
IRBK-0104076
IRBK-0104076